


# जग बदलणारी पुस्तके

शरद जोशी

# जग बदलणारी पुस्तके

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

(या पुस्तकातील सर्व लेख दै. दैशोन्नती (अकोला) मधून प्रकाशित झाले आहेत संपादकाचे आभार)

जनशक्ती वाचक चळवळ

जग बदलणारी पुस्तके । शरद जोशी
Jag Badalnari Pustake | Sharad Joshi

© शरद जोशी
ए १००१/१००२,
देवी अर्किड, भाऊ पाटील रोड,
बोपोडी, पुणे - ४११०२०

**प्रकाशक**
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

**मुद्रक**
रुद्रायणी, औरंगाबाद.

**मुखपृष्ठ**
श्रीकृष्ण उमरीकर

**अक्षरजुळणी**
जनशक्ती वाचक चळवळ,

**प्रथमावृत्ती**
९ जानेवारी २०१०
**द्वितीय आवृत्ती**
२४ फेब्रुवारी २०१४
जागतिक मुद्रण दिन

**मूल्य रु. १००/-**

# प्रस्तावना

'जग बदलणारी पुस्तके' या लेखमालेचा हेतू मुळात, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना आणि विशेषत:, प्रशिक्षणार्थींना पाठ्यक्रमाखेरीज अवांतर वाचनाकरिता जी पुस्तके लावली जातात त्या प्रकारचे एखादे पुस्तक असावे अशी कल्पना होती. प्रशिक्षणवर्गामध्ये अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, जगाचा इतिहास अशा प्रश्नांवर सखोल चर्चा करणे शक्य होत नव्हते. प्रशिक्षणार्थींची यासंबंधीची पार्श्वभूमी तयार व्हावी या दृष्टीने हे लेख लिहिले गेले.

शेतकरी संघटनेच्या प्रशिक्षणवर्गाचे अपेक्षेबाहेर सुरेख परिणाम दिसून आले. शेतकरी संघटनेचे आठवी दहावीपर्यंतसुद्धा न शिकलेले कार्यकर्ते प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षित होऊन गेल्यानंतर व्यापारातील देवघेवीच्या अटी (Terms of Trade), डंकेल ड्राफ्ट, बौद्धिक संपदेचे अधिकार, जागतिक व्यापार संस्था (WTO), एवढेच नव्हे तर जैविक तंत्रज्ञान अशा विषयांवर अगदी महाविद्यालयांत आणि विद्यापीठांतसुद्धा जाऊन भाषणे देऊ लागले आणि तेथील विद्वान मंडळींच्या कौतुकाचा विषय झाले.

यापुढे शेतकरी संघटनेचे प्रशिक्षणवर्ग चालू होतील न होतील; परंतु शेतकरी संघटनेने मांडलेल्या स्वातंत्र्याच्या विचारामध्ये ज्यांना स्वारस्य आहे त्यांना हे पुस्तक अवांतर वाचनासाठी उपयोगी पडेल अशी आशा आहे.

जॉर्ज मिकेश हा माझा स्वत:चा आवडता लेखक आहे. जगातील वेगवेगळ्या देशांविषयी त्याने छोटी छोटी पुस्तके लिहिली आहेत. त्यातील एक माझे आवडते पुस्तक स्वित्झर्लंडविषयी लिहिलेले आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत मिकेश म्हणतो, बालपणापासून माझी एक महत्त्वाकांक्षा होती की, आपल्या हातून एखादे पुस्तक असे लिहून व्हावे ज्यामुळे कोणत्यातरी देशाच्या संसदेमध्ये हलकल्लोळ उडेल. माझ्या लिब्स्टेन्स्टाईनवरील लेखामुळे लिब्स्टेन्स्टाईनमध्ये काहीशी खळबळ माजली असे मला समजले. विचारांची मोठी खळबळ माजवणारे थोर लेखक वेगळे. लिब्स्टेन्स्टाईनसारख्या छोट्या देशात का होई ना,

माझ्या लेखामुळे खळबळ उडाली हे माझ्या मापास योग्य असावे.

मी जेव्हा सार्वजनिक आयुष्यात पडलो नव्हतो किंवा तशी माझी मनीषाही नव्हती त्या विद्यार्थीदशेतसुद्धा माझ्या मनामध्ये अशाच तऱ्हेचा एक विचार येत असे.

या सर्व अनंत जगामध्ये एक काहीतरी सूत्र असले पाहिजे की, ज्या सूत्रामुळे जगातील सारे बदल घडून येतात, साऱ्या क्रांत्या घडतात. अशा सिद्धांताची मांडणी करणारे एक पुस्तक लिहावे, अशी माझी फार महत्त्वाकांक्षा होती.

एखाद्या देशाविषयी लिहायचे झाले तर त्या देशात गेल्यानंतर सात दिवसांच्या आत ते पुस्तक लिहावे. सात दिवसांच्या आत तसे पुस्तक लिहिले गेले नाही तर नंतर वर्षानुवर्षे त्या देशात राहूनही ते पुस्तक लिहिले जात नाही. कारण, त्या देशाविषयी आपला अभ्यास आणि परिचय जितका वाढेल तितके पुस्तक लिहिणे कठीण होत जाते.

जगाची माझी नुकतीच ओळख होत होती त्या काळामध्ये सगळे विश्व आपल्या आवाक्यात आहे, आपल्याला सगळे समजण्यासारखे आहे अशी भावना होती. जसजसा जगाचा परिचय जास्त होऊ लागला तसतशी, सगळं जग आपल्याला समजण्याची शक्यता मावळत गेली, आज ती संपुष्टात आली आहे.

पौगंडावस्थेतील उत्साहामध्ये त्या पुस्तकाचे नावही मी ठरवून ठेवले होते – 'Theory of Revolution' आणि त्या काळच्या परिस्थितीप्रमाणे मनातल्या मनात त्याची एक अर्पणपत्रिकाही तयार केली होती. त्या पुस्तकाची लिहिण्याची सुरुवात मी निदान दहा वेळा केली आणि दहा वेळा तो प्रयत्न सोडून दिला.

जग बदलण्याकरिता पुस्तक लिहिण्याची कल्पना माझ्या मनात येण्याचे एक असेही कारण असावे. एखादी मोठी प्रचंड व्यवस्था काही किरकोळ काडीच्या आधाराने उभी असावी, ती काडी हलविल्यास सर्व डोलारा कोसळून पडतो या कल्पनेचे मला त्या काळी आकर्षण होते. माझ्या मनात त्या वेळी काही छुपा आतंकवादी दडलेला असला पाहिजे. सगळ्या जगाचा व्यवहार चालू आहे पण त्यातील एखादी अशी कोणाच्याही नजरेस न आलेली गोष्ट किंवा तर्कसंगत मांडणी, सिद्धांत आपण जर मांडला तर सर्वच लोकांना, 'अरेच्च्या, आपल्या हे कसे लक्षात आले नाही? हे उत्तर किती साधे आणि सोपे आहे!' अशी भावना तयार होईल. मनामध्ये अशी कल्पना येण्याचे एक कारण म्हणजे लहानपणी वाचनात आलेले 'आशियाचे धर्मदेव' हे तळवळकरांचे पुस्तक. गौतम बुद्ध असो, महंमद पैगंबर असो का झरत्रुष्ट असो – यांनी माणसाच्या सामाजिक,



नैतिक जीवनपद्धतीविषयी काही विचार मांडला आणि या सगळ्या विश्वाचे रहस्य उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला. तसेच आपणही काहीसे करावे अशी एक भावना माझ्या मनात त्याही काळी होती; पण याला मूर्त स्वरूप आले ते मी कॉलेजमध्ये जाऊ लागल्यानंतर. अर्थशास्त्राच्या अभ्यासामध्ये अगदी पहिल्याच दिवशी. अर्थशास्त्र म्हणजे काय, अर्थशास्त्राची नेमकी व्याख्या काय, त्यात कोणकोणते विषय येतात; राज्यसत्ता चालविण्याकरिता, देशाचा आर्थिक कारभार सांभाळण्याकरिता ज्या विषयाचा ऊहापोह करावा लागतो तो विषय म्हणजे राजकीय अर्थशास्त्र (Political Economy) म्हणजे काय? किंवा लोकांच्या ऐहिक कल्याणाकरिता जी जी साधने वापरावी लागतात त्या साधनांचा अभ्यास म्हणजे अर्थशास्त्र काय? अर्थशास्त्री म्हणजे दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीची अर्थशास्त्री म्हणून नेमणूक करणारा तो अर्थशास्त्री अशा विचित्र व्याख्यांची सगळीकडे रेलचेल होती आणि खरेच हे नेमके अर्थशास्त्र काय आहे, अशी एक प्रश्नमालिका माझ्याही मनात तयार झाली होती. त्या वेळच्या अभ्यासाच्या पद्धतीप्रमाणे प्रो. लॉयोनेल रॉबिन्स् यांचे 'Nature and Significance of Economic Science' हे पुस्तक वाचण्याची आम्हाला शिफारस करण्यात आली होती. इतर कोणी किती वाचले मला माहीत नाही; ते पुस्तक मी विकत घेऊन वाचले. आजही ते पुस्तक माझ्या संग्रही आहे. या पुस्तकात अगदी सुरुवातीला पुस्तकाचा हेतू काय आहे, हे स्पष्ट करून ज्या शास्त्रीय तर्कपद्धतीप्रमाणे एक एक मुद्द्याचा समाचार घेत अर्थशास्त्र म्हणजे काय याची मांडणी लॉयोनेल रॉबिन्स् यांनी केली आहे त्याचा त्याही काळात माझ्या मनावर अत्यंत परिणाम झाला होता. जन्माला आलो आहोत तर अशा प्रकारचे एकतरी पुस्तक आपल्या हातून लिहून व्हावे अशीही त्या काळी मोठी इच्छा होती. असे पुस्तक लिहिणे अद्यापतरी जमले नाही. अशा तऱ्हेने ज्यांनी काही वेगळा नवा विचार मांडून सगळ्या जगामध्ये काही बदल घडवून आणले त्या विचारवंतांविषयी माझ्या मनात कुतूहल राहिले आहे.

शेतकरी संघटनेचा विचार मांडताना 'शेतीमालाला निदान उत्पादनखर्चाइतका रास्त भाव मिळाला पाहिजे' हे मूळ सूत्र. 'शेतीमालाला भाव मिळू नये अशी धारणा असलेले शासन सत्तेवर येतेच कसे, त्यांची विचारधारणा काय, त्यांचे तत्त्वज्ञान काय आणि अशा तऱ्हेच्या शासनाने बाजारपेठेत हस्तक्षेप करू नये, शेतकऱ्यांना उत्पादनाचे स्वातंत्र्य हवे, त्याचबरोबर बाजारपेठेचेही स्वातंत्र्य हवे' अशी ठळक मांडणी केली.

यापलीकडे जाऊन, शेती म्हणजे जमिनीवर उत्पादन होणारे खाद्यपदार्थ ही व्याख्या माल्थसच्या काळानंतर पार बदलून गेली आहे. जमिनीचे आकारमान तेवढेच राहिले, लोकसंख्या मात्र कित्येक पटींनी वाढली तरीसुद्धा, माल्थसचे भाकित खोटे ठरवत, आज सर्व लोक पूर्वीपेक्षा चांगल्या तऱ्हेने आपले पोषण करीत आहेत याचे कारण शेतीमध्ये जमिनीपेक्षाही तंत्रज्ञानाचे महत्त्व मोठे आहे. तंत्रज्ञानाचे या सर्व विषयामध्ये काय महत्त्व आहे हाही विचार लक्षात घेतला पाहिजे.

बियाण्याच्या महत्त्वाची वेगळी कल्पना शेतकऱ्यांना द्यावी लागत नाही. पण, 'बियाण्यातून झाड, झाडापासून बियाणे' या पद्धतीने चक्र चालू असताना बियाण्यात काय बदल होत जातात, त्यांचे नियम कोणते हाही विचार आला. त्यापलीकडे, केवळ निसर्गक्रमावर अवलंबून न राहता जर आपल्याला हवे असलेले गुण आपल्या शेतीमालात आले पाहिजेत असे वाटत असेल तर नेमकी त्या गुणांची निवड करून त्याकरिता आवश्यक ते बियाणे कसे निर्माण करता येईल, याकरिता संकरित वाणांचे विज्ञान काय; त्यापलीकडे जाऊन, अलीकडे उपलब्ध झालेले जैविक बियाण्यांचे शास्त्र काय याहीविषयी माहिती देणे आवश्यक आहे. या वेगवेगळ्या विषयांवर जे मूलभूत विचार आहेत ते मांडण्याचा प्रयत्न या लेखमालेत झाला आहे.

शेतकरी संघटनेच्या सर्व विचाराचा मूलभूत आधार 'व्यक्तिगत स्वातंत्र्य' हा आहे.

• साऱ्या जगात एका माणसासारखा दुसरा माणूस असू शकत नाही, प्रत्येक माणूस अनन्यसाधारण आहे.

• कोणत्याही दोन माणसांच्या अनुभवांची तुलना होऊ शकत नाही.

• प्रत्येक व्यक्ती आपापल्या अनुभवांच्या आधाराने आपणास योग्य असे निर्णय घेऊ शकते. जनसमुदायांतील किंवा समाजांतील सर्वांना सारखेच लागू पडतील असे निर्णय घेणे हे कोणत्याही सामाजिक संस्थेला किंवा सत्तेला शक्य नसते.

• जगात कोणीही द्रष्टा, गुरू असू शकत नाही. समाजाची जी काही प्रगती होते ती प्रगती सर्वसामान्य माणसांनी आणि त्यातील काही प्रतिभावंतांनी नव्या नव्या कल्पना मांडण्याचे धाडस करत, चुका करत, चुकांचे परिणाम भोगत, पडत झडत सत्याचा शोध करण्याचा ध्यास धरला म्हणून होते. सत्याचा शोध



करण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

ही शेतकरी संघटनेची आणि स्वतंत्र भारत पक्षाची विचारधारा आहे.

तसे म्हटले तर या पुस्तकात जे एकत्र केलेले लेख आहेत त्यांत एका पुस्तकावर एक लेख अशी काही योजना नाही. पुष्कळ वेळा एका पुस्तकावर एक लेख याऐवजी एका संकल्पनेसाठी एक लेख आणि त्या संकल्पनेविषयी बोलताना ज्या ज्या पुस्तकांचा किंवा विचारवंतांचा संदर्भ आवश्यक आहे त्यांचा उल्लेख अशी मांडणी आहे.

जग बदलणाऱ्या पुस्तकांमध्ये केवळ जडजंबाळ सैद्धांतिक पुस्तकांचाच उल्लेख केला पाहिजे असे नाही; काही वेगळ्या पुस्तकांचाही यात उल्लेख आहे. उदाहरणार्थ, रॉबिन्सन क्रूसो या खलाश्याच्या प्रवासवर्णनामधून निघालेला शास्त्रीय सिद्धांत हा फार महत्त्वाचा आहे. त्या पुस्तकाची मी आवर्जून निवड केली आहे. यापलीकडे, जॉर्ज ऑरवेलचे 'Animal Farm' हे तर हाती घेतल्यानंतर कोणालाही सोडवणार नाही अशा तऱ्हेचे मनोरंजक पुस्तक आहे. त्याचाही अंतर्भाव मी या मालिकेत केला आहे.

शेतकरी संघटनेचा विचार प्रामुख्याने आर्थिक सामाजिक स्वातंत्र्याचा विचार असल्याने पुस्तकांच्या निवडीमध्ये ॲडम स्मिथ, हायेक, मायझेस्, शूम्पीटर यांना महत्त्व मिळाले आहे हे साहजिकच आहे आणि ते योग्यही आहे. विकासाकरिता केवळ अनुकूल परिस्थिती असून भागत नाही; त्याकरिता कठोर परिश्रम आणि प्रतिभा यांची आवश्यकता असते. यापलीकडे, विकास हा अनेक वेळा अडचणींच्या मार्गातून वाट काढीत होतो. कोडकौतुक केलेले समाज पुरुषार्थहीन बनतात. याउलट, इतिहासातील अपघाताने निर्वासित बनलेले समाज मोठे पुरुषार्थ गाजवून जातात. अशा समाजामध्ये संशोधनवृत्तीसुद्धा जोपासली जाते आणि आर्थिक मंदीमध्ये प्रतिभावंतांना कमी तोशीस सोसावी लागते हीही मांडणी यात आलेली आहे.

'अजि म्या ब्रह्म पाहिले' या लेखाची प्रेरणा मला अमेरिकेतील 'बान्झ अँड नोबल' या पुस्तक दुकानांच्या साखळीपैकी एका छोट्याशा गावातील दुकानात गेल्यानंतर मिळाली. वाचकाच्या दृष्टीने विश्वरूप दर्शन व्हावे अशी माझी परिस्थिती झाली आणि गीतेतील अकराव्या अध्यायामध्ये अर्जुनाने जसे हात जोडून श्रीकृष्णाची प्रशस्ती सुरू केली त्या प्रकारे ग्रंथवाचकांचे हे विश्वरूप दर्शन म्हणून मी लिहिलेला हा लेख आहे.

भारतीय स्वातंत्र्याची अर्धशताब्दी साजरी होत असताना मी आणखी दोन

अर्धशताब्दींची दखल घेतली आहे. एक, हायेक याच्या 'अर्थशास्त्रीय सिद्धांत' या पुस्तकाची अर्धशताब्दी. आज हायेक हा खुल्या व्यवस्थेच्या सिद्धांताचा उद्गाता मानला जातो. त्याचबरोबर, सगळ्या जगामध्ये अर्थशास्त्र लोकप्रिय करण्याकरिता ज्याचा प्रभाव राहिला त्या सॅम्युएलसन याच्या पाठ्यपुस्तकाचाही मी परामर्श घेतला आहे.

'मुहूर्तम् ज्वलितं श्रेय:, न च धूमायितं चिरम्' या लेखामध्ये, प्रामुख्याने, 'निरोगी शरीरातच कार्यक्षम मन किंवा बुद्धी असते' या कल्पनेविषयी शंका उपस्थित केली आहे.

थॉमस पेन्स् याच्या 'कॉमन सेन्स्'चा परामर्श घेताना तो एका अर्थाने महात्मा जोतिबा फुले यांचाही गुरू आहे हा विचार मनात होताच. जगामध्ये जेथे जेथे शोषण आणि व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी आहे तेथे तेथे त्याला विरोध करण्याची स्फूर्ती थॉमस पेन्स्नेच जोतिबा फुले यांना दिली.

त्याबरोबरच, थोरो यांनी 'सत्याग्रह हे नैतिकता मानणाऱ्या कोणत्याही नागरिकाचे कर्तव्य आहे' याचे प्रतिपादन केले. त्याचा प्रभाव महात्मा गांधींवर राहिलाच; परंतु जोतिबा फुले यांच्यावरही थोरोच्या लिखाणाचा पुष्कळ प्रभाव दिसून येतो.

कोणत्याही अर्थाने डार्विनचे 'Origine of Species' हे विश्वक्रांती घडविणारे पुस्तक समजले जाते. या पुस्तकासंबंधी मी काही वेगळे लिहायला पाहिजे होते अशी आवश्यकता नव्हती; परंतु डार्विनच्या सिद्धांताविषयी जे काही गैरसमज आहेत त्यांचे निराकरण करण्याचा थोडाफार प्रयत्न त्यासंबंधीच्या लेखात मी केला आहे. जगामध्ये जीवाच्या वेगवेगळ्या स्वरूपांची उत्पत्ती संख्याशास्त्रीय नियमांमुळे किंवा क्वचित प्रसंगी काही किरणांच्या प्रभावामुळे होते. ही विविधता सर्वच काळी जिवंत राहण्यास किंवा टिकण्यास लायक नसते. त्यांची निवड करून अपात्र जीव जीवनाच्या यातनांतून मुक्त करण्याची जी व्यवस्था उत्क्रांतीच्या संघर्षात आहे त्याची मांडणी मी यात केली आहे.

ज्यांना इंग्रजी भाषेची आवड आहे त्यांच्याकरिता मी एवढे सांगेन की, मी आजपर्यंत इंग्रजीतील जी उत्कृष्ट पुस्तके वाचली त्या पुस्तकांत केन्स्चे 'Economic Consequences of Peace' आणि लॉयोनेल रॉबिन्स्चे 'The Nature and Significance of Economic Science' या दोन पुस्तकांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.



'येस् मिनिस्टर!' आणि 'येस् प्राईम मिनिस्टर!' या दोन पुस्तकांचा मी आवर्जून उल्लेख केला आहे आणि त्याबद्दल एक प्रदीर्घ तीन भागांचा लेख लिहिला आहे. हिंदुस्थानच्या इतिहासात या दोन पुस्तकांचे विशेष महत्त्व आहे. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधींना सिंहासनावर बसविण्यात आले. त्यांनी आपले जुने मित्र गोळा केले आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, मोठमोठ्या विद्यालयांत शिकलेल्या या सर्व मित्रांची बौद्धिक संपदा अत्यंत तुटपुंजी होती. त्यांनी त्या काळी आवडीने वाचलेली ही दोनच पुस्तके. स्वत: राजीव गांधींनी ही पुस्तके वाचली नाहीत; पण त्यावर बीबीसीवर येणारी मालिका ते फार आग्रहाने पाहत असत असा उल्लेख आहे. या पुस्तकांतल्या वेगवेगळ्या कल्पना पुस्तकांमध्ये हास्यास्पद ठरविण्यात आल्या आहेत; पण त्यांचा हिंदुस्थानच्या व्यवस्थेमध्ये आग्रहाने अंतर्भाव करण्याकरिता राजीव गांधींच्या काळामध्ये अनेक प्रयत्न झाले. उदाहरणार्थ, पंचायत राज्य किंवा प्राणिमात्रांविषयी दया यांसंबंधीचे त्यांनी केलेले प्रयोग हे 'येस् मिनिस्टर!'मधल्या हॅकरसाहेबांनी केलेले आहेत. दुर्दैवाने, त्यांना वाटेवर आणणारी व्यवस्था हिंदुस्थानात उपलब्ध नव्हती. या काळामध्ये राजीव गांधीच्या दूरदृष्टीचा आणि द्रष्टेपणाचा फारच 'उदो उदो' होत होता. या सगळ्याचे मूळ या दोन विनोदी पुस्तकांत आहे हे मला शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आणून द्यायचे होते.

ॲडम स्मिथ याच्या लिखाणानंतर, 'व्यक्तीला पूर्णत: स्वातंत्र्य दिले, की सर्व देशाची संपत्ती वाढतच जाईल आणि त्याला जणू काही अंतच नाही' अशा तऱ्हेचे एक गुलाबी स्वप्न रंगवले गेले होते. त्याला छेद दिला तो प्रामुख्याने मार्क्स्च्या समाजवादाने आणि त्याबरोबरच माल्थस्च्या लिखाणाने. 'खुल्या पद्धतीची भांडवलशाही व्यवस्था आणि बाजारपेठ सुरळीतपणे चालणार नाहीत, त्यात तेजीमंदीच्या लाटा येत राहतील आणि बाजारातील मागणी ही नेहमीच पुरवठ्यापेक्षा कमी राहिल्याने विकासाची गती रोखली जाईल' अशी मांडणी मार्क्स्ने केली. याखेरीज, माल्थस्ने 'पृथ्वीवरील एकूण जमीन मर्यादित आहे, तिच्यात वाढ होण्याची फारशी शक्यता नाही; याउलट, लोकसंख्या प्रचंड गतीने वाढत राहते. त्यामुळे, लोकांची अन्नान्नदशा होईल, रोगराई, आजार, युद्धे यांनी सर्व मानवसंस्कृती ग्रासली जाईल' असे आग्रही प्रतिपादन केले. ही मांडणी करून माल्थस्ने ॲडम स्मिथच्या गुलाबी स्वप्नांवर एक प्रकारे प्रश्नचिन्हच उभे केले. प्रत्यक्षात मात्र असे घडले नाही. लोकसंख्या वाढत गेली, शेतीयोग्य जमिनीचे आकारमान जवळजवळ तेवढेच राहिले; परंतु माणसाने आपल्या

प्रतिभेने निर्माण केलेल्या तंत्रज्ञानामुळे शेतीतील उत्पादन इतके वाढले की, आजमितीस, माल्थस्च्या काळापेक्षा कितीतरी पटींनी अधिक असलेली लोकसंख्या त्या काळापेक्षा कितीतरी चांगल्या पद्धतीने राहत आहे, जेवत आहे, जगत आहे. याचे कारण प्रामुख्याने शेतीमध्ये वापरले गेलेले नवे नवे तंत्रज्ञान आहे. शेतीमध्ये जमिनीपेक्षा तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे, तंत्रज्ञानामध्ये मनुष्याची संशोधकता आणि प्रतिभा यांचे महत्त्व आहे, ही गोष्ट सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.

मार्क्स्‌ने 'कामगारांच्या शोषणातून भांडवलाची निर्मिती होते आणि त्यातून भांडवलशाहीचा विकास होतो' अशी मांडणी केली. यापेक्षाही अधिक व्यापक कल्पना मांडण्याकरिता 'भक्षकाय स्वाहा:' हा लेख मी लिहिला. भगवद्गीतेत स्वयं श्रीकृष्णांनी पापयोनीमध्ये शूद्र, पशू इत्यादींची गणना केली आणि कबिरांनी 'ढोर, गवार, पशू, शूद्र, नारी– सब ताडन के अधिकारी' असे म्हटले. पशू, शूद्र, नारी या सर्वांमध्ये समानता काय आहे? हा प्रश्न मी उभा केला. पशूंचा गुणाकार होतो, स्त्रियाही गुणाकार करतात. त्याबरोबरच, शेतकरीही गुणाकार करतात हे लक्षात घेतले म्हणजे एकूणात 'गुणाकार करणाऱ्यांचे शोषण होते' हा निष्कर्ष निघतो. 'उत्पादनामध्ये फक्त अंकगणितश्रेणीने वाढ करणाऱ्यांच्या शोषणाला फारसा वाव राहत नाही. कामगार जरी उत्पादन वस्तूच्या मूल्यात वाढ करीत असले तरी ती केवळ अंकगणिती वाढ असल्यामुळे त्यांच्या शोषणाची शक्यता इतिहासात नाही' असे मांडण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे. यापलीकडे जाऊन, शेतकऱ्यांनंतर आणखी कोणत्या समाजघटकाचे शोषण होऊ शकेल यासंबंधीचा एक अंदाज बांधला आहे. माल्थस्चे भाकित खोटे ठरवून शेतकरी सर्व जगाला जेवू घालू शकला याचे कारण तंत्रज्ञान हेच आहे आणि त्यामुळे, शेतकऱ्यानंतर उत्पादनाचा गुणाकार करणारे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञानी यांचे शोषण होत राहील हा सिद्धांत मांडला आहे. हा सिद्धांत आयन रँड यांनी मांडला आहे. आयन रँड या माझ्या आवडत्या लेखिका असूनही, दुर्दैवाने त्यांचे एकही पुस्तक या लेखसंग्रहात चर्चिले गेले नाही; पुढेमागे प्रसंग आल्यास त्यांच्या पुस्तकांवर अवश्य लिहीन.

विकास कोणकोणत्या घटकांमुळे होतो याची मांडणी दोनतीन लेखांत केली आहे. 'क्रूसोचे अर्थशास्त्र' या पुस्तकावरील लेखात कष्ट, प्रतिभा आणि दैवयोग यांचे महत्त्व सांगितले आहे. याउलट, 'माल्थस् आणि त्यानंतर शूम्पीटर यांच्या सिद्धांतांच्या अनुषंगाने मनुष्याच्या सर्व प्रगतीचा सर्वांत प्रमुख आधार प्रतिभाशाली, नवनवोन्मेषशाली संशोधन, नवनव्या कल्पनांचा प्रसार हे असल्याचे' मांडले



आहे.

या लेखमालिकेमध्ये शेतकऱ्यांच्या शोषणाच्या सिद्धांतासंबंधी बरेच वेळा उल्लेख झाला आहे. त्यामध्ये बुखारीनची मांडणी, प्रियाब्रोझोन्स्की यांच्या कल्पना यांनाही महत्त्व देऊन 'साम्राज्यवादी देशांनी वसाहतींचे ज्या पद्धतीने शोषण केले त्याच पद्धतींनी समाजवादी देशातील शेतीचे शोषण करणे आवश्यक आहे एवढेच नव्हे तर, तसे झालेच पाहिजे' ही प्रियाब्रोझोन्स्कीची कल्पना मांडण्याची संधी मला मिळाली.

समाजवादाच्या पाडावासंबंधी अनेक संदर्भ या संग्रहात आले आहेत. हायेकपासून जॉर्ज ऑरवेलच्या 'Animal Farm'पर्यंत आणि त्यानंतरही ऑर्थर कोस्लर यांच्यासंबंधी टिपण करताना समाजवादी व्यवस्थेचा– कोणत्याही व्यक्तीच्या प्रत्यक्ष अनुभूतीवर न आधारलेल्या– व्यवस्थेचा अध:पात अपरिहार्य आहे, ही कल्पना मांडलेली आहे.

या संग्रहातील एक महत्त्वाचा लेख हा मायझेससंबंधी आहे. 'खासगी मालमत्तेवर आधारलेल्या व्यवस्थेत जो तो अधिकाधिक फायदाच मिळवून स्वत:चा स्वार्थ साधायचा प्रयत्न करीत असतो. अशी व्यवस्था टिकू शकणार नाही. वैयक्तिक स्वार्थ आणि सामूहिक हित यांचा मेळ बसणे शक्य नाही. सारी खासगी मालमत्ता सार्वजनिक करावी, अर्थव्यवस्थेचे सारे नियोजन क्रांतिकारी मजुरांच्या नेत्यांनी करावे म्हणजे मानवी प्रगतीच्या मार्गातील सर्व अडसर दूर होतील आणि माणूस खऱ्या अर्थाने मुक्त होईल. फायद्याच्या प्रेरणेने चालणारी बाजारपेठेची व्यवस्था टिकूच शकत नाही' या मार्क्स्‌च्या मांडणीला मायझेसने उत्तर दिले आहे. 'समाजवादी नियोजनाचे आर्थिक गणित' अशा शीर्षकाचे पुस्तक त्याने जर्मन भाषेत लिहिले आहे. 'अर्थव्यवस्थेत सामूहिक नियोजन ही कल्पनाच भोंगळ आणि चुकीची आहे, समाजवादी नियोजनाच्या व्यवस्थेतील निर्णय हमखास चुकीचे असतात, अशा चुकीच्या निर्णयांवर आधारलेली व्यवस्था फार काळ टिकणे अशक्य आहे' अशी भूमिका मायझेसने त्या पुस्तकात मांडली आहे.

शेतकरी संघटनेच्या सर्व अर्थशास्त्राची भूमिका प्रामुख्याने हीच आहे. ही भूमिका शेतीच्या संदर्भाने मांडण्याकरिता प्रशिक्षणवर्ग भरवले गेले. त्या प्रशिक्षणाचा व्यापक अर्थ समजण्याकरिता ज्या काही इतर संदर्भग्रंथांची ओळख कार्यकर्त्यांना असणे आवश्यक वाटले त्यांच्यासंबंधी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. त्यातून शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना या पुस्तकांची तोंडओळख

होईल आणि त्यामुळे, त्यांना मूळ लेखन वाचण्याची इच्छा झाली तर यापुढेही शेतकरी संघटनेचे काम अखंडितपणे चालूच राहील यात काही शंका नाही.

सारांशाने सांगायचे झाले तर, शेतकरी संघटनेच्या विचारधारेमधील 'आपापल्या स्वार्थाने निर्णय घेणाऱ्या व्यक्तींच्या समाजातील निर्णय फारसे चुकत नाहीत. याउलट, मोठमोठी नियोजन मंडळे आणि समित्या स्थापून, अहवालांचे आणि आकडेवारीचे गठ्ठे गोळा करून गणकयंत्रांच्या साहाय्याने निर्णय करणारी शासने मात्र पश्चात्ताप पावतात' या एका महत्त्वाच्या रहस्याचे विश्लेषण शेतकरी संघटनेच्या अर्थशास्त्रात आहे. त्याला परिपोषक म्हणून अवांतर वाचन शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना आवश्यक वाटले त्यासाठी मी हे लेख लिहिले. आज जर मला हे पुस्तक लिहायचे असते तर मी आणखी निदान दोन पुस्तकांचा आवर्जून उल्लेख केला असता. पहिले पुस्तक 'The Selfish Gene' या पुस्तकातील मांडणी अ‍ॅडम स्मिथच्या मांडणीकरिता अत्यंत महत्त्वाची आणि पूरक अशी आहे. याबरोबर 'The God Gene' या पुस्तकाचाही मी आवर्जून अंतर्भाव केला असता. अ‍ॅडम स्मिथविषयी लिहिताना त्यांच्या 'The Wealth of Nations'चा उल्लेख मी केला आहे एवढेच नव्हे तर, 'The Theory of Moral Sentiments'चाही उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे, अलीकडच्या काळात 'The Selfish Gene' आणि 'The God Gene' या पुस्तकांचा उल्लेख मी केला असता. आता ते शक्य नाही, पण पुढेमागे कधी काळी प्रसंग आल्यास ही त्रुटी भरून काढण्याचा मी प्रयत्न करीन.

नवी दिल्ली — **शरद जोशी**

१३ डिसेंबर २००९



## अनुक्रमणिका

अजि म्या ब्रह्म पाहिले! /१५
आणखी एक अर्धशताब्दी /१९
एका पाठ्यपुस्तकाचीही अर्धशताब्दी /२३
पीडेची जाणिव आणि नैतिकता /२७
सत्याग्रह – एक कर्तव्य /३१
डर्विनचे 'विश्वदर्शन' /३५
विजय आणि परभवाचे अर्थकारण /४०
मुहूर्तं ज्वलितं श्रेयः। न च धूमायितं चिरम्।। /४४
थॉमस पेन्सचे 'कॉमन सेन्स' /४९
अखेर विजय मायझेसचा /५४
'हां, मंत्रिजी!' /५८
अनंतमुख लोक आणि द्विहस्त कमलाकर /७०
भक्षकाय स्वाहा: /७५
उद्योगिनम् प्रतिभावन्तम् /८०
प्रियाब्रोझेन्स्किचे भूत /८५
मध्यान्हीचा सूर्य /९१
क्रुसोचे अर्थशास्त्र /९५
अनंत इच्छा आणि फाटकी साधने /९९
असंतुष्ट मधमाशांची परिकथा /१०४
सौख्याचे अर्थशास्त्र /१०८
स्वातंत्र्य म्हणजे प्रगती /११३
निसर्ग चूप राहत नाही /११६
मार्क्सवादाचा पाडाव आणि स्त्रीप्रश्न /१२०
एक दुर्दैवी द्रष्टी /१२४

# अजि म्या ब्रह्म पाहिले !

जवळ जवळ २५ वर्षानंतर अमेरिकेत जाण्याचा योग आला. पूर्वी संयुक्त राष्ट्रसंघातील एका संस्थेचा प्रतिनिधी म्हणून वेगवेगळ्या बैठकींना हजर राहण्यासाठी जात असे, त्यामुळे पाहणे व्हायचे ते मुख्यत: न्यूयॉर्कचे. मध्ये आठवड्याची सुटी आली तर जवळपासच्या एखाद्या संस्थानातील मित्राच्या घरी स्नेहभेट देऊन येणे. घरी परतण्यापूर्वी अगदीच रिकाम्या हताने घरी परतणे मनातला प्रशस्त वाटत नसे म्हणून सगळ्या कामांच्या घाईगर्दीत एखाद्या, पिन ते पियानो सगळ्या वस्तू विकणाऱ्या सुपर मार्केटमध्ये जाऊन मुलींकरिता खेळणी किंवा इतर वस्तू घेणे एवढाच काय तो कार्यक्रम व्हायचा.

या वेळी गेलो ते सर्वस्वी घरगुती कामाकरिता. केनेडी विमानतळावर उतरून न्यू जर्सी संस्थानात जाता जाता वाटेत न्यूयॉर्कच्या मॅनहॅटनमधील उत्तुंग इमारतीचे आणि स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याचे दुरूनच काय ते दर्शन झाले. अलीकडे, न्यूयॉर्क शहरावर धूर आणि धुके यांच्या मिश्रणाचे असे काही आवरण असते की हे दर्शनदेखील दुर्लभ झाले आहे असे कळले; स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याने जुन्या ओळखीदाखल मेहरनजर केली असेल.

सगळे मिळून पाचच दिवस अमेरिकेत मुक्काम होता. सगळ्या कामांच्या गडबडीत या वेळी एक अनुभव, थोड्या अपघाताने आला आणि चकीत होऊन जाण्याइतका अद्‌भुत वाटला. पूर्वी स्वित्झर्लंडमधून अमेरिकेत जात असे. अमेरिकेतील पुस्तकांच्या दुकानात जाण्याची कधी वेळच आली नव्हती. पुस्तक खरेदी सारी स्वित्झर्लंडमध्येच व्हायची. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्य कार्यालयात पुस्तकांचे एक दुकान आहे, मुंबईपुण्यातील एखाद्या चांगल्या पुस्तकांच्या दुकानाइतकेच मोठे, त्यामुळे काही वेगळेपण जाणवले नव्हते. याही वेळी पुस्तकांच्या दुकानाला खास भेट देण्याचा बेत नव्हता. आधी म्हणजे, पुस्तके विकत घेण्याइतके डॉलर नव्हते, शिवाय पुस्तके म्हणजे मोठे बोजड वजन, त्याकरिता परतीच्या प्रवासात भुर्दंड भरावा लागेल की काय ही धाकधूक होतीच.

आता, ६००० रुपयापर्यंतच्या किमतीच्या वस्तू परतीच्या प्रवासात आणण्याची परवानगी आहे; त्यात पुस्तके मोजली जातात किंवा नाही याचा खुलासा कोठे मिळत नाही. त्यामुळे, पुस्तकांच्या दुकानात जाण्याचा काही विचार नव्हता.

पण, माझ्या पुण्यातल्या नातीने सुचवले-दहा वर्षांची ही मुलगी हल्ली संगीताचा अभ्यास करते-पाश्चिमात्य संगीतातील सरगम लिहावी कशी आणि वाचावी कशी या विषयावर तिला पुस्तक पाहिजे होते. ही माझी नात भलतीच समजूतदार आहे. ''तुला काय पाहिजे?'' असे विचारले तर ''काहीच नको.'' म्हणणार. शेवटी तिच्या तोंडून आपणच काही मागणी काढवली तरी ती ''बघा हं ! तुम्हाला त्रास नाही ना होणार ? नाही तर, आणलं नाही तरी काही नाही.'' असं इतक्या वेळा आणि इतक्या तऱ्हेने बोलते की तिची मागणी पुरी करणे ही गोष्ट एकदम सर्वोच्च प्राथमिकतेची बनते.

दहा वर्षे वयाच्या मुलीकरिता पाश्चात्य संगीताच्या सरगमविषयीचे पुस्तक हवे म्हणून मी पुस्तकांच्या दुकानाकडे निघालो. एक स्नेह्याने पत्ता दिला. मी ज्या गावात उतरलो होतो त्या गावची वस्ती जास्तीत जास्त पंधरा ते वीस हजार, म्हणजे आपल्याकडच्या एखाद्या तालुक्यातील बाजारपेठेच्या गावापेक्षाही कमी. पुण्याची वस्ती आता पंचवीसतीस लाखांवर असेल. त्यात पुणे म्हणजे विद्येचे माहेरघर. पण, संगीताची पुस्तके शोधायला गेले तर; चार फुटी दरवाजा, त्याच्या आत दहा फूट लांबीच्या दुकानात फळ्यांवर अस्ताव्यस्त पुस्तके ठेवलेली असे दृश्य असते. अमेरिकेत इतकी काही भयानक अवस्था असणार नाही याची खात्री होती; पण जे समोर आले त्याने विश्वरम्य दर्शन झाल्यासारखा अद्‌भुत चमत्कार वाटला.

या चिमुरड्या गावातील पुस्तकांचे दुकान म्हणजे पुस्तकांची दुकाने चालविणाऱ्या एका कंपनीच्या हजारो शाखांपैकी एक शाखा. बाहेर प्रशस्त पटांगण. दोनतीनशे गाड्या उभ्या करण्याची सोय. तेथून दुकानाच्या दरवाजात आलो आणि ''नान्तम् न मध्यम् ।' असे विश्वेश्वर रूप पाहिल्यासारख्या, दृष्टी पोहोचेपर्यंत पुस्तकांच्या कपाटांच्या रांगाच्या रांगा दिसल्या. अगदी लहानपणी, म्हणजे कडेवर बसत असता साताऱ्याच्या अजिंक्यताऱ्यावर कोणी नेले होते, तेथून नजर जेथपर्यंत पोहोचत होती तेथपर्यंत एका मागोमाग एक पर्वतराजी पाहिल्यावर असाच अचंबा वाटला होता. त्यानंतर त्यासारखा हा पहिलाच अनुभव.

मुंबई दिल्लीतील मोठ्यातल्या मोठ्या दुकानापेक्षा निदान दहापट मोठ्या या



दुकानात ग्राहक फक्त शंभरदोनशेच होते. सुटीच्या दिवशी जास्त गर्दी असते असे कळले. घाईमध्ये असलेले ग्राहक दुकानामध्ये येऊन; दुकानात कसले, महाग्रंथागारात येऊन नव्याने प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांच्या विभागात जात. तेथे ललित साहित्य वेगळे, अ-ललित साहित्य वेगळे. प्रवेशद्वारापाशीच गणकयंत्रांची एक रांग बसविलेली; लेखकवार, विषयवार, प्रकाशनवर्षवार, प्रकाशकवार किंवा यापैकी कोणत्याही गोष्टींची एकत्र अट घालून गणकयंत्राला प्रश्न विचारला की ग्रंथालयात विक्रीला असलेल्या त्या प्रकारच्या पुस्तकांची यादी व कपाटाचा क्रमांक आणि किमत चटकन पाहता येते. पुस्तकांचे दुकान चालवायचे म्हणजे जुना साठा सतत काढून टाकत राहणे महत्त्वाचे असते. अमेरिकेत तर हे विशेष खरे. दररोज शेकड्यांनी पुस्तके प्रसिद्ध होतात आणि एकेका पुस्तकाची आवृत्ती लाखाच्या खालची नाहीच. नवीन पुस्तकांचा धबधबा असा वरून येत असताना जुनी पुस्तके काढली नाहीत तर, दुकान केवढे का मोठे असेना, पाय ठेवायलासुद्धा जागा राहायची नाही !

जुनी पुस्तके कमी किमतीला विक्रीला ठेवण्याचा एक वेगळा विभाग. सवलत ६० % पासून ९० % पर्यंत. पुस्तकांच्या अशा 'सेल'मध्ये जाणे हा माझा आवडता छंद आहे. प्रत्येकवेळी काही ना काही 'हिरेमोती' त्या ढिगात सापडतातच. पूर्वी, कमावता असताना एक गोष्ट मोठी चांगली होती. पुस्तकांच्या दुकानात एखादे पुस्तक घ्यावेसे वाटले तर पान उलटून, किंमत परवडणारी आहे का हे पाहावे लागत नसे. आता हातातील पैसे कमी झाले ही एक गोष्ट आणि किमती भरमसाटच भडकल्या ही दुसरी गोष्ट. त्यामुळे आडगिऱ्हायकी पुस्तकांच्या खरेदीतही मोठा आनंद वाटतो; येथे तर नवी कोरी पुस्तके 'सस्ते में' मिळत होती.

पहिल्यांदा, लहान मुलांच्या पुस्तकांच्या विभागात गेलो. आपल्याकडील, मोठ्यांच्या पुस्तकांच्या दुकानापेक्षा, एवढेच नव्हे तर ग्रंथालयापेक्षा मोठा. मी तर भांबावून गेलो. तेथील एका मदतनीस बाईस प्रश्न विचारला, तिने अचूक एक रकाना दाखवला. अगदी पाहिज्ये त्या वर्णनाची दोन पुस्तके मिळाली. पण, एवढ्या लवकर काय माझा पाय निघणार होता? सारी सकाळ बाकीचे दुकान पाहण्यात घालवली.

कोणते पुस्तक घ्यायचे आहे हे माहीत असेल तर वाचनालयात किंवा पुस्तकांच्या दुकानात सूची पाहता येते. पण, प्रत्यक्ष कपाटासमोर जाऊन कुतुहलाने हे पुस्तक उचल, चाळून पाहा असा चाळा करण्यात मोठा आनंद असतो. कपाटांची

पुस्तके आणि ज्ञानाची आगारे आलेली.

एका गोष्टीचे मोठे नवल वाटले. त्या दुकानात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यास दर आठवड्याला एका पुस्तकाची शिफारस करण्याची मुभा आहे. आपल्याला आवडलेले पुस्तक आणि ते का आवडले यासंबंधी एका वाक्यातील शिफारस असलेली कार्डे एका सूचनाफलकावर लावलेली होती. या प्रत्येक पुस्तकावर त्या आठवड्यापुरती किमतीत ३० % पर्यंत सूट दिलेली होती.

दुकानाच्या आत जागोजागी प्रसाधनगृहे, आहारिका. वेळ असता तर दुकान बंद होण्याची वेळ येईपर्यंत माझे पाऊल काही बाहेर निघाले नसते.

अमेरिका म्हणजे भोगवादी संस्कृतीचा देश. तेथे माणसे उत्पादन करतात, फायदा कमावतात, त्याकरिताच मरमर धावपळ करतात; आम्ही असे उपभोगवादी नाही, आम्ही संस्कृतीने श्रेष्ठ आहोत अशा फुशारक्या आमच्याकडे जुने संस्कृतीवादी आणि नवे पर्यावरणवादी मारत असतात. टीव्हीवर कुठे दहाबारा चॅनेल येऊ लागल्या तर आता पोरे त्यासमोर बसून राहतात, अभ्यास करीत नाहीत, आता या पोरांच्या शिक्षणाचे आणि देशाचे काय होणार अशी चिंता मोठ्या गंभीरपणे वडील मंडळी सांगत असतात !

अमेरिकेत कोणत्याही घरी शंभरपेक्षा कमी चॅनेल नाहीत. येथील माणसे सकाळपासून संध्याकाळपर्यंत धावपळ करतात, उपभोगही घेतात; पण त्याबरोबर पंधरा हजार वस्तीच्या गावातील पुस्तकांचे एक दुकान आपल्याकडील अगदी विश्वविद्यालयाच्या ग्रंथालयापेक्षा मोठे असते, याचा मोठा अचंबा वाटत होता.

सगळे संकोच, अडचणी बाजूला सारून पाचसहा पुस्तके उचलून मी पैसे देण्याकरिता काउंटरवर आलो. दहाबारा वाचनप्रेमी माझ्यापुढे रांगेत होते; सुपर मार्केटमध्ये खरेदी केलेला माल ठेवण्यासाठी जशा चारचाकी गाड्या असतात तशी गाडी प्रत्येकाच्या समोर आणि प्रत्येक गाडी निदान निम्मीशिम्मी पुस्तकांनी भरलेली.

*(२१ सप्टेंबर १९९७)*

■■



# आणखी एक अर्धशताब्दी!

भारताच्या स्वातंत्र्याच्या अर्धशताब्दीचे हे वर्ष. त्याच वेळी दुसरी एक अर्धशताब्दी साजरी होत आहे - एका पुस्तकाची. तसे, हे पुस्तक प्रसिद्ध झाले १९४४ मध्ये. म्हणजे, यंदा त्याला पन्नासावर तीन वर्षे झाली. पण, पुस्तकाच्या अर्धशताब्दीची आवृत्ती भारतात अलीकडेअलीकडेच येऊन पोहोचली. इतिहासाच्या प्रवाहात जास्त महत्त्वाची अर्धशताब्दी कोणती? भारताच्या स्वातंत्र्याची का या पुस्तकाची? सांगणे कठीण आहे.

तश्या या दोन घटना परस्परविरोधी आहेत. भारताचे स्वातंत्र्य वाजत गाजत आले, स्वप्ने घेऊन आले, नियतीशी गाठ ठरवत आले आणि या पन्नास वर्षांत साऱ्या स्वप्नांची राखरांगोळी झाली. याच्या नेमके उलटे या पुस्तकाबद्दल घडले. पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या वेळी पुस्तकातील मांडणी आणि विचार निव्वळ मूर्खपणा असल्याचे बहुतेक शिष्टमान्य विद्वानांचे मत होते. आज हे पुस्तक नव्या स्वातंत्र्याच्या युगाची तुतारी बनले आहे. पुस्तकाचे नाव 'गुलामगिरीची वाट' (Road to Serfdom) पुस्तकाचे लेखक 'एफ.ए. हायेक'.

हायेक जन्माने ऑस्ट्रियन, आज २० व्या शतकातील विख्यात अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, भाषाकोविद, मानसशास्त्रज्ञ म्हणून गाजलेला; १९७४ च्या अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषकाचा मानकरी. याने अगदी तरुणपणी लिहिलेले हे पुस्तक अर्थकारणापेक्षा राजकीय विचारांवरील चोपडे म्हटले पाहिजे. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीतील समाजवाद्यांची सरशी, नंतर हिटलरच्या नेतृत्वाखाली समाजवाद्यांचा नि:पात, नाझीवादाच्या भस्मासुराचा उदय या घटना हायेक याने प्रत्यक्ष पहिल्या व अनुभवल्या आणि तो इंग्लंडमध्ये निघून आला; नाझी जर्मनीचा सर्वस्व पणाला लावून विरोध करणाऱ्या इंग्लंडमध्ये राहिला. त्यावेळी, चर्चिल एका राष्ट्रीय सरकारचे पंतप्रधान होते. त्यांचे मंत्रिमंडळ सर्वपक्षीय होते. त्यात हुजूर आणि मजूर दोन्ही पक्ष सामील होते. 'युद्धकाळात शासनाच्या हाती सर्वंकष सत्ता जातेच. लष्करभरती, महत्त्वाच्या उत्पादनांना लागणारा मजुरांचा पुरवठा व्यवस्थित व्हावा यासाठी काही प्रमाणात व्यक्तिस्वातंत्र्य बाजूला ठेवून सक्ती करण्याचा हक्क शासनाला मिळतो. सगळ्याच गोष्टींचा तुटवडा असल्याने अन्नधान्याच्या पुरवठ्याची वेगळी व्यवस्था करावी लागते. पेट्रोल, कोळसा इत्यादि वस्तू प्रामुख्याने

लष्कराच्या उपयोगाकरिता किंवा युद्धाला लागणाऱ्या उत्पादनांकरिता प्राधान्याने वापराव्या लागतात. वरून बाँबचा सतत वर्षाव होत असताना अशी व्यवस्था चालविण्याकरिता व्यक्तिस्वातंत्र्यावरही अनेक मर्यादा घालाव्या लागतात. हे सारे युद्धकाळात अपरिहार्य असते.'

या काळात, इंग्लंडमधील मजूर पक्षाचा मोठा बौद्धिक दबदबा होता. जॉर्ज बर्नार्ड शॉ, हेरॉल्ड लास्की यांच्यासारखे अनेक, समाजवादी विचारांचा पाठपुरावा करीत होते. युद्ध संपल्यानंतर नव्या इंग्लंडची उभारणी समाजवाद, मालमत्ता व उत्पादनांची साधने यांचे राष्ट्रीयीकरण आणि सर्वंकष नियोजन यांच्या आधारानेच होईल असा विचार धुरीण मांडत होते आणि सर्वसामान्य जनतेलाही त्याखेरीज काही पर्याय दिसत नव्हता. जर्मनीत समाजवाद्यांचा पाडाव होऊन हिटलर आला. त्या अर्थी समाजवाद्यांचे आर्थिक नियोजन आणि नाझीवाद्यांचे आर्थिक शासन यात मूलभूत फरक आहेत. तसेच, नाझी नियोजन आणि समाजसत्तावादी सोव्हिएट युनियनमधील नियोजन यात काहीच समानता नाही असे विद्वान अर्थशास्त्रज्ञ मांडत होते. नाझी जर्मनीचा पराभव केल्यानंतर समाजसत्तावादी नियोजनाच्या मार्गानेच इंग्लंड पुन्हा आपल्या पायांवर उभा राहू शकेल; अशी सर्वत्र धारणा असताना हायेकच्या मनात शंकेची पाल चुकचुकली आणि मनामध्ये एक भीती उभी राहिली.

हे जे घडते आहे ते पूर्वी घडलेले आहे; सगळ्या गोष्टी आपण अनुभवलेल्या आहेत; इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे अशी दाट शंका त्याला वाटू लागली. नाझीवादी आणि समाजवादी यांच्यात तसा फारसा फरक नाही; अर्थकारणात स्वातंत्र्याचा संकोच कोणत्याही कारणाने, कोणत्याही तत्त्वज्ञानाने, कोणत्याही उद्दिष्टाने केला तरी तो तितकाच घातक असतो. त्यातून अटळपणे हुकूमशाहीचा भस्मासुर तयार होतो. लोकशाही स्वातंत्र्य आणि अर्थकारणातील सरकारी हस्तक्षेप या दोन गोष्टी एकत्र कधी नांदूच शकत नाहीत. इंग्रजी जनतेला धोक्याची सूचना देण्याकरिता हायेक याने एक लहानसा लेख लिहिला, नंतर त्याचा निबंध बनला आणि शेवटी, तो एका चोपड्याच्या रूपाने १९४४ साली प्रकाशित झाला. पुस्तक अर्पण केले होते सर्व पक्षांतील समाजवाद्यांना.

कोणत्याही मिषाने का होईना, सरकारी नियोजन आले की नागरिक बाहुली बनतात आणि सरकार हुकूमशहा हे हायेकला स्पष्ट दिसत होते, पण बाकी जग हा विचार मानण्याच्या अवस्थेत त्यावेळी फारसे नव्हते. इंग्लंडमध्ये मजूरपक्षीयांनी लेखकावर कडाडून हल्ला चढवला. लेखक परदेशी आहे येथपासून हल्ल्याला सुरुवात झाली. पण, जाणकार अर्थशास्त्रज्ञांनी त्या हल्ल्याची गंभीरपणे दखल घेतली नाही. हे पुस्तक ऐतिहासिक महत्त्वाचे आहे याची जाणीव इंग्लंडमधील जाणकारांना झाली. पुस्तकाचे भाषांतर स्वित्झर्लंडमार्गे जर्मनीत पोहोचले तेव्हा हिटलरशाही व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेतलल्या जर्मनीत त्याचे मोठे प्रचंड स्वागत झाले.



याच्या नेमके उलटे उमेरिकेत घडले. १९२९ सालच्या आर्थिक अरिष्टानंतर अर्थव्यवस्था चालविण्यासाठी शासनाला महत्त्वाची भूमिका बजावणे भाग आहे हा विचार अमेरिकेत सर्वमान्य झाला होता. राष्ट्रीयीकरण आणि आर्थिक नियोजन असला अतिरेक नको, पण बेरोजगारी, गरिबी यावर मात करण्यासाठी सरकारने काही केले पाहिजे, रोजगार देण्यासाठी कामे काढली पाहिजेत, शिक्षण, आरोग्य यासारख्या क्षेत्रांत कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजे अशा सर्वसाधारण अपेक्षा होत्या. युद्धाची प्रत्यक्ष झळ अमेरिकेला लागली नव्हती तरीही युद्धोत्तर काळात शासनाला सर्वात मोठी जबाबदारी उचलावी लागेल असे तेथील दोन्ही राजकीय पक्षांना वाटत होते.

एका पाठोपाठ तीन प्रकाशकांनी पुस्तक छापण्यास नकार दिला. एका प्रकाशकाने तर, 'हे पुस्तक कोणा मान्यवर प्रकाशकाने छापण्याच्या लायकीचे नाही' असा शेरा मारला. खुल्या अर्थव्यवस्थेचा पाठीराखा, भांडवलशाहीचा गड्डा समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतही कोणी नव्हता. मोठ्या जिकिरीने शेवटी शिकागो विद्यापीठाच्या प्रकाशनाने ते स्वीकारले; पण त्यासाठी अमेरिकन परिस्थितीत हायेकच्या विचारांचा नेमका अर्थ आणि निष्कर्ष काय यासंबंधी काही मजकूर घालण्याची अट लादली.

१० मार्च १९४४ रोजी इंग्लंडमध्ये पहिली आवृत्ती निघाली, फक्त दोन हजार प्रतींची. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपर्यंत हे पुस्तक वर्तमानपत्रांत, एवढेच नव्हे तर पार्लमेंटमधील चर्चांतही गाजू लागले. अमेरिकेत पुस्तकाचे स्वागत होण्यास थोडा वेळ लागला; 'रागाच्या भरात लिहिलले चोपडे' अशी उपेक्षा झाली; नंतर, पुस्तकावर अर्वाच्य शिव्यांचा भडीमारही झाला. नंतर पुस्तकाच्या लागोपाठ आवृत्त्या निघाल्या; अनेक भाषांतरेही झाली.

१९९२ साली हायेक मरण पावला, त्यावेळी या पुस्तकाच्या लक्षावधी प्रती छापल्या गेल्या होत्या आणि 'समाजवादाच्या पाडावानंतर खुल्या व्यवस्थेचा आणि स्वातंत्र्याचा विचार मांडणारे सर्वांत महत्त्वाचे पुस्तक' अशी त्याला मान्यता मिळालेली होती.

भारताच्या स्वातंत्र्याच्या अर्धशताब्दीच्या जल्लोशात हायेकच्या 'गुलामगिरीची वाट' या पुस्तकाचा कोठे उल्लेख झाला नाही. जर्मनीत हिटलरचा भस्मासुर उभा राहिला, रशियात समाजातील शोषितांचे राज्य स्थापन करण्याच्या स्वप्नातून स्टॅलिन निघाला. इंग्लंडमध्ये या इतिहासाची पुनरावृत्ती होण्याचे थोडक्यात टळले. दुसऱ्या महायुद्धानंतर तेथे समाजवादी सरकार आले. राष्ट्रीयीकरण आणि नियोजनाच्या घोषणा सुरू झाल्या. पण, ते सरकार सहा वर्षेच टिकले. त्यानंतर आलेल्या हुजूर पक्षासही नियोजनाचाच मार्ग अवलंबावा लागला. इंग्लंडच्या लोकशाही परंपरांची ताकद इतकी जबरदस्त की सरकार हुकूमशाही बनले नाही; पण, नागरिक झपाट्याने अकार्यक्षम बाहुली बनले. मागरिट थॅचर पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी समाजवादी

नियोजनाच्या कल्पनांचा खुले आम विरोध केला, कार्यक्षमता आणि उत्पादकता यांना महत्त्व दिले. परिणामत:, आज पुन्हा सत्तेवर आलेला मजूर पक्षसुद्धा राष्ट्रीयीकरण, नियोजन असली भाषा वापरत नाही. इंग्लंड हुकूमशाहीच्या जबड्यातून सहीसलामत निसटले याचे मोठे श्रेय हायेकच्या पुस्तकास आहे.

दुर्दैवाने, भारतात हायेकची उपेक्षा झाली. समाजसत्तावादाची डाळ इंग्लंडमध्ये फारशी शिजली नाही, पण तेथून प्रेरणा घेतलेल्या नेहरू-मेनन इत्यादींनी नियोजनव्यवस्था भारतावर लादली. त्यातून हुकूमशाही प्रवृत्ती अक्राळविक्राळ बनू पाहत असतानाच सोव्हिएट युनियनमधील समाजवादाचा पाडाव झाल्याने आपण हुकूमशाहीच्या विळख्यातून केवळ नशिबाने वाचलो.

पण, संकट टळलेले नाही. समाजवादी नियोजनाचे दिवाळे वाजले तरी नियोजनाचे प्रस्थ कमी झालेले नाही. गरिबी दूर करणे, बेरोजगारी संपविणे, शिक्षण आरोग्याची व्यवस्था करणे, पर्यावरणाचा विनाश थांबविणे, मागासवर्गीयांना सामाजिक न्याय मिळवून देणे इत्यादि इत्यादि वेगवेगळ्या कारणांसाठी सरकारशाही आणि नोकरशाही फोफावतेच आहे. धर्म, जाती, राष्ट्र इत्यादि गोंडस नावांखाली सरकारच्या हातीच सत्ता एकवटण्याचे प्रयत्न चालू आहेत. हिटलरची पुनरावृत्ती इंग्लंडमध्ये झाली नाही, ती येथे भारतात होण्याची मात्र सारी अमंगल लक्षणं दिसत आहेत. कोणी भारतीय हायेक उभा राहिला तरच ठोकशाहीच्या जबड्यातून भारत वाचू शकेल अन्यथा आशेला फारशी जागा दिसत नाही.

*(२८ सप्टेंबर १९९७)*

■■



# एका पाठ्यपुस्तकाचीही अर्धशताब्दी!

१९५२ मध्ये अभ्यासक्रमातील विषय म्हणून अर्थशास्त्राशी संबंध आला. त्या काळात अर्थशास्त्राचे पाठ्यपुस्तक म्हणून Benham नावाच्या इंग्लीश प्राध्यापकाच्या पुस्तकाला प्राध्यापकांत मोठी मान्यता होती. म्हणून 'बरे' विद्यार्थी तेच पुस्तक वापरत. शिवाय, अर्थशास्त्रातील वेगवेगळ्या प्रकरणांसाठी वेगवेगळी पुस्तके पाहावी लागत. मूल्यसिद्धांताकरिता मेयर, आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी एम्सवर्थ वगैरे वगैरे. न. वि. गाडगीळांनी 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' नावाचे पुस्तक लिहिले होते, ते बेनहॅमच्या या पुस्तकाचे ढीलेढाले रूपांतर म्हटले जाई. एका चांगल्या विद्यार्थ्याने एक दिवस हल्लकल्लोळ उडवून दिला. 'अरे, बेनहॅम कसले वाचता? सॅम्युअलसन पाहा.' सॅम्युअलसनकरिता वाचनालयात गेलो, नंबर लावून एकदाचे ते पुस्तक पाहायला मिळाले. किमती कश्या ठरतात याचे विवेचन फक्त या वेळी सॅम्युअलसनमधून वाचल्याचे आठवते. सॅम्युअलसनच्या या पाठ्यपुस्तकाचा तो पहिला परिचय.

आमच्या हाती आलेली ती पहिली आवृत्ती १९४८ मध्ये प्रकाशित झालेली. या पुस्तकाची अर्धशताब्दी हा मोठा रोमहर्षक इतिहास आहे. ५० वर्षांत या पाठ्यपुस्तकाच्या १५ आवृत्त्या निघाल्या आणि ४७ मुद्रणे. अतिशयोक्ती न करता असे म्हणता येईल की, पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांत गेल्या दोन पिढ्यांतले, अर्थशास्त्राचे जे जे म्हणून विद्यार्थी आहेत त्यांचा त्यांचा पिंड सॅम्युअलसनने पोसला आहे. पहिल्या आवृत्तीपासून या पुस्तकाचे प्रचंड स्वागत झाले. एका मागोमाग एक आवृत्त्या आणि त्याच त्याच आवृत्तीची पुन्हा पुन्हा मुद्रणे. लवकरच फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्वीडिश, पोर्तुगीज, जपानी इत्यादी भाषांत भाषांतरे झाली. सोवियत युनियनमध्ये प्रकाशित झालेली रशियन आवृत्ती हातोहात संपली. स्टॅलिनच्या काळात तेथील वाचनालयात हे पुस्तक 'फक्त खाशांकरिता' असलेल्या बंद कपाटात ठेवले जाई असे म्हणतात. लोकप्रियता इतकी शिगेला पोहोचली की एका पत्रकाराने एकदा गमतीने म्हटले की एकाधिकारविरोधी कायद्याखाली या

पुस्तकावर बंदी आणली पाहिजे!

सॅम्युअलसन हे गाजलेले अर्थशास्त्रज्ञ. अमेरिकेतील MIT संस्थेच्या अर्थशास्त्राच्या विभागात प्राध्यापकांच्या खोलीत डझनभर नोबेल पारितोषिक विजेते एकाच वेळी आढळतात, त्या विभागाचे संस्थापक. स्वत: अर्थशास्त्राचे नोबल पारितोषिकाचे पहिले अमेरिकन विजेते. अर्थशास्त्रातील अनेक प्रश्नांवर नवीन प्रकाश पाडणारे. प्रेसिडेंट केनेडींनीही नंतर त्यांना खास सल्लागार म्हणून नेमले होते.

१९४५ मध्ये युद्ध संपले. १९२९ च्या आर्थिक मंदीचा मागमूसही शिल्लक नव्हता. युद्धकाळात उत्पादन मोठ्या तेजीत चालू होते. जर्मनी आणि जपान उद्ध्वस्त होऊन त्यांच्या पुनर्बांधणीकरिता 'मार्शल प्लान' ची सुरुवात झाली होती. हे सगळेच वातावरण अर्थशास्त्रातील सिद्धांतांना अनोळखी होते. नवी आर्थिक परिस्थिती समजावून सांगणाऱ्या पुस्तकाची गरज होती. अशा परिस्थितीत अर्थशास्त्रासंबंधी एक पाठ्यपुस्तक लिहिण्याची विनंती सॅम्युअलसन यांना करण्यात आली. एवढ्या मोठ्या अर्थशास्त्रज्ञाने पाठ्यपुस्तक लिहावे ही काही फारशी प्रतिष्ठेची बाब झाली नसती. त्यामुळे, हे काम स्वीकारण्यास सॅम्युअलसन तयार होत नव्हते. पण, त्याच वेळी दोन नोबेल पारितोषिकांचे विजेते पॉलिंग यांचे रसायनशास्त्रावरील पुस्तक बाजारात आले होते. अशा काही उदाहरणांमुळे हे धाडस अंगिकारण्याचे त्यांनी ठरविले.

आणि इतिहास घडला. जवळ जवळ दरवर्षी या पाठ्यपुस्तकाची नवीन आवृत्ती निघते आणि प्रत्येक आवृत्तीत नवीन घटना आणि नवीन समस्या यांचा परामर्श घेतला जातो.

पुस्तकाच्या १६ व्या आवृत्तीच्या विशेष प्रस्तावनेत प्रा. सॅम्युअलसन रास्त अभिमानाने सांगतात की, लंडन येथील जगद्विख्यात अर्थशास्त्राच्या संस्थेतील एका वेळचे विद्यार्थी जगाच्या साऱ्या भागांतून आलेले, आफ्रिकेतील जंगलांपासून आशियातील भातखाचरांपर्यंत; या सर्वांमध्ये समानता एकाच बाबतीत होती; अर्थशास्त्राचे पाठ्यपुस्तक म्हणून सर्वांनी सॅम्युअलसनच वापरले होते.

जपानी भाषांतराच्या आवृत्त्या इतक्या खपल्या की भाषांतरकर्ते डॉ. त्सू केवळ मानधनावर कोट्यधीश बनले. आणखी एक गमतीचा प्रसंग प्रा. सॅम्युअलसन सांगतात. त्यांच्या पुस्तकाच्या एका आवृत्तीत असा उल्लेख होता की, 'मॅनहटन बेट गोऱ्यांनी रेड इंडियनांकडून फक्त २४ डॉलरला विकत घेतले. त्या रकमेवर आजतागायत ६ % चक्रवाढ व्याजाने हिशेब केला तर येणारी रक्कम मॅनहटनच्या आजच्या संपत्तीइतकीच असेल.' एका वाचकाने या हिशेबाबद्दल शंका प्रदर्शित



केली. सॅम्युअनसाहेबांच्या सहकाऱ्यांनी सारा हिशेब पुन्हा मांडला आणि त्या वाचकाला लिहिले, 'सहा टक्क्याने जमत हिशेब नसेल तर साडेसहा टक्क्याने आकडेमोड करून बघा.'

वेगवेगळ्या शास्त्रांत वेळोवेळी मोठे मोठे शास्त्रज्ञ नवे नवे शोध लावतात; काही नवी मांडणी करतात. त्यांच्या सिद्धांतांमुळे त्यांच्या विषयाची एक नवीच समज येऊन जाते. सूर्य पृथ्वीभोवती फिरत नसून पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे सांगणारा कोपर्निकस, गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत सांगणारा न्यूटन, अर्थशास्त्रात 'राष्ट्रीय संपत्ती' चा लेखक ॲडम स्मिथ किंवा जनरल थिअरी मांडणारा प्रा. केन्स ही अशी मंडळी त्यांच्या नवीन संशोधनाने प्रगतीच्या मार्गावरील दीपस्तंभ ठरतात. पण, विद्यार्थ्यांकरिता पाठ्यपुस्तक लिहून केवळ प्रकाशनाचा इतिहास घडविला असे नव्हे तर, अनेक अर्थांनी जगभरच्या सर्व राष्ट्रांतील धुरीणांच्या विचारपद्धतीला आकार दिला असा चमत्कार घडविणारे सॅम्युअलसनचे 'अर्थशास्त्र' हे एकमेव पुस्तक आहे.

दोन पिढ्यांतील अर्थशास्त्राचा पिंड पोसणारे पाठ्यपुस्तक हे अभिधान गौरवास्पद आहे हे नि:संशय. पण, त्याबरोबरच दुसराही प्रश्न उपस्थित होतो. या काळात अर्थशास्त्राला आणि अर्थशास्त्र्यांना मान्यता मिळाली, सरकारी आणि खाजगी क्षेत्रांत त्यांचा सल्ला घेतला जाऊ लागला हे खरे. पण त्याबरोबर अर्थशास्त्र्यांनी ज्या काही चुका केल्या त्याची जबाबदारीही या पुस्तकाला स्वीकारावी लागेल.

अर्थशास्त्र्यांत कधी एकमत म्हणून नसते. 'दहा अर्थशास्त्र्यांना सल्ला विचारा, त्यांच्यातील अकरा उत्तरे केन्स साहेबांची असतील' ही उक्ती प्रसिद्धच आहे. केन्सचे या टिकेला प्रत्युत्तर मोठे जबरदस्त होते. 'परिस्थिती बदलली म्हणजे मी मते बदलतो!' तो म्हणे, 'तुम्ही काय करता?' हा वर प्रतिप्रश्न !

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रूमन म्हणत, 'कोणी एक हातवाला अर्थशास्त्रज्ञ असला तर मला पाहिजे. एका बाजूस... आणि दुसऱ्या बाजूस... असली भाषा करणारा नको.'

पण कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रश्नाच्या वेगवेगळ्या बाजू, वेगवेगळे दृष्टिकोन मांडणे हेच अर्थशास्त्र्यांचे महत्त्वाचे काम आहे. धोरणांसंबंधी अनेकविध विकल्पांतून नेमका कोणता पर्याय निवडायचा हा निर्णय बहुतांशी राजकीय फूटपट्टीनेच घेतला जातो.

५० वर्षांच्या आपल्या आमदानीत सॅम्युअलसनने एक प्रकारचा

ठोकळेबाजपणा विद्यार्थ्यांमध्ये पसरवला हे कबूल करावे लागेल.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात सर्वत्रच नियोजनाचा बोलबाला होता. अगदी अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशांतदेखील सरकारी देखरेखीखेरीज आणि हस्तक्षेपाखेरीज अर्थव्यवस्था चालू शकेल असे मानणारे कुणी नव्हते. बहुतेक युरोपीय देशही नियोजनाची कास धरत होते. मागासलेल्या तिसऱ्या देशांत तर आर्थिक नियोजन म्हणजे विकासाची गुरुकिल्ली वाटत होती. त्या काळात सॅम्युअलसनच्या 'अर्थशास्त्रा'त केन्सप्रणीत वित्तीय हस्तक्षेप, मिश्रव्यवस्था आणि नियोजन यांच्या उपयुक्ततेवर मोठा भर होता; इतका की, कम्युनिस्टांच्या हालचालींवर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या 'मॅकार्थी समिती'ने या पुस्तकातील डाव्या अर्थशास्त्राची दखल घ्यावी असे काही विरोधक म्हणत. गंमत म्हणजे त्याच वेळी काही डाव्या मंडळींनी हे पुस्तक खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेचे फारच समर्थनकर्ते आहे अशा टीकेचा भडीमार केला, एवढेच नव्हे तर 'सॅम्युअलसनविरोध' नावाचे एक पुस्तकही प्रसिद्ध केले.

१६ व्या आवृत्तीपासून या पाठ्यपुस्तकातील मांडणीचा सूर बदलू लागला, मजकुरात बाजारपेठेच्या कार्यक्षमतेला हळूहळू मान्यता येऊ लागली आणि आज, शेवटची आवृत्ती खुल्या अर्थव्यवस्थेतील बाजारपेठेच्या व्यवस्थेचे जबरदस्त समर्थन करणारी झाली आहे. परंतु, आजही राष्ट्राच्या पातळीवर रोजगार, उत्पादन, किंमती, विनिमयाचा दर यासंबंधीची पुस्तकातील मांडणी ठोकळेबाजच आहे.

पाठ्यपुस्तकाने प्रचारकाचा थाट आणण्याचा मोह टाळला पाहिजे.

सॅम्युअलसन यांनी म्हटले आहे की, 'कायदेमंडळात बसून कायदे करण्याचे काम कोणीही करो, मला त्या देशातील अर्थशास्त्राचे पाठ्यपुस्तक लिहू द्या; देशाचे भवितव्य मी ठरवीन.'

या अभिनिवेशापोटीही हा दोष आला असेल; पण, जेव्हा जेव्हा अर्थशास्त्राचा विषय निघेल तेव्हा तेव्हा सॅम्युअलसनच्या 'अर्थशास्त्रा'चे नाव घेतल्याखेरीज पाऊल पुढे पडू शकत नाही.

*(५ ऑक्टोबर १९९७)*

■■



# पीडेची जाणीव आणि नैतिकता

खुल्या अर्थव्यवस्थेची सुरुवात झाल्यापासून वाचकांच्या कानी ॲडम स्मिथ या अर्थशास्त्रज्ञाचे नाव वारंवार पडत आहे. मराठी साहित्यात ज्ञानेश्वरीचे जे स्थान आहे तेच स्थान अर्थशास्त्रात त्याने १७७६ मध्ये लिहिलेल्या 'राष्ट्रांची संपत्ती' (Wealth of Nations) या पुस्तकाचे आहे. स्मिथने श्रमविभागणी, विशेषीकरण (Specialisation) या अर्थशास्त्रातील अगदी प्राथमिक सिद्धांतांपासून ते किंमती, बाजारपेठा, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि खुल्या अर्थव्यवस्थेचे तत्त्व अशा यच्चयावत् आर्थिक प्रश्नांवर अत्यंत प्रसादपूर्ण गद्यात सारे विस्तृतपणे या पुस्तकात मांडले आहे. 'व्यासोच्छिष्टम् जगत् सर्वम्।' याच पद्धतीने अर्थशास्त्रात सारे काही २२० वर्षांपूर्वी स्मिथने स्पर्शून टाकले आहे असे म्हणता येईल. खुल्या व्यवस्थेचे निंदक आणि आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्यांची ''तुम्ही म्हणजे Laissez-faire 'जो जे वांछेल, तो ते करो' वाले वाटतं?'' अशी कुचाळकी करतात ते ॲडम स्मिथच्याच संदर्भात. ॲडम स्मिथचा जन्म १७२३ साली झाला; म्हणजे, महाराष्ट्राच्या इतिहासात पेशव्यांनी आपली राजधानी पुणे येथे आणली त्या सुमारास. ग्लासगो, ऑक्सफोर्ड या दोन्ही विद्यापीठांत तो प्राध्यापक होता; केवळ २९ व्या वर्षी नैतिक तत्त्वज्ञान या विषयाचा प्राध्यापक झाला. भाषांचा प्राथमिक उगम, शब्दशास्त्रातील विविध प्रश्न इत्यादी अनेक विषयांवर त्याने लिहिले आहे.

'राष्ट्रांची संपत्ती' हे पुस्तक प्रकाशित झाले आणि त्याला तत्काळ प्रसिद्धी मिळाली. त्याबद्दल केवळ इंग्लंडमध्येच नव्हे, तर युरोपीय देशांतदेखील चर्चा गाजू लागल्या. आपल्याकडे नारायणराव पेशव्यांच्या खुनाचे कारस्थान शिजत होते त्या वेळी विलायतेत कुतुहलाचे आणि अभ्यासाचे विषय कोणते होते हे पाहिले म्हणजे आश्चर्यही वाटते आणि शरमही. 'राष्ट्रांची संपत्ती' या जगद्विख्यात पुस्तकात मनुष्यप्राण्याच्या अहम्प्रेरणेला आणि अर्थप्रवृत्तीला महत्त्वाचे स्थान आहे. ज्याला त्याला अर्थप्रेरणेने चालण्याचे स्वातंत्र्य मिळाले तर व्यक्तीचे लौकिक जीवन संपन्न होते एवढेच नव्हे, तर राष्ट्रेही संपन्न बनतात हा ॲडम स्मिथचा क्रांतिकारी सिद्धांत.

सिद्धांत. अनेकांची त्यामुळे अशी गैरसमजूत होते की ॲडम स्मिथचे सारे अर्थशास्त्र निव्वळ स्वार्थाने प्रेरित झालेल्या मनुष्याच्या गृहीततत्त्वांवर आधारलेले आहे. त्याचा सारा विचार फायद्यासाठी हपापलेल्या माणसांसंबंधी आहे अशीही कुचेष्टा डावी मंडळी करीत असतात.

'राष्ट्रांची संपत्ती' च्या प्रकाशनाआधी १७ वर्षे म्हणजे १७५९ मध्ये ॲडम स्मिथने 'नैतिक भावनांचा सिद्धांत' या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकानेही त्या काळात अनेकांचे लक्ष वेधून घेतले होते. पण नंतर 'राष्ट्रांची संपत्ती'चे यश इतके देदीप्यमान ठरले की त्या तुलनेने नैतिक भावनांसंबंधीच्या पुस्तकाचा बहुतेकांना विसर पडला.

चांगली वर्तणूक म्हणजे काय? न्यायाने, औदार्याने आणि विवेकाने माणसाने आपले जीवन व्यतीत करावे हे सर्वच संस्कृतीत मानले गेले आहे; अगदी, 'मनाच्या श्लोकां'तही. या तीनही गुणांचा समुच्चय महत्त्वाचा आहे. केवळ विवेकाने, केवळ औदार्याने किंवा केवळ न्यायबुद्धीने चालायचे म्हटले तर आयुष्याला काही हिडीस विक्राळ रूप येण्याची शक्यता असते.

पण याहून महत्त्वाचा प्रश्न: अर्थप्रेरणेने भारलेला अहमूकारी माणूस न्याय, विवेक, औदार्य असल्या मार्गांचा विचार तरी का करतो? मिळेल ते, मिळेल तसे व जमेल तेथून ओरबाडून जिंकण्याचा, उपभोग घेण्याचा अट्टाहास तो का धरत नाही? स्वार्थ ही मूलभूत प्रेरणा असेल तर दया, करुणा, दातृत्व इत्यादिंचा उद्भव होतोच कसा?

नैतिक भावनांचा उगम शुद्ध स्वार्थभावनेतूनही होऊ शकतो. स्वार्थीपणा अगदीच संकुचित म्हणजे आपल्या पावलापुरता पाहणारा आणि आहे त्या क्षणाचाच विचार करणारा असू शकत नाही. आपण भरपेट खातो आहोत आणि आजूबाजूची मंडळी मात्र उपाशी आहेत, हावरेपणाने आपल्या ताटाकडे पाहत आहेत यात सुग्रास जेवणाऱ्याचे सुखही दुखावते आणि आजूबाजूच्या मंडळींना काहीतरी देऊन मग अन्नग्रहण करण्याची भावना होते. जेवायला बसण्याआधी दरवाजाबाहेर जाऊन 'कोणी भुकेला याचक असेल तर त्याने भोजनास यावे' असे निमंत्रण मोठ्याने ओरडून, आलेल्या याचकाचे समाधान केल्यानंतरच तोंडात घास घालण्याच्या परंपरेपर्यंतही व्यापक स्वार्थाची कल्पना जाऊ शकते.

आज खिसे कापून, दरोडे घालून, लूटमार करून आपली गरज भागू शकेल खरी; पण या तऱ्हेने सर्वजण वागू लागले तर मग अशी गुन्हेगारी, दंडेली फारशी



फायद्याची राहणार नाही. तेव्हा दारा, संपत्ती यांच्या वाटपाबद्दल अधिक सुसंस्कृत, न्याय आणि विवेक यांवर आधारलेली व्यवस्था मनुष्यप्राणी स्वीकारतात. थोडक्यात, नि:स्वार्थ वाटणारी वागणूक दीर्घकालीन व्यापक स्वार्थाचीच असते असे म्हणता येईल. अशी मांडणी आजही निखळ अर्थवादी आणि जडवादी करीत असतात. जवळ जवळ अडीचशे वर्षांपूर्वी स्मिथने या चमत्काराचा उलगडा केला होता, त्याकडे सार्वजनिक दुर्लक्ष झाले हे मोठेच दुर्दैव.

रस्त्यात पडलेला माणूस पाहून त्याला मदत करण्यासाठी जावे अशी भावनातरी बहुतेकांच्या मनांत तयार होते. कामाच्या घाईच्या किंवा दुसऱ्या काही अडचणींच्या सबबी मनावर थोपवून बहुतेक लोक मन घट्ट करून पुढे निघून जातात; 'मदर तेरेसा' एखादीच. पण तरी, सहानुभूतीची भावना मनात उद्भवते यात काही शंका नाही. अपघातात जखमी होऊन पडलेला माणूस पाहणे अनेकांना आवडत नाही. निष्प्राण कलेवर पाहणे तर बहुतेकांना कठीण होते. डॉक्टर शस्त्रक्रिया करत असताना बाजूला उभे राहून नुसते पाहणाऱ्यालाही चक्कर येते. या सर्व कोमल भावनांचा उगम काय? याचे उत्तर २३८ वर्षांपूर्वी ॲडम स्मिथने सांगितले.

माणसाचा मेंदू संरक्षण, पोषण आणि प्रजनन या तीन पुरुषार्थांसाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करतो, त्याची वर्गवारी लावून ती नीट साठवून ठेवतो; वेगवेगळ्या घटनांमध्ये कार्यकारणभाव शोधतो आणि नवनवीन अनुभव येतील त्याप्रमाणे आधीचे निष्कर्ष बदलत जातो. सर्वसाधारण संसारात, व्यवहाराच्या धकाधकीत आयुष्य कंठणाऱ्यांच्या बुद्धीच्या चलनवलनात हेच काम बहुतांशाने होत असते. पण माणसाच्या बुद्धीची अणखीही एक प्रवृत्ती आहे. आसपासच्या निर्जीव वस्तूंविषयी माहिती गोळा करण्याचे तंत्र वेगळे आणि सजीव जाणिवा घेण्याचे तंत्र वेगळे.

दुसऱ्या मनुष्यप्राण्याविषयी विचार करताना मेंदूची काम करण्याची पद्धतीच अशी आहे की आपण त्या माणसाच्या जागी आहोत असे चित्र मनात तयार होते आणि आपल्याला काय वाटले असते, आपली स्थिती काय झाली असती असा विचार मनात आल्याने सहानुभूती, करुणा, औदार्य, दया अश्या भावना उपजतात. अपघातात जखमी होऊन पडलेला माणूस पाहिला म्हणजे 'अश्या जखमा आपल्याला झाल्या असत्या तर?' अशी कल्पना तयार होणे निसर्गसिद्ध आहे. डॉक्टर जखमा शिवत असताना पाहणाऱ्याच्या मनात, शिवणाचा टाका आपल्याच शरीरात पडत आहे अशी संवेदना तयार होते आणि तो विचार असह्य झाल्यामुळे

चक्कर येते.

दुसऱ्या माणसांविषयी विचार करताना अश्या तऱ्हेने परकायाप्रवेश करणे ही मनुष्यप्राण्याची सहजसिद्ध प्रवृत्ती आहे. दुसऱ्याचे दु:ख, वेदना जाणणारे संतमहात्मे दुसऱ्याच्या दु:खाने कळवळतात ते त्यांनी कष्टसायासाने कमावलेल्या थोरपणामुळे ही कल्पना बरोबर नाही. संतमहात्मे निसर्गसिद्ध सहअनुभूतीची प्रकृती जपतात. म्हणून, 'वैष्णव जन तो तेणे कहिए । जो पीड परायी जाने रे ॥'' इतरेजन व्यवहाराच्या धबडग्यात या प्रवृत्तीला मुरड घालतात; खुनी, दरोडेखोर इत्यादि या प्रवृत्ती मनातून बिलकूल उपटून टाकून देतात.

परकायाप्रवेशाने अनुभूती घेण्याचे क्षेत्रदेखील कमीजास्त होऊ शकते. केवळ मनुष्यप्राण्याबद्दलच नाही तर, जनावरे, पक्षी, पशू, कीटक इत्यादिपर्यंत परकायाप्रवेशाने सुखदु:खाची अनुभूती घेणारे असतात; झाडे, वेली यांच्याशीही हितगूज करणारी मंडळी असतात. या उलट, आपल्यासारख्याच मनुष्ययोनीत जन्मलेल्या प्राण्यांबद्दलही संवेदना तयार होऊ नयेत यासाठी परकायाप्रवेशाचे इंद्रिय काही अंशी बंद राहील अशी तजवीज करता येते. भावाभावांत भांडण लागले आणि त्यातील एकाचे काही वाईट झाले तर त्याचे दु:ख मनाला लागू नये अशी कठोरता तयार करता येते. 'दलितांनी आमची बरोबरी करायला कशाला यावे?' असे म्हणणाऱ्यांनी आपले निसर्गसिद्ध संवेदना जाणण्याचे इंद्रिय दलितांच्या विषयी खच्ची केलेले असते. हिंदू-मुसलमानांच्या दंग्यात 'आपले किती मेले आणि त्यांचे किती?' असा विचार येणाऱ्यांनी आपले हे इंद्रिय एका समाजापुरते असेच बधिर केलेले असते. पाकी, चिनी असे द्वेषपूर्वक उल्लेख करून त्या समाजांतील लोकांशी असलेले परकाया प्रवेशाचे संबंध युद्धकाळात जाणीवपूर्वक तोडण्यात येतात.

मनुष्यप्रकृती एकसूत्री नाही. त्यात अर्थप्रवृत्ती आहे तितकीच निसर्गसिद्ध करुणेची भावना आहे. अर्थप्रवृत्ती आणि करुणा दोन्ही सारख्याच नैसर्गिक आहेत. या भावनेला शास्त्रीय आधार देणारा ॲडम स्मिथ केवळ 'Laissez-faire म्हणजे जो जे वांछील तो ते करो' या करिता इतिहासात अजरामर व्हावा हीही दैवगतीच म्हणावी लागेल!

*(१२ ऑक्टोबर १९९७)*

■■



## सत्याग्रह – एक कर्तव्य

१९०७ मधली गोष्ट. मोहनदास करमचंद गांधी नावाचे एक बॅरिस्टर दक्षिण आफ्रिकेतल्या वंशभेदाच्या धोरणाविरुद्ध संघर्ष कसा उभा करावा या चिंतेत होते. त्यांच्या हाती केवळ योगायोगाने अमेरिकेतील कोण्या थोरो नावाच्या लेखकाचे 'सत्याग्रहाचे कर्तव्य' हे पुस्तक पडले. चमत्कारिक गोष्ट अशी की, महात्मा गांधींच्या 'टॉलस्टॉय फार्म' प्रमाणेच हा लेखक थोरोही 'वाल्डेन' नावाच्या गावी मठी बांधून स्वकष्टाने अन्नधान्य पिकवून राहत होता. गांधीजींना थोरोचे अनुभव वाचून कोणी समानधर्मा भेटल्याचा आनंद झाला. त्यापुढे जाऊन थोरोने सविनय कायदेभंगाच्या साधनाचा सिद्धांत मांडला होता, त्याचे समर्थन केले होते. एवढेच नव्हे तर, प्रत्येक सुजाण नागरिकाने त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला न पटणाऱ्या कोणत्याही शासकीय धोरणाविरुद्ध सविनय कायदेभंग करून त्याबद्दल देहदंड भोगण्याची तयारी ठेवणे हे कर्तव्य आहे, असे मांडले होते. गांधीजींनी त्यावेळी 'Passive Resistance' च्या स्वरूपाची चळवळ सुरू केली होती. सविनय कायदेभंगाच्या या प्रतिपादनाने त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला.

गांधींचे एक निकटचे सहकारी हेन्री पोलॅक लिहितात की,त्यांच्या लिखाणावरून असे दिसते की थोरोचे पुस्तक वाचेपर्यंत चळवळीच्या सिद्धांताबद्दल गांधीजींवर सॉक्रेटीस या ग्रीक तत्त्ववेत्त्याचा प्रभाव होता. सॉक्रेटीसवर ग्रीक देवतांवर विश्वास न ठेवण्याच्या आणि आपल्या शिकवणुकीने तरुणांची मने बिघडविण्याचा आरोप होता. ५०१ जणांच्या ज्यूरीने त्याला मृत्युदंड सुनावला होता. त्याआधी, सॉक्रेटीसने २४ प्रकरणांचा विस्तृत बचाव दिला होता. कोणाही एका व्यक्तीची सदसद्विवेकबुद्धी कोणाही शासनाच्या कायदेकानूपेक्षा श्रेष्ठ आहे, तरुणांनी विचार करायला शिकावे आणि कोणाचाही अधिकार न मानता सत्याची कास धरावी यापलीकडे आपण काही शिकवले नाही, अशी त्याने स्वत:ची कैफियत मांडली.

सॉक्रेटीस तुरुंगात असतांना त्याचा एक मित्र तेथे आला आणि मृत्युदंडापासून सोडवणूक करण्यासाठी तुरुंगातून पळून जाण्याची त्याला विनंती करू लागला.

त्यावेळी सॉक्रेटीसने त्याला सांगितले. 'शासनाने चूक केली म्हणून मीही करावी असे नाही.' जाणीवपूर्वक ग्रीक शासनाचा कायदा त्याने मोडला आहे, आता त्याचे परिणाम टाळण्याकरिता पळून जाणे चुकीचे होईल, त्याला दिलेली शिक्षा अन्यायाची आहे पण ती शिक्षा सहन करणे हेच त्याचे कर्तव्य आहे याबद्दल सॉक्रेटीसने केलेला युक्तिवाद 'क्रिटो' नावाच्या ग्रंथात मांडला गेलेला आहे. गांधीजींवर त्याचा मोठा प्रभाव होता. सॉक्रेटीसची भूमिका मन हलवून टाकण्याइतकी उदात्त होती, पण राज्यशास्त्रातील त्याचे व्याकरण स्पष्ट नव्हते. शासन म्हणजे काय? व्यक्ती आणि समाज यांचे संबंध काय? कोणा नागरिकाच्या विवेकबुद्धीला न पटण्यासारखे धोरण कोणते सरकार राबवू लागले तर शासकीय जबरदस्ती चुपचाप सहन करण्यापलीकडे त्याने काहीच करू नये काय? या साऱ्याच विषयांवर थोरोची मांडणी मोठी बिनतोड होती.

थोरोचा जन्म १८१७ सालचा. अमेरिकेतील कॉंकार्ड गावचा. बाप फ्रेंच आणि आई स्कॉटलंडची. घरची परिस्थिती बेताबेताचीच. हॉर्वर्ड विद्यापीठात शिकताना काही विशेष बुद्धीची चमक त्याने दाखविली नाही. स्वभावातील बंडखोरीचा एक नमुना: रविवारी चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जाताना तो हिरवा कोट घालून जाई, कारण काय तर काळा कोट घालून जाण्याचा नियम आणि संकेत होता. कॉंकार्डला परतल्यानंतर त्याने काही काळ शिक्षकाची नोकरी केली. काही काळ एक छोटीशी शाळाही चालवली आणि अनेक सटरफटर कामे केली. निसर्गाच्या सान्निध्यात राहावे, वाचावे, लिहावे, मनन चिंतन करावे याची त्याला सहज गोडी होती. सहा दिवस काम आणि रविवारी विश्रांती याच्या नेमके उलट करून आठवड्यात एकच दिवस काम करण्याचा कार्यक्रम आखला. अधिकाधिक कार्यक्षमतेने अधिकाधिक उत्पादन करावे, जीवनमान वाढवावे यात त्याला काहीच स्वारस्य नव्हते.

१८४३ मध्ये त्याला अटक झाली. निवडणुकीचा खर्च भागविण्यासाठी नागरिकांवर एक कर लादण्यात आला होता, तो कर भरण्यास त्याने नकार दिला हा त्याचा गुन्हा. अमेरिकेतील गुलामगिरीच्या प्रश्नावर त्यावेळी मोठा संघर्ष उभा राहत होता. पळून गेलेल्या गुलामांना शोधून काढून पकडून आणणे हा मालकांचा हक्क आहे; त्यासाठी आवश्यक तर राज्यांच्या सरहद्दी ओलांडून ते दुसऱ्या राज्यात जाऊ शकतील, या शोधण्याच्या कामात त्यांना राज्याराज्यातील पोलिस आणि सरकारी अधिकाऱ्यांनी मदत केली पाहिजे अशी तरतूद करणारा एक कायदा



पसार झाला होता. काही गुलाम पळून दक्षिणेकडे शेजारच्या मेक्सिको देशात जाऊ लागले. मेक्सिकोतील अधिकारी गुलामांना पकडण्याच्या कामात मन:पूर्वक सहकार्य देत नाहीत अशा तक्रारी झाल्याने मेक्सिकोशीच युद्धाचा प्रसंग उभा राहिला. 'सरकार गोळा करीत असलेल्या कराची रक्कम घोर अन्यायी युद्धाकरिता वापरली जायची असल्यामुळे हा कर भरण्याची अनुमती माझी सदसद्विवेकबुद्धी मला देत नाही. कर न भरण्याबद्दल जो काही देहदंड असेल त्यासाठी माझी तयारी आहे,' असे प्रतिपादन थोरोने केले आणि सविनय कायदेभंगाच्या तंत्राची सुरुवात झाली.

या संघर्षामागे थोरोची एक तर्कशुद्ध भूमिका होती. अमेरिकन स्वतंत्रेच्या संग्रामात नेता थॉमस जेफरसन म्हणे, 'सगळ्यात कमी शासन करते ते सर्वोत्तम शासन.' थोरोची भूमिका थोडी वेगळी. 'अजिबात शासन करीत नाही ते शासन सर्वोत्तम.'

'शासन ही एक सोय आहे. पण बहुतेक सरकारे निव्वळ अडचणच असतात. खडी फौज ठेवणे जितके चुकीचे, तितके सदासर्वकाळ खडे शासन ठेवणेही चुकीचे.'

शासन काहीच करीत नाही. अमेरिकेतील सर्व विकास लोकांनी केला आहे. शासनाने हस्तक्षेप केला नसता तर याहीपेक्षा मोठी कामगिरी त्यांनी करून दाखवली असती. दुर्दैवाने अराजकाची व्यवस्थाही समाजाला भावत नाही, तेव्हा शासन तर असले पाहिजे. अनियंत्रित राज्यसत्तेपेक्षा नियंत्रित राजसत्ता बरी, त्यापेक्षा लोकशाही श्रेयस्कर. लोकशाहीत बहुमताने निर्णय घ्यायचे असतात. बहुमताचा पक्ष सत्याचा किंवा न्यायाचा असतो म्हणून नव्हे, तर पक्षापक्षात हातघाई झाल्यास बहुमतवाल्यांची सरशी होण्याची संभावना अधिक म्हणून बहुमताचे राज्य. पण याचा अर्थ, नागरिकांनी आपला आत्मा लोकप्रतिनिधींच्या संसदेत गहाण ठेवावा असा नाही. असत्य आणि अन्याय यांचा विरोध करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे आणि त्यासाठी आवश्यक तर शासनाच्या कायदेकानूंना आव्हान देण्याची त्याने तयारी ठेवली पाहिजे.

अन्यायी पद्धतीबद्दल नागरिकांचे कर्तव्य काय बनते? लोकजागरण करून बहुमत आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी प्रयत्न करणे श्रेयस्कर की तत्काळ अन्यायाचा जुलूम मोडून काढण्यासाठी उभे राहणे श्रेयस्कर?

शासनाचा स्वभावच राक्षसी असतो. शासन ख्रिस्ताला क्रूसावर चढवते; कोपर्निकस, ल्यूथरसारख्यांना वाळीत टाकते आणि जॉर्ज वॉशिंग्टनला बंडखोर म्हणते.

गुलामगिरीला विरोध करण्यासाठी हजार, दोन हजार नागरिक जरी कर भरण्यास नकार देऊ लागले तरी अन्यायाचा परिणामकारक प्रतिकार होऊ शकतो. पण

कायदेभंग करणाऱ्यांनी योग्य आणि न्याय्य कायद्याचे पालनही तितक्याच चोखपणे केले पाहिजे.

शासन व्यक्तीसाठी आहे, व्यक्ती शासनासाठी नाही. व्यक्तीची संमती असल्याखेरीज तिच्यावर कोणताही अधिकार चालवण्याचा शासनाला कोणातही अधिकार पोचत नाही.

महात्मा गांधींनी थोरोच्या प्रतिभेतून साकारलेल्या सविनय कायदेभंगाच्या हत्याराचा उपयोग केला. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सत्याग्रहाच्या आंदोलनाचा मोठा वाटा होता यात काही शंका नाही. लोकतंत्र प्रस्थापित झाले म्हणजे आता यापुढे कोणत्याही देशाच्या राज्यव्यवस्थेत काही सुधारणा होण्यास वावच राहिला नाही काय? प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर राज्यव्यवस्थेच्या उत्क्रांतीचा प्रवाह थांबला आहे काय? या प्रश्नांवर सध्या मोठी चर्चा चालू आहे. जपानमधील एक प्राध्यापक फुकूयामा यांनी आता यापुढे नवीन काही घडण्यासारखे नाही अशी भूमिका घेतली आहे. याउलट, लोकशाही सरकारे अर्थव्यवस्थेत हात घालू लागली की लोकांच्या स्वातंत्र्याचा आपोआप संकोच होतो. आर्थिक प्रलोभने दाखवून निवडणुकीत मते मिळवण्याची शक्यता तयार झाली की लोकशाही आपोआपच संपुष्टात येते. तेव्हा लोकशाही राज्याच्या निर्मितीनंतर शासनाकडून आर्थिक हस्तक्षेपांची सर्व सत्ता काढून घेणे हे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विकासासाठी आवश्यक आहे आणि हा प्रवास न संपणारा आहे.

शासनाने कायदा करावा आणि तो लोकांनी मानावा, अल्पसंख्याकांनी बहुमतवाल्यांची हुकूमशाही चूपचाप सहन करावी असे प्रतिपादन अनेक राजकारणी आणि घटनातज्ज्ञ मोठ्या संभावितपणे करतात. सरकार लोकांनी निवडून दिलेले आहे ना? मग त्याच्या विरुद्ध लोकांनी उठू नये; शासनाने ठरलेले शेतीमालाचे भाव मान्य करावे, जीवनावश्यक वस्तूंचा कायदा निमूटपणे अमलात आणावा, भूमिसंपादनाची अरेरावी सहन करावी, समान नागरी कायदा बिनतक्रार स्वीकारावा असे, भलेभले जाणते सज्जनही सांगतात.

थोरोचे पुस्तक आजच्या जमान्यात वाचणारा कोणी मोहनदास करमचंद गांधी भेटणे दुर्मिळ; नाही तर, 'स्वराज्यातील निवडणुकीत मतांच्या आधाराने सत्तेवर आलेल्या शासनालाही केवळ बहुमत आहे म्हणून, मला न पटणारी गोष्ट करणे भाग पाडता येणार नाही' असे ठामपणे सांगणारा कोणी महात्मा आजही उभा राहिला असता.

*(१२ नोव्हेंबर १९९७)*

■■



# डार्विनचे 'विश्वदर्शन'

खुली बाजारपेठ आणि स्पर्धेची व्यवस्था या विषयांवर चर्चा होत असली की डावी मंडळी फटकन प्रश्न विचारतात, "तुम्ही डार्विनवादी आहात काय?" ते हा प्रश्न अशा थाटात विचारतात की, डार्विनवाद म्हणजे काही धादांत असत्य आणि दुष्ट विचार असावा, असा भास व्हावा. तुम्ही रावणवादी काय? किंवा तुम्ही कंसवादी काय? असे विचारावे अशा थाटात हा प्रश्न विचारला की सारी चर्चाच थांबून जाते.

हा डार्विन कोण? त्याचा नेमका विचार काय? या विषयी सर्वसामान्य वाचकांत जाण तशी बेताबाताचीच असते. 'माणसाची निर्मिती माकडापासून झाली' असे मांडणारा म्हणून डार्विन ओळखला जातो. त्यापलीकडे त्याने नेमके काय म्हटले ? काय म्हटले नाही? त्याच्या सिद्धांताचा दूरवरचा परिणाम काय? याविषयी आपल्या देशात तरी फारशी कोणी चिंता करत नाही.

डार्विनचे 'प्राणिमात्रांची उत्पत्ती' (Origin of the Species) हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि सर्वच बाजूंनी टीकेचे काहूर उठले. खरे म्हणजे, माणसाची उत्पत्ती माकडापासून झाली असे डार्विनने मांडलेलेच नाही. एवढेच नाही तर, मनुष्य जातीच्या निर्मितीसंबंधी त्याने एक चकार अक्षरही काढलेले नाही. सर्वसामान्य प्राणिजगताची पाहणी करून अफाट माहिती गोळा करून एकेक पुराव्याने त्याने बिनतोड सिद्ध करून दिले की, प्राणिमात्रांच्या अवयवांत, जीवशास्त्रीय रचनेत काही विशिष्ट कारणांमुळे बदल घडत जातात. ही कारणे कोणती? माणसे घोडे पाळतात, कुत्रीमांजरीही पाळतात. त्यातल्या कोणत्या प्राण्याला पाळायाचे हे माणसांच्या सोयीने ठरते. पाळणाऱ्यांच्या सोयीचे गुणधर्म नसलेल्या प्राण्यांना कोणी पाळीत नाही. ज्याच्याकडे सोयीस्कर गुणधर्म असतात त्यांचा योगक्षेम व्यवस्थित चालतो. त्यांच्या प्रजोत्पादनात मोठ्या अडचणी येत नाहीत. त्यामुळे, अखेरीस सोयीस्कर गुणधर्म असणारे पाळीव प्राणी टिकून राहिले. वाघाची मनीमांजरी झाली. लांडग्याचे कुत्रे बनले. पाळीव प्राण्यांची उत्क्रांती आणि विकास पाळणाऱ्याची

सोय ठरवते.

पाळीव नसलेल्या इतर प्राण्यांच्या बाबतीत काय घडते? तेथे कोणी पाळणारा नसतो, पण तरीदेखील एक निवड सातत्याने होत असते. अधिक वेगवान, अधिक ताकदवान टिकून राहतात; त्यांचे प्रजोत्पादनही तसे सुरळीत होते. निसर्ग हा तसा कृपण आहे. सर्वच प्राणिमात्रांना लागणारे सर्व अन्नधान्य बसल्या जागी तोंडी आणून घालणाऱ्या आईची ममता निसर्गात नाही. निसर्गातील फळे ही प्रयत्नांनी मिळवावी लागतात. त्यासाठी धावपळ करावी लागते आणि तीच फळे मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतरांशी स्पर्धा, हमरीतुमरी, आवश्यक तर संघर्ष करावा लागतो. त्यांत प्रबळ टिकतात, कमजोर बाजूला पडतात. सर्वच जीवमात्रांत बदल होत जातात ते निसर्गाच्या कृपणतेतून निवड लादली गेल्यामुळेच.

अशी निवड होत नसती तर काय झाले असते? जन्मलेले सर्वच वयात येत असते, नव्या पिढीला जन्म देत गेले असते तर काय घडले असते? हत्ती या प्राण्यात गर्भावस्था बावीस महिन्याची असते. एका वेळी एकच पिलू जन्मते. पण, निवडीची प्रक्रिया नसती तर ७५० वर्षांत, फक्त हत्तींचीच संख्या सारी पृथ्वी व्यापून टाकण्याइतकी झाली असती. तेव्हा, निवड ही आवश्यक आहे. त्यातूनच बदल होतात; त्यातूनच गुणांची जोपासना होते. हा डार्विनने अजोड तर्कशुद्धतेने मांडलेल्या पुराव्यांच्या फैरींचा अपरिहार्य निष्कर्ष आहे. पण आपले खापरखापर... पणजोबा मनुष्य नव्हते या कल्पनेनेच अनेकांना झीट आली. ख्रिश्चन धर्मात, सहा दिवसांत परमेश्वराने विश्व निर्माण केले व सातव्या दिवशी विश्रांती घेतली अशी निर्मितीकथा आहे. डार्विनवाद खरा असेल तर बायबलमधील मांडणीचा पायाच उखडला जातो.

मोठमोठी विद्वान माणसे डार्विनवर तुटून पडली. 'काहीही कल्पना करणारा बाष्कळ माणूस', 'सर्व विज्ञानाला कलंक लावणारा', 'विश्वात काही अंतिम तत्त्व आहे हेच नाकारणारा नास्तिक' अशी त्याची हेटाळणी झाली.

'पुरावा सज्जड गोळा केला म्हणजे बाष्कळ निष्कर्ष सिद्ध होतात काय? चांगला कांदा असला; साऱ्या गुणवत्तांचा असला तर त्यातून काय काही काळानंतर मनुष्यप्राणी तयार होणार आहे?'

सुदैवाने इंग्लंडमध्ये धार्मिक स्वातंत्र्य होते, त्यामुळे धर्मगुरूंना काही करणे शक्य झाले नाही. डार्विन रोममध्ये जन्मला असता तर त्याला धर्मगुरूंनी हालहाल करून मारले असते.



पुष्कळशा शास्त्रज्ञांनी डार्विनचा पक्षही समर्थपणे सांभाळला. किंबहुना, डार्विनपेक्षाही उत्क्रांतिवाद मांडण्याचे श्रेय थॉमस हॅक्स्ले याला दिले पाहिजे. एका मोठ्या परिसंवादात ऑक्सफर्डचा बिशप विल्बरफोर्स यानी हक्स्ले यांना कुत्सितपणे प्रश्न विचारला, 'माकड तुमचा बापाकडून पूर्वज की आजोबाकडून?' हक्स्ले याने उत्तर दिले. 'माकड माझा पूर्वज म्हणून सांगण्यात मला कोणतीही शरम वाटत नाही. पण, ज्या विषयाचे ज्ञान नाही, अभ्यास नाही, ज्या विषयावर आपला अधिकार नाही त्या विषयात घमेंड मारणारा कुणी माझा पूर्वज होता म्हणून मान्य करण्यात मला खरोखर लाज वाटेल.' या एका उत्तराने साऱ्या वादविवादाला वेगळी कलाटणी लागली.

डार्विनचा जन्म १८०९ चा. अमेरिकेचे अध्यक्ष आणि गुलामांचे कैवारी अब्राहम लिंकन यांचा जन्म त्याच वर्षी, त्याच दिवशी, जवळपास त्याच वेळी झाला. ज्योतिषवाद्यांनी यातून भलतेच निष्कर्ष काढू नये, कारण जन्मस्थानांत अक्षांशरेखांशांचा मोठा फरक आहे. शाळेतल्या आणि विद्यापीठातल्या काळात डार्विनची बुद्धिमत्ता काही विशेष चमकली नाही. वेगवेगळे किडे, दगडमातीचे नमुने गोळा करण्याचा त्याला छंद होता. साधारणपणे, पाद्री बनण्याची त्याची तयारी चालू होती. थोड्या योगायोगाने निसर्गाच्या अभ्यासासाठी निघालेल्या 'बिगल' नावाच्या जहाजात प्राणिशास्त्रज्ञाची जागा त्याला मिळाली. दक्षिण अमेरिकेतील प्रवासाच्या काळात त्याच्या सिद्धांतासाठी लागणारा बहुतेक पुरावा मोठ्या कष्टाने आणि बारकाईने त्याने गोळा केला.

डार्विन संशोधनाच्या बाबतीत अतिरेकी वाटावा इतका काळजीपूर्वक काम करत असे. आपल्या सिद्धांताच्या पुराव्यासाठी एकएक लहान लहान नमुना घेऊन तो घासूनपुसून तपासून घेऊन त्याच्या आधाराने अगदी कमीत कमी काय निष्कर्ष निघू शकेल तेवढाच तो स्वीकारत असे.

कम्युनिस्टांचा प्रेषित मार्क्स याची पद्धती नेमकी उलटी. किरकोळ आकडेवारीच्या आधाराने कल्पनाशक्तीच्या भराऱ्या मारून वैश्विक ऐतिहासिक सिद्धांत भलत्याच नम्रपणे मांडण्याची त्याची पद्धती ! अन्वेषणपद्धतीत डार्विन आणि मार्क्स ही दोन उलटी टोके मानली पाहिजे. कल्पनाशक्तीच्या अवास्तव भराऱ्यांनी भरलेला मार्क्सचा 'कॅपिटल' सारग्रंथ तयार झाला. त्याला डार्विनने प्रस्तावना लिहावी अशी मार्क्सची मोठी तळमळ होती. डार्विनने मार्क्सचे चोपडे पाहिले आणि प्रस्तावना लिहिण्यास सरळसरळ नकार दिला.

डार्विन आपल्या पद्धतीने सारे काही तपशीलवार मांडत होता, लिहून काढीत होता; कोठे बोट सरकवायला जागा राहू नये अशा तळमळीने. १८४२ मध्ये पहिला मसुदा तयार झाला. दुसरा मसुदा तयार होण्यास आणखी दोन वर्षे गेली. १८५० उलटून गेले. अनेक ग्रंथांची माला तयार होत होती. हे काम अर्धेमुर्धे झाले नाही तोच अनपेक्षित संकट कोसळले. वॅलेस नावाच्या शास्त्रज्ञाचे डार्विनला एक पत्र आले. मलायाच्या सामुद्रधुनीत वॅलेसने डार्विनसारखेच समांतर काम केले होते. एवढेच नव्हे तर, त्याची मांडणी आणि शब्दयोजनादेखील १८४२ च्या मसुद्याशी अगदी जुळणारी होती. दोघांनी एकत्र येऊन हे संशोधन संयुक्त नावाने सादर करावे असे ठरले आणि अखेरीस १८५८ मध्ये सिद्धांत औपचारिकरीत्या शास्त्रज्ञांपुढे ठेवण्यात आला. या घटनेमुळे ग्रंथमालेची रचना सोडून थोडक्यात सारांश मांडणारे पुस्तक डार्विनने लिहायला घेतले; वर्षभरात ते प्रसिद्ध झाले. पहिल्या आवृत्तीच्या १२०० प्रती एका दिवसात खपल्या आणि त्यानंतर जे घडले त्याला इतिहासात तोड नाही.

डार्विनने निवडीचा सिद्धांत मांडला, पण निवडीसाठी उमेदवार कसे काय तयार होतात याबद्दल त्याच्या मांडणीत स्पष्टता नाही. प्राणिमात्रातील गुणसूत्रे ही एखाददुसऱ्या पिढीत मिळणाऱ्या अनुभवांमुळे बदलत नाहीत. 'सशांच्या एका पूर्वजाने तळ्यात शेपटी घातली. पाणी गोठले त्यामुळे साऱ्या सशांचे शेपूट लांडे झाले' अशा कथांना जीवशास्त्रात काही आधार नाही. अखूड शेपटीच्या सशांची पोरे पूर्ण शेपटीचीच जन्मतात. क्ष-किरण किंवा तत्सम किरणोत्सर्गामुळे गुणसूत्रांत उलटापालट होऊन विक्षिप्त गर्भ निपजू शकतात, पण त्यातून निसर्गातील धकाधकीस निभवून नेण्यासारखे प्राणी तयार होणे संख्याशास्त्रीयदृष्ट्या तसे दुर्मिळ. प्राणिमात्रांत विविधता निर्माण होते ती भिन्नलिंगी व्यक्ती प्रजोत्पादन करतात त्या संबंधीच्या नियमांनुसार होते. या विविधतेतून निवड होते; ती डार्विनच्या सिद्धांताने होते.

डार्विनच्या साऱ्या मांडणीत मनुष्यप्राण्याचा उल्लेख नाहीच. त्यामुळे, माणसासारख्या उत्क्रांत प्राण्यात स्पर्धा आणि निवड यांचा काय परिणाम होईल? यासंबंधी डार्विनने काही म्हटलेले नाही. स्पर्धेत कमी पडणारी माणसे नष्ट होत नाहीत, ती टिकून राहतात आणि अनेक वेळा स्वत:त सुधारणाही घडवून आणतात. थोडक्यात, माणसासारख्या उत्क्रांत अवस्थेत इतर प्राणिमात्रांच्या



जगाप्रमाणे अपरिहार्य क्रूरता नसते.

डार्विनच्या मांडणीत आणखी एक धूसर जागा आहे. 'जो योग्य असतो, समर्थ असतो तो टिकून राहतो.' हा मुद्दा मांडताना अनेक जागी डार्विनची शब्दयोजना गैरसमजूत करण्यासारखी आहे. ज्याची शारीरिक शक्ती अधिक, ज्याची झेप मोठी, जो उडू शकतो, जो दुसऱ्यांवर मात करू शकतो असे प्राणी टिकून राहतात. याचा अर्थ, निसर्गात फक्त दंगलीच्याच गुणांना महत्त्व आहे असे नाही. डायनासॉरसारखे अफाट ताकदीचे प्राणी नष्ट होतात आणि 'महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळी वाचती' हाही निसर्गक्रमच आहे. कोणी सामर्थ्याने मात करतो, कोणी चातुर्याने. झाडांच्या सालींशी रंग जमवून घेण्याची क्षमता असलेले किडे भक्षक प्राण्यांच्या हल्ल्यांपासून वाचू शकतात. हातात पेटते दांडके घेतलेला दुर्बळ मनुष्यप्राणी वाघसिंहांवरही मात करू शकतो. या मुद्द्यांचा परामर्श घेण्याचे डार्विनला काही कारण नव्हते. अन्यथा, कोणताही एक गुण स्वयंभू श्रेष्ठ नाही, वेगवेगळ्या परिस्थितीत जुळवून घेण्याचा गुण सर्वात मोठा. उत्क्रांतीमध्ये, किती वेगवेगळ्या परिस्थितीशी प्राणी जुळवून घेऊ शकतो हे निर्णायक ठरते. निसर्गात निवड होते ती प्रत्येक प्राण्याच्या स्वातंत्र्याच्या कक्षांच्या मोजमापाने.

डार्विनच्या Origin of Species चे महत्त्व काय? एका माणसाने एकाच आयुष्यात काही वर्षांच्या अवधीत विश्वाविषयीच्या सर्व कल्पनाच बदलून टाकल्याची जी थोडी उदाहरणे आहेत त्यांत डार्विनचे नाव अगदी शीर्षभागी राहील यात शंका नाही.

*(१३ नोव्हेंबर १९९७)*

■■

# विजय आणि पराभवाचे अर्थकारण

दुसऱ्या महायुद्धात जर्मनी बेचिराख झाला. रशिया, फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिका या दोस्त राष्ट्रांनी हिटलर व मुसोलिनी यांच्या नेतृत्वाखाली नाझीवादाचा संपूर्ण पाडाव केला. जर्मनीतर इतका उद्ध्वस्त झाला की, आता पुन्हा कधी जर्मनीतील कारखाने, उद्योगधंदे, व्यापार समर्थपणे उभे राहू शकतील ही शक्यताच दिसत नव्हती. आणखी एक अजब प्रकार घडला. युद्धामुळे दोस्त राष्ट्रे थकली होती, याला थोडाफार अपवाद अमेरिकेचा. अमेरिकेने दोस्त राष्ट्रांना प्रचंड प्रमाणावर युद्धसामग्री पाहोचविली. अमेरिकन फौजा युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांत प्रत्यक्ष धुमश्चक्रीत उतरल्या. पण, अमेरिकेची भूमी रणभूमी एकदाही झाली नाही. दुसऱ्या महायुद्धापासून सुरू झालेल्या सरसकट बाँबहल्ल्यांच्या परिणामांतून अमेरिका अंगावर ओरखडादेखील न पडता निभावून गेली. युद्धसामग्री तयार करण्यासाठी उभे केले गेलेले कारखाने झपाट्याने शांततेच्या काळातीत उत्पादन करण्यासाठी आपापली फेरमांडणी करीत होते.

जीत राष्ट्रांच्या मदतीसाठी अमेरिकेने एक योजना जाहीर केली. योजनेचे नाव 'मार्शल प्लॅन'. जेते राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांच्या पुनर्बांधणीसाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी स्वत: कंबर कसून उभे राहावे हे दृश्य त्यावेळी अनोखेच होते. पुनर्बांधणीसाठी प्रचंड रकमेची मतदकर्जे तर दिली गेलीच, पण त्याशिवाय जर्मन नाण्याचा विनिमयदर अत्यंत कमी ठेवण्याची परवानगी देऊन जर्मनीतून होणाऱ्या निर्यातीवरील सारी बंधने सरसकट उठविण्यात आली. ही मदत मिळाली नसती तर दृढनिश्चय, प्रचंड प्रयत्न, कष्टाळूपणा, जिद्द, उद्योजकता या साऱ्या जर्मन गुणांचे चीज झाले असते किंवा नाही याबद्दल शंकाच आहे. निदान, जर्मन राष्ट्राच्या पुनर्बांधणीला कितीतरी अधिक वेळ लागला असता.

प्रत्यक्षात युद्धातील शरणागतीनंतर वीसपंचवीस वर्षांतच जर्मनी पूर्णपणे सावरला आणि आज, जर्मनीची आर्थिक ताकद आणि प्रभाव इतका वाढला आहे की, त्याची झळ अमेरिकन व्यवस्थेसही लागत आहे. जेत्यांनी जीतांना



सावरायचे हा प्रकार १९४४ साली प्रथम घडला आणि नंतर तो एक नियमच बनून गेला. व्हिएतनामच्या युद्धात अमेरिकेला काढता पाय घ्यावा लागला तरी विद्ध्वंस व्हिएतनामचा झाला. पण, त्याची भरपाई करण्याचे अमेरिकेने मान्य केले हा त्यातलाच प्रकार.

आंतराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील हा मोठा चमत्कारिक भाग आहे. यद्धखोर राष्ट्रांनी शेजारी राष्ट्रांची खोडी काढावी, हल्ले करावे, लढाया कराव्या आणि शेवटी, लढाईत मार खाल्ल्यानंतर शत्रुराष्ट्रांनीच त्यांच्या मदतीला धावावे हे सगळेच तसे 'फार्सिकल' वाटते. दुसऱ्या महायुद्धानंतर तर 'हरलेले जिंकले आणि जिंकलेले हरले' अशी म्हणच पडली.

विजयी राष्ट्रे पराभूत राष्ट्रांच्या मदतीला धावू लागली ते काही दयाबुद्धीने नाही, करूणेपोटीही नव्हे, तर शुद्ध स्वार्थापोटीच. हा स्वार्थ कोणता? या स्वार्थाचे अर्थशास्त्र जगाला पटविण्याचे काम एका छोट्या आकाराच्या पुस्तकाने केले. लेखकाचे नाव केन्स् आणि पुस्तकाचे नाव 'शांततेचे आर्थिक परिणाम'. एका पुस्तकातील विचारामुळे, मांडणीमुळे जगाच्या इतिहासात फरक पडून यावा असे घडते. त्यातील केन्सचे 'शांततेचे आर्थिक परिणाम' हे मोठे ढळढळीत उदाहरण आहे.

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पाडाव झाला. फ्रान्स, इंग्लंड इत्यादी दोस्त राष्ट्रे विजयी झाली. फ्रान्समधील राजेशाहीच्या काळातील देखणी राजधानी व्हर्साय येथे भव्य प्रासादात जीत आणि जेते राष्ट्रांच्या वाटाघाटी सुरू झाल्या. तहाच्या कसल्या, शरणागतीच्याच अटी काय त्या ठरवायच्या होत्या. दोस्त राष्ट्रांना अमेरिकेने प्रत्यक्ष युद्धात न पडता साधनसंपत्तीचा प्रचंड पुरवठा केला होता. जर्मनीची तर पराभवात पुरी वाताहतच झाली होती. पण, त्याचबरोबर फ्रान्स आणि इंग्लंड या जेत्या देशांच्याही अर्थव्यवस्थेने जबर फटका खाल्ला होता. आर्थिक सुबत्ता काय ती फक्त अमेरिकेतच नांदत होती आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्याकडे सारे जग आशेने पाहत होते.

पण, वूड्रो विल्सन यांना युरोपीय प्रदेशात फारसे स्वारस्य नव्हते म्हणा किंवा त्यांचे ऐकण्याच्या मन:स्थितीत कोणी नव्हते म्हणा, तहाच्या अटी युरोपनेच ठरविल्या. जर्मनीने युद्धकाळात दाखविलेल्या क्रौर्याबद्दल, लुटालुटीबद्दल इंग्लंड आणि त्याहूनही फ्रान्समध्ये सर्वदूर विलक्षण संतापाची आणि सूडाची भावना होती. आता जर्मनी हरला आहे. शरण आला आहे तर त्याला असा काही धडा

शिकविला पाहिजे की पुन्हा जर्मन राष्ट्र आणि जर्मन लोक उठून उभे राहाणेच अशक्य झाले पाहिजे; तरच तह करण्यात काही तथ्य आहे आणि शांततेला काही अर्थ आहे असे सगळ्यांनाच वाटत होते.

व्हर्साय येथील तहात जर्मनीवर शरणागतीच्या अटी लादण्यात आल्या त्या मोठ्या कडक होत्या. जर्मनीस सैन्य उभारणीस बंदी झाली; नौदलावर बंदी घालण्यात आली; कोळसा आणि लोखंड यांच्या संपन्न खाणींचे प्रदेश फ्रान्सला जोडण्यात आले. उभे कारखाने जर्मनीतून उचलून फ्रान्समध्ये नेण्यात आले आणि त्याखेरीज, प्रचंड रकमांची खंडणी जर्मनीने दर साल दोस्त राष्ट्रांना पोहोचविली पाहिजे अशा अटी घालण्यात आल्या.

विजयी राष्ट्रांत सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले. जर्मनीचा त्रास कायमचा सुटला, महायुद्धाचा बदला घेण्यात आला असेही समाधान त्यांना वाटत होते. अशा वेळी केन्सने आपले पुस्तक प्रसिद्ध केले.

पुस्तकातील प्रमुख मांडणी अशी : जर्मनीवर व्हर्सायच्या तहात शरणागतीच्या ज्या अटी लादण्यात आल्या आहेत त्यांतून शांतता तर प्रस्थापित होणार नाहीच पण दुसरे महायुद्धच उभे राहील. कोणत्याही राष्ट्रातील लोकांना कायम अपमानित अवस्थेत ठेवणे शक्य नाही हे राजकीय सत्य आहेच. त्यापलीकडे, व्हर्सायचा तह आणि त्यातील अटी अर्थशास्त्रातील सामान्य तत्त्वांच्या विरुद्ध आहेत.

जर्मनीने दोस्त राष्ट्रांना द्यावयाच्या खंडणीचा मुद्दा घ्या. खंडणी काही जर्मन नाण्यात द्यायची नाही. तसे असते तर प्रश्न सोपा होता. नोटा छापण्याचे कारखाने एक दिवस चालविले असते तरी खंडणीची रक्कम पुरी होऊ शकली असती. पण त्या कागदाच्या कपट्यांची काय किंमत आणि त्यांतून दोस्त राष्ट्रांना काय मिळणार? खंडणीची रक्कम आंतरराष्ट्रीय चलनात द्यावयाची आहे. हे चलन जर्मनीस मिळावे कोठून? त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जर्मन मालाची निर्यात झाली पाहिजे. पण, निर्यात करण्यासाठी जर्मनीकडे काही राहिलेच नाही. खाणीचे प्रदेश फ्रान्सने घेतले. कारखाने नटबोल्टसहित उचलून नेले. तेथे उत्पादन व्हावे कसे? लोकांना जगण्याचीच जेथे मारामार आहे तेथे निर्यात करावी कशी?

समजा, एवढे करून जर्मनीने 'येन केन प्रकारेण' निर्यातीसाठी वरकड उत्पादन तयार केलेच तर विजयी राष्ट्रे त्या मालाची आयात आपापल्या देशांत करून घेण्यास तयार होतील काय? जर्मन माल विजयी राष्ट्रांच्या बाजारपेठांत येऊन पोहोचू लागला तर त्यांच्या स्पर्धेमुळे विजयी राष्ट्रांतील काराखाने बंद पडू लागतील आणि विजेत्य



राष्ट्रांतच बेकारी व मंदीची लाट येईल. 'खंडणी नको आणि तुमच्या मालाची आयातही नको' असे म्हणण्याची वेळ विजयी राष्ट्रांवरच येईल.

'आंतराष्ट्रीय नाणेव्यवस्थेत धनकोच्या मदतीखेरीज ऋणको कधी कर्ज फेडू शकत नाही. एका अर्थाने देशांदेशांमधील मोठ्या रकमांची कर्जे फेडता येतच नाहीत किंवा ती फेडून घेणे धनकोनाच परवडत नाही' असा, वरवर विचित्र दिसणारा सिद्धांत केन्सने मांडला. त्याच्या सिद्धांताचा प्रत्यय झपाट्याने आला. जर्मन अर्थव्यवस्था कोसळली. नाण्याचे अवमूल्यन इतक्या प्रचंड वेगाने होऊ लागले की, 'खिशात नोटा नेऊन दुकानात जावे आणि पिशवी भरून माल आणावा या ऐवजी, पोत्यात नोटा भरून न्याव्यात आणि खिशातून माल घरी आणावा' अशी विपरीत परिस्थिती आली. नाण्याची स्थिरता ही केवळ अर्थकारणातच नव्हे, राजकारणात आणि समाजकारणातही निश्चित नैतिक मूल्यांइतकीच महत्त्वाची असते. शेअर्समध्ये, सरकारी कर्जरोख्यांत सुरक्षितपणाच्या अपेक्षेने गुंतवणूक करणारे भिकारी बनले; उंडगे, टोणगे मजा मारू लागले. पोट जाळण्याकरिता भल्या भल्या घरच्या लेकीसुना रस्त्यावर फिरू लागल्या. खंडणीचे हप्ते चुकू लागले. त्या बदल्यात फ्रान्सने आणखी मुलूख बळकावून घेतला आणि परिस्थिती आणखीनच बिघडत गेली आणि शेवटी, नाझीवाद व हिटलर यांचा भस्मासुर उभा राहिला.

*(२३ नोव्हेंबर १९९७)*

■■

## मुहूर्तं ज्वलितं श्रेयः। न च धूमायितं चिरम्॥

निरोगी शरीर असले म्हणजे मनही निरोगी राहाते ही केवळ म्हण नाही, ते एक तत्त्वज्ञान आहे. बुद्धीची कार्यक्षमता वरच्या कोटीची राहायची असेल तर त्याकरिता शरीर स्वस्थ आणि निरोगी असले पाहिजे. बलवंतांचे आराध्य दैवत श्री हनुमान हा केवळ पहिलवान नाही, तो 'बुद्धिमताम् वरिष्ठम्, 'ही आहे ही गोष्टही मोठी सूचक आहे.

शरीर निरोगी असले म्हणजे मन निरोगी राहाते, बुद्धी स्वच्छ राहाते; दररोजच्या व्यवहारामध्ये, संसाराच्या कामकाजामध्ये मनाची, बुद्धीची तल्लखता चांगली राहाते, कार्यक्षमता वाढते हा एक व्यावहारिक भाग झाला. या पलीकडे स्वस्थ शरीर असणे हे परमेश्वरी साधनेकरिता किंवा अध्यात्माच्या क्षेत्रातही महत्त्वाचे आहे, अशीही भारतीय परंपरा आहे. नरदेह हे अध्यात्माचे साधन आहे असे सांगून रामदास स्वामी म्हणतात,

नरदेह पांगुळी असता। तरी तो कार्यास न येता॥
अथवा थोटा जरी असता। तरी परोपकारासि न येता॥
नरदेह अंध असिला। तरी तो निपटचि वाया गेला॥
अथवा बधिर जरी असला। तरी निरूपण नाही॥

अश्या तऱ्हेने निरोगी असले तरी अपंग शरीरदेखील अध्यात्मसाधनेस फारसे उपयोगाचे नाही असे रामदासांनी स्पष्ट सांगितले आहे. ज्यांना धड खायला नाही, ज्यांचे हातपाय चालत नाहीत, कुष्ठरोगासारख्या व्याधींनी जे पीडित झाले आहेत, अंगावरच्या वस्त्राचीही ज्यांना शुद्ध नाही अशी मंडळीदेखील अवलिया म्हणून शेगावच्या संतांप्रमाणे किंवा शिर्डीच्या साईबाबांप्रमाणे मान्यता पावतात. शेवटी शरीर आणि मन यांचा संबंध काय आहे? शरीर चांगले असणे म्हणजे काय? याचीही व्याख्या भारतीय परंपरेमध्ये खूप स्पष्ट आहे.

शरीरामध्ये भोगविलासादी प्रवृत्ती नसावी म्हणजे राजस वृत्ती नसावी; त्याबरोबर क्रोध, संताप, चीड, अतिरेकीपणा याकडे नेणारी तामसी वृत्ती नसावी. यासाठी,



खाण्यापिण्यामध्ये अतिरेक नसावा, संयम असावा; दारू, धूम्रपान इत्यादी व्यसने तर नसावीतच. सकाळी उठणारा मनुष्य शुचिर्भूत होऊन जे काही पाठपठण करायचे असेल ते करणारा, ब्रह्मचर्य पालन करणारा हा केवळ शरीरानेच निरोगी होतो एवढेच नव्हे तर त्याबरोबर तो अध्यात्मसाधनेचाही अधिकारी बनतो, असे समजले जाते.

प्रत्यक्षात पाहिले तर, पहाटे उठून शुचिर्भूत होऊन पुरुषसूक्तांचा घोष करणाऱ्या महाभागांनी पृथ्वीच्या पाठीवर किंवा आपल्या देशात काही फार मोठी सुधारणा घडवून आणली आहे, लोकांच्या आयुष्यांमध्ये काही सुखसमाधान वाढविले आहे किंवा स्वतःच्या वैयक्तिक आध्यात्मिक उन्नतीमध्येही काही मोठी शिखरे चढून दाखविली आहेत असे काही दिसत नाही. किंबहुना, अश्या तऱ्हेच्या नियमित आहार, नियमित कार्यक्रम आखणाऱ्यांपेक्षा बेभान धुंदपणे जगून पॅरिसच्या सेन नदीच्या पुलाखाली दारू पिऊन झिंगून पडलेल्या माणसांनीसुद्धा आपल्या संशोधनांनी किंवा कलेच्या आविष्कारांनी मनुष्य, समाज आणि संस्कृती समृद्ध करून टाकल्याची उदाहरणे सापडतात.

चि.वि. जोशींची एक कथा आहे. या कथेतील बाप हा वेगवेगळ्या निसर्गोपचाराच्या पद्धतीनुसार स्वतःची तब्येत खूप चांगली ठेवण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळ्या प्रकारची स्नाने, वेगवेगळ्या प्रकारांनी पोट साफ ठेवणे, जरा काही कोठा जड झाला असे वाटले तरी बैचेन होणे याच चिंतांमध्ये तो सबंध दिवस काढतो. या उलट, त्याचा स्वातंत्र्याच्या आंदोलनात असलेला, बेळगावमध्ये वकील असलेला मुलगा तब्येतीकडे लक्ष देत नाही, अनेक प्रकारची कुपथ्ये करतो. परिणामतः, क्षयाची बाधा होऊन लवकर मरूनही जातो. त्याच्या अंत्ययात्रेला हजारो लोक येतात, वर्तमानपत्रे भरभरून बातम्या येतात. याउलट, नंतर काही दिवसांनी वडील मरून जातात तेव्हा त्यांच्या मुलाचा उल्लेख करून 'त्यांचे हे वडील' असा वर्तमानपत्राच्या कोपऱ्यात कुठेतरी उल्लेख येतो.

ध्यानधारणा कशी करावी यासंबंधी योगशास्त्रावरील ग्रंथांत, खुद्द भगवद्‌गीतेतही तपशीलवार सूचना दिल्या आहेत. बसायची जागा कशी असावी येथपासून ते सर्व इंद्रियांचा संकोच करून संयम बाळगण्याच्या वेगवेगळ्या पद्धती योगीजनांनी तपशीलवारपणे सामान्य जनांकरिता सांगून ठेवल्या आहेत. परमेश्वराचा साक्षात्कार, परमेश्वराचे दर्शन हे शारीरिकदृष्ट्या कोणत्या अवस्थेस पोहोचलेल्या योग्यास होते? या प्रश्नाचे उत्तर देणे मोठे कठीण आहे. अनेक तऱ्हेच्या कष्टसायासांनी

शरीर शिणविणाऱ्या, एका पायावर उभे राहाण्याची तपश्चर्या करणाऱ्या, अनेक तऱ्हेच्या यातना भोगणाऱ्या योग्यांना एकदा शरीर हे खोटे आहे, शरीराचे काही महत्त्व नाही हे पटले म्हणजे ते ईश्वरी साक्षात्काराचे अधिकारी होतात, असे भारतीय परंपरा मानते.

वेगवेगळ्या प्रेषितांनी आणि आपल्याकडील अगदी किरकोळ साधु, बाबा, महाराजांनीही परमेश्वराचा साक्षात्कार आपल्याला कोणत्या परिस्थितीत, कोठे, कधी, कसा झाला याची तपशीलवार वर्णने लिहून ठेवलेली आहेत. ही वर्णने पाहता शरीराच्या कोणत्याही एका विशिष्ट अवस्थेत साक्षात्कार होण्याची संभावना वाढते असे काही दिसत नाही. कोणाला गाई चारताना एकदम साक्षात्कार झाला असे वाटते, कोणाला भांडी घासताना, कोणाला धुणी धुताना, कोणाला डोंगरात स्वच्छंदपणे फिरताना.

ख्रिश्चन धर्माच्या इतिहासातही अशा प्रकारचा एक मोठा महत्त्वाचा प्रसंग घडलेला आहे. ख्रिस्ताचा अनुयायी संत पीटर हा ख्रिस्ताच्या वधानंतर जेरुसलेम सोडून रोमकडे जाण्यास निघाला. रोमच्या वाटेवर एका ठिकाणी त्याला परमेश्वरी साक्षात्कार झाला आणि परमेश्वराने पुढे जाऊन रोम येथे येशूच्या विचाराचे पीठ स्थापन करण्याची आज्ञा दिली, असे त्याला स्पष्टपणे जाणवले. या सगळ्या अनुभवाचे तपशीलवार वर्णन संत पीटरने लिहून ठेवले आहे. हे वर्णन बारकाईने वाचल्यानंतर अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी असे मत प्रदर्शित केले की हा अनुभव आध्यात्मिक नसून अपस्मार झालेल्या रोग्यास एखादे फेफरे यावे अशा प्रकारचा अनुभव आहे. अशा तऱ्हेचे निदान तज्ज्ञांनी केल्यानंतर साहजिकच भक्तमंडळीत मोठी खळबळ उडाली. संत पीटर म्हणजे रोम येथील कॅथॉलिक चर्चचा मूळ संस्थापक. त्याच्या ईश्वरी अनुभवाबद्दल शंका व्यक्त करणे म्हणजे सबंध रोमन कॅथॉलिक पंथाच्या आणि पोपच्या अधिकारासच आव्हान देण्यासारखे. पण, सर्व डॉक्टरमंडळींनी मांडलेला पुरावा इतका सज्जड होता की त्याला उत्तर देणेही जवळजवळ अशक्य झाले. संत पीटरचा ईश्वरी साक्षात्काराचा अनुभव हा काही आध्यात्मिक अनुभव समजायचा का अपस्माराच्या रोग्याचा एक अनुभव समजायचा?

या विषयावर अमेरिकेतील एक तत्त्वज्ञ विल्यम जेम्स् यांनी नवी दिशा दाखविणारा विचार मांडला. विल्यम जेम्स् हा एम्.डी. झालेला म्हणजे निष्णात डॉक्टर. मानसशास्त्रावर शरीरशास्त्राच्या आधाराने त्याने अत्यंत गाजलेले ग्रंथ



त्याहीपूर्वी लिहिले होते. सर्व तत्त्वज्ञानांमध्ये 'सारे विश्व हे एक आहे' अशी विनाकारण समजूत आग्रहाने मांडली जाते अशी त्याची तक्रार होती. इंग्रजीत विश्वाला Universe म्हणजे एकअस्तित्व असा शब्द आहे. Universe च्या ऐवजी Poly-verse म्हणजे बहुअस्तित्व का असू नये? सर्व विश्व कोण्या एकाच तत्त्वाने बांधलेले आहे असे समजण्याची काय गरज आहे? विश्वात अनेक तत्त्वे असणेही तितकेच साहजिक आहे. 'एक' आकडा महत्त्वाचा आहे तसेच 'तीन' आणि 'सात' हे आकडेही महत्त्वाचे आणि पवित्र मानले जातात. पण, एक काय, तीन काय, सात काय आणि दहा लाख दहा काय - कोणताही आकडा निसर्गाच्या व्यवस्थेमध्ये तितकाच महत्त्वाचा, तितकाच पवित्र आहे. तेव्हा साऱ्या विश्वाचा नियंत्रक, निर्माता, परमेश्वर एकच असण्याची काही तर्कशास्त्रदृष्ट्या आवश्यकता नाही, अशी त्यांची मांडणी होती.

जगातील वेगवेगळ्या धर्मांच्या, वेगवेगळ्या पंथांच्या, टोळ्यांच्या पूजापद्धतींचा, आराधनापद्धतींचा विल्यम जेम्स् याने बारकाईने अभ्यास केला आणि या अभ्यासाअंती त्याने असा निष्कर्ष काढला की वेगवेगळ्या धर्मांच्या, पंथांच्या, टोळ्यांच्या आराधनापद्धतींमध्ये, प्रत्येकात काही तथ्य आहे आणि सर्व विश्वाच्या मागे एक कोणी शक्ती असेल तर त्या शक्तीची आराधना करण्याचा केवळ एक मार्ग कोणताही असू शकत नाही; परमेश्वराकडे पोहोचण्याचे विविध मार्ग असू शकतात.

विल्यम जेम्स् हा स्वत: डॉक्टर होता. अनेकविध अध्यात्ममार्गांचा पुरस्कर्ता विल्यम जेम्स् याने संत पीटरच्या साक्षात्काराच्या प्रश्नाचे विश्लेषण केले. डॉक्टरांनी संत पीटर अपस्माराचा म्हणजे Epilepsy चा रोगी होता असे दाखवून दिल्यानंतर संत पीटरच्या शिष्यांनी आणि भक्तजनांनी चिडून जाण्याचे काहीही कारण नाही; किंबहुना संत पीटर अपस्माराचा रोगी होता हे नाकारण्याची धडपड करण्याची काहीही आवश्यकता नाही असे विल्यम जेम्स्ने मांडले. ईश्वराची अनुभूती येण्यासाठी अमुक एकच प्रकारचे शरीर असले पाहिजे अशी पूर्वअट असण्याची काहीही गरज नाही. संत पीटर या अपस्माराच्या रोग्याचे शरीर हे ईश्वरी साक्षात्कारासाठी पात्र नाही असे म्हणायला काय अधिकार आहे? किंबहुना, असेही म्हणता येईल की अपस्माराने ग्रासलेले शरीर हे ईश्वराच्या साक्षात्काराचा अनुभव घेण्याकरिता कोणत्याही शरीरापेक्षा अधिक पात्र असते.

संत पीटर अपस्माराचा रोगी होता असे म्हटल्याने त्याच्या साक्षात्काराचे

महत्त्व कमी होते असे समजण्याचे काहीही कारण नाही. संतमहात्मे परमेश्वराची आराधना करताना दिवसेंदिवस उपासतापास काढतात, शरीराला कष्ट देतात; शरीराची ही विकलांग अवस्था परमेश्वराचा साक्षात्कार होण्यासाठी कदाचित जास्त साहाय्यकारी होऊ शकत असेल. दररोज भरपूर खानपान करणाऱ्या आणि मजबूत कसरत करणाऱ्या माणसापेक्षा अशा विकलांगांना त्यांचे शरीर परमेश्वराची अनुभूती देण्याकरिता मदत करत नसेल असे म्हणण्यास काय पुरावा आहे? विल्यम जेम्स्‌ची त्याच्या ' Varieties of Religious Experiences धार्मिक अनुभवांची विविधता' या पुस्तकातील ही मांडणी मोठी क्रांतिकारी ठरली.

अल्डस हक्सले याने आपल्या Doors of Perceptions- Heaven and Hell या पुस्तकात स्वत:वर वेगवेगळ्या मादक द्रव्यांचा काय परिणाम होतो या संबंधीचे अनुभव नोंदले आहेत. मादक द्रव्य सेवन करणाऱ्यांनी सांगितलेले अनुभव असे की द्रव्य घेतल्यानंतर सर्व शरीराच्या जडपणाची, शारीरिक दु:खांची जाणीव संपते आणि नाक, कान, डोळे, स्पर्श, जिह्वा ही सारीच इंद्रिये नेहमीपेक्षा फारच प्रखरपणाने अनुभूतींची नोंद घेतात. डोळ्यांना दिसणारे रंग नेहमीच्या इंद्रधनुषी रंगांपेक्षाही अधिक ठळक, अधिक गडद, अधिक स्पष्ट, अधिक वेचक वाटतात; कानावर पडणारे आवाजही नेहमीपेक्षा काही वेगळेच भासतात. शरीरामध्ये काही रसायने सोडल्यामुळे सर्व ज्ञानेंद्रियांच्या प्रक्रियाही बदलतात हे जर खरे असेल तर शरीरामध्ये रसायनांचे नेमके कोणते मिश्रण होणे सर्वश्रेष्ठ आहे- ईश्वरप्राप्तीसाठी किंवा ज्ञानप्राप्तीसाठी? याची व्याख्या कोण देणार?

निष्कर्ष म्हणजे, मुहूर्तं ज्वलितं श्रेय: । न च धूमायितं चिरम् ॥

*(१२ ऑक्टोबर १९९७)*

■■



# थॉमस पेन्स्‌चे 'कॉमन सेन्स्'

'गुलामगिरी' ग्रंथाच्या १० व्या भागात जोतिबा फुले यांनी 'मिस्टर थॉमस पेन्सासारख्या मोठ्या विद्वानांच्या पूर्वजांनी या बळिराजाचे अंकित होऊन आपल्या मागच्या सर्व इडापीडा दूर करून सुखी झाले' असा उल्लेख केला आहे. याच ग्रंथाच्या १४ व्या भागातही 'टॉमस पेन्स वगैरे ग्रंथकारांच्या पुस्तकांतील कित्येक वाक्यांच्या आधाराने सिद्ध करून दाखविले' असा उल्लेख आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात जोतिबांनी सत्यवर्तनाचे जे ३३ नियम सांगितले आहेत ते थॉमस पेन्सच्या विचारांवर आधारलेले असावेत. बहुजन समाजाच्या चळवळीतील जोतिबा फुले, तसेच बाबासाहेब आंबेडकर आदि अनेक धुरीणांवर थॉमस पेन्स यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आढळतो.

थॉमस पेन्स हा काही ग्रंथकार नव्हता. जोतिबांप्रमाणेच एक एक विषय घेऊन त्यावर त्याने पुस्तिका लिहिल्या. तो विद्वानही नव्हता; त्याच्या लेखनात व्याकरणाच्या अनेक चुका आढळतात. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी फुल्यांच्या लेखनातील ग्राम्य भाषा, व्याकरणाच्या चुका व हास्यास्पद व्युत्पत्ती यांच्यावर हल्ला चढविला त्याचप्रमाणे जॉर्ज चॉमर्स या पेन्सच्या चरित्रकाराने त्याच्या पुस्तकाचा मोठा भाग पेन्सच्या भाषेच्या अशुद्धतेवर हल्ला करण्यात खर्ची घातला आहे.

महापंडित विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा वीतभर उंचीचा एकच पुतळा पुण्यातील एका बोळात उभा आहे. याउलट, जोतिबांचे महाकाय पुतळे गावोगाव पूजास्थान बनले आहेत. थॉमस पेन्स या लेखकाबाबतही असाच इतिहास घडला आहे. पेन्स १७३७ मध्ये इंग्लंडमधील नॉरफोक परगण्यात थेटफोर्ड येथे जन्मला. बाप कर्मठ 'क्वेकर' पंथाचा. आई इंग्लंडच्या चर्चची अनुयायी. घरची अत्यंत गरिबी. अगदी गरजेच्या वस्तूंचीही कमतरता. १३ व्या वर्षी शाळा सोडून तो बापाच्या, कपडे बनविण्याच्या धंद्यात गेला. त्यातील निरस रटाळपणाला कंटाळून जहाजावर खलाशी होण्याकरिता तो दोनदा पळून गेला. प्रत्येक वेळी बापाने त्याला सोडवून आणले आणि लंडनमधून काढून मूळ गावी ठेवले. शाळेतील काळातही

विज्ञानाकडे आणि त्यातल्या त्यात नवनवीन क्लृप्त्या शोधण्याकडे त्याचा कल होता. आणि गावात बापाचा धंदा चालविताना फावल्या वेळात तो खगोलशास्त्रावरील धडे ऐकण्यास जाऊन बसे. एवढा उल्लेख सोडल्यास पुढे प्रकटणाऱ्या लोकोत्तर थॉमस पेन्सची काही चिन्हे बालपणात दिसत नाहीत. पेन्सने अबकारी खात्यात नोकरी धरली, तेथूनही त्याला काढून टाकण्यात आले. पुन्हा काही काळ बापाचा धंदा, काही काळ शिक्षकी पेशा असे झाल्यावर अबकारी खात्यात त्याला परत घेण्यात आले. ३४ व्या वर्षी, त्याच्या दुसऱ्या लग्नाची बायको आणि सासू तंबाखूचे आणि किराणा मालाचे दुकान चालवत तेथेच तोही बसू लागला. बियरच्या अड्ड्यावर जमणाऱ्या एक मंडळात तो जाऊ लागला. त्याच्या युक्तिवादाच्या कौशल्याची वाखाणणी सर्वत्र होऊ लागली. अबकारी खात्यातील नोकरदारांच्या संघटनेने त्यांच्या पगारवाढीसाठी तरफदारी करण्याचे काम त्याच्यावर सोपविले. अबकारी नोकरदारांना पगार कमी असल्यामुळे भ्रष्टाचार कसा बोकाळतो या विषयावर त्याने एक निवेदनही तयार केले. त्याचे निवेदन फेटाळले गेले एवढेच नव्हे तर, कामात दुर्लक्ष करण्याबद्दल त्याला नोकरीतून कमी करण्यात आले. त्याच्या दुकानाचेही दिवाळे वाजले. घरसामान विकल्यामुळेच तो तुरुंगात जाण्यापासून वाचला. बायकोही विभक्त झाली. चाळीशी जवळ आलेली आणि थॉमस पेन्स उद्ध्वस्त भणंग अवस्थेत एकाकी उभा होता.

योगायोगाची गोष्ट; यावेळी इंग्लंडमध्ये अमेरिकन वसाहतीतर्फे कारभार पाहणाऱ्या बेंजामिन फ्रँकलीन यांच्याशी पेन्सची थोडीफार ओळख झाली. बेंजामिन फ्रँकलीन पुढे अमेरिकन स्वातंत्र्याचा शिल्पकार म्हणून गाजला. फ्रँकलीनने एक शिफारसपत्र देऊन पेन्सला आपल्या जावयाकडे अमेरिकेत पाठविले आणि १७७४ मध्ये, वयाच्या ३७ व्या वर्षी पेन्स अमेरिकेत उतरला. इंग्लंडमधील सरंजामशाही, सामाजिक विषमता आणि आत्यंतिक गरिबी यांच्या अनुभवाचेच भांडवल असलेला पेन्स अमेरिकन भूमीवर पाय पडताच 'कायाकल्प' झाल्यासारखा प्रतिभा दाखवू लागला. १७७५ पर्यंत अमेरिकेत सर्वत्र इंग्लंडच्या वर्चस्वाबद्दल असंतोष पसरलेला होता. इंग्लंडविरुद्ध बंड करून उठावे; आवश्यक तर सशस्त्र लढाईही करावी असे सॅम्युअल ॲडम्स् व जॉन हँकॉक यांच्यासारखे अपवाद सोडल्यास कोणी मांडत नव्हते. बहुतेक लोक इंग्लंडच्या राजाच्या स्वामीनिष्ठेचाच पक्ष मांडत होते. जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन आणि बेंजामिन फ्रँकलीनही ब्रिटनशीच निष्ठा सांगत



होते. अमेरिकन स्वातंत्र्याच्या कल्पनेबद्दल त्यांचा उत्साह फार मोठा नव्हता. अमेरिकेतील लोकांच्या रास्त तक्रारींबद्दल राजाने दयाळू होऊन योग्य तो न्याय द्यावा अशीच मांडणी अमेरिकन स्वातंत्र्याचे हे भावी शिल्पकार त्यावेळी करीत होते.

एका स्थानिक वर्तमानपत्राचा संपादक म्हणून पेन्सने निग्रोंच्या गुलामगिरीविरुद्ध, स्त्रियांच्या समान हक्कांबद्दल आणि एकूण लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य यांचे पक्ष मांडायला सुरुवात केली होती. १७७५ मध्ये त्याने 'कॉमन सेन्स' ही पुस्तिका लिहायला सुरुवात केली. अमेरिकन वसाहती इंग्लंडच्या आधिपत्यापासून स्वतंत्र होणे आवश्यक आहे, एवढेच नव्हे तर अपरिहार्य आहे असा पक्ष मांडणारे, वर्षापूर्वीच इंग्लंडमधून अमेरिकेत आलेल्या इसमाचे हे ४७ पानांचे चोपडे १० जानेवारी १७७६ रोजी प्रसिद्ध झाले. तीन महिन्यांत लाखावर प्रती खपल्या; थोड्याच दिवसांत पाच लाखांवर खप गेला. त्या काळात ही मोठी अजब गोष्ट होती. वाचता येणाऱ्या प्रत्येक अमेरिकन नागरिकाने हे पुस्तक वाचले. अमेरिकन वसाहतींच्या स्वातंत्र्यासाठी त्याने केलेले आवाहन स्पष्ट होते. संघर्ष अटळ आहे, इंग्लंडचे वर्चस्व संपविलेच पाहिजे, मवाळ धोरण अमेरिकेस फार महाग पडत आहे आणि अमेरिकन स्वातंत्र्यातूनच एका नव्या युगाचा प्रारंभ होणार आहे या त्याच्या मांडणीला मिळणारा प्रतिसाद वणव्याप्रमाणे वाढत गेला.

दस्तुरखुद्द जॉर्ज वॉशिंग्टनच्या मनाची दोलायमान अवस्था संपली. तत्कालीन नेत्यांच्या लिखाणात अमेरिकेतील जनमत स्वातंत्र्ययुद्धासाठी तयार करण्याचे श्रेय पेन्सच्या या चोपड्यास प्रांजळपणे दिले आहे. पुस्तिकेच्या प्रकाशनानंतर सहा महिन्यांच्या आत संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव करण्यात आला. मसुदा तयार करण्याचे काम अधिकृतपणे थॉमस जेफरसन यांच्याकडे होते. याच जाहीरनाम्यात निग्रो गुलामगिरी संपविण्याची घोषणा असावी यासाठी पेन्सने पुष्कळ प्रयत्न केले. पण ते निष्फळ ठरले. हा प्रश्न नंतर दक्षिण आणि उत्तर संस्थानांतील यादवी युद्धाने निकालात निघायचा होता; त्यासाठी एक अब्राहम लिंकन जन्माला यायचा होता! अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धातच निग्रोंच्या स्वातंत्र्याचाही अंतर्भाव पाहणाऱ्या पेन्सचे स्वातंत्र्यप्रेम आणि द्रष्टेपणा स्पष्ट होतो.

स्वातंत्र्ययुद्ध छेडले गेले, पेन्स त्यात अमेरिकन फौजेतील जवान म्हणून उतरला. काही महिन्यांतच अमेरिकन काँग्रेसने त्याला बोलावून घेतले आणि स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असलेल्या अमेरिकन राष्ट्राचा तो पहिला परराष्ट्रमंत्री झाला. नव्याने स्वतंत्र झालेल्या अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाने फ्रान्समधून आर्थिक मदत

मिळविण्यासाठी त्याला पाठविले. तेथून परत आल्यानंतर पेन्सने आपल्या बालपणीच्या यंत्रविद्येच्या आवडीचा पाठपुरावा केला; टांगत्या पुलाचा पहिला नमुना बनविण्याचे श्रेय त्याला जाते. वाफेच्या ताकदीवर चालणारे एक यंत्रही त्याने तयार केले होते. या विषयावर युरोपमधील शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांच्याशी सल्लामसलत करणे आवश्यक होते. त्यासाठी वयाच्या पन्नासाव्या वर्षी पेन्स युरोपमध्ये परतला आणि पुढे जवळजवळ पंधरा वर्षे तेथे राहिला.

१७७६ मध्ये अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला पेन्स इंग्लंडमध्ये उतरला ते फ्रेंच राज्यक्रांतीचे वादळी ढग आकाश व्यापून टाकत असतानाच. स्वातंत्र्याच्या कल्पनेचा पुरस्कार करण्यासाठी फ्रान्समधील क्रांती ही एक नवी संधी आहे अशा विश्वासाने पेन्स क्रांतिकाऱ्यांत उतरला. एडमंड बर्कच्या फ्रेंच क्रांतिविरोधी लिखाणास उत्तर देण्यासाठी त्याने 'मनुष्यप्राण्याचे हक्क (Rights of man)' हे दुसरे चोपडे प्रसिद्ध केले. राजद्रोहाबद्दल अटक होण्याचा धोका निर्माण झाला तेव्हा तो इंग्लंड सोडून फ्रान्समध्ये आला. क्रांतिकारी मंडळात त्याला प्रतिनिधी म्हणून घेण्यात आले. पण, १६ व्या लुईचा शिरच्छेद करण्यास त्याने विरोध दर्शविल्यामुळे जहाल क्रांतिकारक त्याच्यावर नाराज झाले. जहालांच्या हाती सत्ता गेल्यावर पेन्सला तुरुंगात टाकण्यात आले; त्याचे फ्रेंच नागरिकत्व रद्द करण्यात आले. त्याच्या शिरच्छेदाची सारी तयारी झाली होती, पण ऐन वेळी तो एका अपघाताने सुटला. फ्रान्समधील अमेरिकन राजदूताने त्याची तुरुंगातून सोडवणूक करून घेतली. पेन्सची तब्येत अत्यंत खालावली असल्यामुळे त्याला आपल्या निवासात ठेवून घेऊन त्याची देखभाल करण्याची व्यवस्था केली. या काळात पेन्सने त्याची तिसरी गाजलेली पुस्तिका लिहिली 'विचारांचे युग'. या पुस्तिकेचा उल्लेख नास्तिकांचा धर्मग्रंथ म्हणून केला गेला; पण हा आरोप खरा नाही. फुल्यांप्रमाणेच पेन्सही शेवटपर्यंत ईश्वराचे अस्तित्व मानत होता. पण, त्या पुस्तिकेत केलेल्या बायबलवरील कडक टीकेमुळे धर्मप्रभू मोठे नाराज झाले.

१८०२ मध्ये पेन्स अमेरिकेस परतला; त्याची कोणी विचारपूसही केली नाही. सारे राजकारणी त्याच्यावर नाराज, सर्व धर्मांचे अनुयायी त्याच्यावर रुष्ट. अमेरिकन स्वातंत्र्याचा उद्घोष करणाऱ्या पेन्सला तो अमेरिकन नागरिक नाही या सबबीखाली मतदानाचा हक्कही नाकारण्यात आला; त्याच्या खुनाचाही एक प्रयत्न झाला.

सात वर्षे दारिद्र्य, शारीरिक व्याधी, सामाजिक बहिष्कार, भयानक विद्वेष यांना तोंड देत तो जगला. ७२ व्या वर्षी तो मेल्यावर त्याला, बापाच्या 'क्वेकर'



पंथियांनी त्यांच्या स्मशानभूमीत गाडण्याचीही परवानगी नाकारली.

अमेरिकन स्वातंत्र्याचा विचार व्यापारी सोयीचा होता. थॉमस पेन्सची स्वातंत्र्यावरील निष्ठा निखळ आणि अनिर्बंध होती. ती अमेरिकेच्या पचनी पडणे कठीणच होते. थिओडोर रुझवेल्टसारख्यांनीही पेन्सला शिव्या घातल्या. १९४५ साली अखेरीस, पेन्सला अमेरिकन नागरिकत्वाचे हक्क मरणोपरांत देण्यात आले, एवढेच नव्हे तर अमेरिकेतील कीर्तिमान दिवंगत नेत्यांच्या स्मारकांत त्याला स्थान देण्यात आले.

जोतिबा फुले मॅट्रिकदेखील झाले नाहीत, कारण त्या काळी मॅट्रिकची परीक्षाच नव्हती. थॉमस पेन्सलाही औपचारिक शिक्षणाचा गंधही नाही; सामाजिक समतेचा पुरस्कार करण्यासाठी जोतिबांनी साऱ्या धर्मग्रंथांना 'खल्लड' ठरवून विष्णुच्या दशावतारांपासून ते वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडापर्यंत इतिहासाची एक नवी मांडणी केली. पण, अमेरिकन स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना पेन्सने साऱ्या राज्यशास्त्राच्या गाभ्यालाच हात घातला.

'सर्वोत्तम सरकार म्हटले तरी ते वाईटच. ते टाळता येत नाही, एवढेच. आणि शासन नासले म्हणजे तर ते असह्यच होते. संस्कृती जसजशी विकसित होते तसतशी शासने अनावश्यक होत जातात,

'राजसत्ता हीच मुळी रानटी संस्था, त्यात घराणेशाही आली तर त्यासारखा मनुष्यजातीचा अपमान नाही,

'स्वतंत्रता हा प्रत्येक माणसाचा हक्क आहे; इतिहास ही व्यक्तीच्या वाढत्या स्वातंत्र्याची गाथा आहे,

हे विचार पेन्स मांडत होता तेव्हा महाराष्ट्रात पानिपतच्या पराभवानंतरची बेदिली माजली होती. अमेरिकन राज्ये स्वतंत्र झाली त्याच वर्षी ॲडम स्मिथचे 'राष्ट्रांची संपत्ती' प्रसिद्ध झाले. १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती झाली, लागोपाठ पश्चिमी जगाचा तोंडवळा औद्योगिकीकरणाने आणि विज्ञानाच्या झेपेने संपूर्ण बदलून गेला. या परिवर्तनाचे श्रेय एका कोणा विचारवंतास देणे शक्य नाही; पण, एक पुस्तक प्रसिद्ध झाले त्याच्या मजकुराने सारे राष्ट्र आमूलाग्र बदलून गेले आणि निकराच्या युद्धास तयार झाले अशी उदाहरणे विरळा. थॉमस पेन्सचे 'कॉमन सेन्स्' अमेरिकेत इतिहास घडवून गेले; एवढेच नव्हे तर शतक उलटून गेले तरी जोतिबा फुल्यांना गुलामगिरीविरुद्ध संघर्ष करण्यासाठी प्रेरणा देत राहिले.

*(२ नोव्हेंबर १९९७)*

# अखेरचा विजय मायझेसचा

पेशवाई बुडाली त्या वर्षी, म्हणजे १८१८ साली कार्ल मार्क्स्‌चा जन्म झाला. वयाच्या पासष्टाव्या वर्षी तो मरण पावला. मार्क्स्‌च्या समाजवादी विचारांचा प्रभाव साऱ्या मनुष्यजातीवर शंभरसव्वाशे वर्षे राहिला. समाजवादी रशियात क्रांती झाली. मार्क्स् तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्री- सर्वच बाबीत महामानव ठरला. परमेश्वरी अवताराची व्हावी तशी त्याची पूजा झाली. देव न मानणाऱ्या कोण्या एका व्यक्तीला असे स्थान मिळाल्याचे दुसरे उदाहरण नाही. रशियन क्रांतीची सत्तर वर्षे पुरी होत नाहीत तोच तेथील समाजवादी सत्ता ढासळली. सोव्हिएत रशियाचे तुकडे तुकडे झाले. दस्तुरखुद्द मार्क्स्‌चे पुतळे रशियातच उखडले गेले. काही पुस्तकी, सिद्धांती आणि डाव्या चळवळीत हितसंबंध गुंतलेली मंडळी सोडली तर आत मार्क्स्‌चे नाव फारसे कुणी घेत नाही आणि समाजवादालाही काही भवितव्य आहे असे कुणी मानत नाही.

लुडविग फॉन मायझेस मार्क्स्‌प्रमाणेच ज्यू जर्मन समाजात वाढलेला. १८८१ मध्ये जन्मला आणि पुरी ब्याण्णव वर्षे जगून पंचवीस वर्षांपूर्वी, म्हणजे १९७३ मध्ये मृत्यू पावला. मार्क्स्‌प्रमाणेच मायझेसनेही मायदेश सोडला आणि आयुष्याची शेवटीच तेहतीस वर्षे तो इंग्लंडमध्ये राहिला.

खासगी मालमत्तेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत जो तो अधिकाधिक फायदाच मिळवून स्वतःचा स्वार्थ साधायचा प्रयत्न करतो, अशी अर्थव्यवस्था टिकू शकणार नाही, वैयक्तिक स्वार्थ आणि सामूहिक हित यांचा मेळ बसणे शक्य नाही, सारी खासगी मालमत्ता सार्वजनिक करावी, अर्थव्यवस्थेचे सारे नियोजन क्रांतिकारी मजूरवर्गाच्या नेत्यांनी करावे म्हणजे मानवी प्रगतीच्या मार्गातील सर्व अडसर दूर होतील आणि माणूस खऱ्या अर्थाने मुक्त होईल; फायद्याच्या प्रेरणेने चालणारी बाजारपेठेची व्यवस्था टिकूच शकत नाही ही मार्क्स्‌ची मांडणी.

मायझेसचा युक्तिवाद याच्या नेमका उलटा. १९२० मध्ये त्याने 'समाजवादी नियोजनाचे आर्थिक गणित' या शीर्षकाचे जर्मन भाषेत पुस्तक लिहिले.



अर्थव्यवस्थेचे सामूहिक नियोजन ही कल्पनाच भोंगळ आणि चुकीची आहे; समाजवादी नियोजनातील निर्णय हमखास चुकीचेच असतात; अशा चुकीच्या निर्णयांवर आधारलेली ही व्यवस्था फार काळ टिकणे अशक्य आहे अशी मायझेसची मांडणी.

समाजवादी व्यवस्थेत बाजारपेठ नाही, त्यामुळे मागणी-पुरवठ्याच्या आधाराने किमती ठरत नाहीत. बाजारपेठेतील मागणी, पुरवठा आणि किंमत यांच्या माहितीच्या आधारानेच गुंतवणूक किंवा उत्पादन यांचे नियोजन होऊ शकते. या माहितीच्या अभावात नियोजन मंडळाने केलेले निर्णय हमखास चुकीचे असतील.

मायझेसचे म्हणणे थोडक्यात समजावून घेऊ. समजा, आपल्याला रबर व लाकूड वापरून एक 'क्ष' वस्तू तयार करावयची आहे आणि ही वस्तू तीन वेगवेगळ्या पद्धतींनी उत्पादन करता येईल. 'अ' पद्धतीने उत्पादन केले तर २ किलो रबर आणि २ किलो लाकूड लागते; 'ब' पद्धतीने उत्पादन केले तर २ किलो रबर आणि १ किलो लाकूड लागते आणि तिसऱ्या 'क' पद्धतीने उत्पादन केले तर १ किलो रबर आणि २ किलो लाकूड लागते. 'अ' पद्धत सर्वात जास्त रबर आणि लाकूड खाते त्यामुळे ती अकार्यक्षम म्हणून त्याज्य आहे याबद्दल काही वाद राहात नाही. पण, उरलेल्या 'ब' आणि 'क' या दोन पद्धतींची तुलना कशी करायची? त्या दोघांतील श्रेष्ठकनिष्ठता कशी ठरवायची? 'ब' पद्धतीत 'क'पेक्षा रबर जास्त लागते आणि 'क' पद्धतीत 'ब'पेक्षा लाकूड. लाकूड आणि रबर यांची तुलना करण्यासारखे काही समान मोजमाप काढले तरच 'ब' आणि 'क' मधून निवड करता येईल.

खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेत उद्योजकाला हा निर्णय करण्यात काही अडचण येत नाही. बाजारात रबराची किंमत काय आणि लाकडाची किंमत काय हे पाहिले की कोणत्या पद्धतीने उत्पादनखर्च तुलनेने कमी येईल हे तो सहज समजू शकतो आणि सर्वात फायदेशीर असा मार्ग स्वीकारू शकतो.

'समाजवादी व्यवस्थेत खुली बाजारपेठेच नाही. त्यामुळे उत्पादनाचे वेगवेगळे घटक - भांडवल, जमीन, यंत्रसामग्री, कच्चा माल इत्यादी- यांचे वाटप वेगवेगळ्या कामांसाठी कसे करावे हा निर्णय कायमचाच अंदाजपंचे करावा लागतो. तस्मात्, समाजवादी नियोजन हे मूलतःच अकार्यक्षम राहाणार.' हा मायझेसचा सिद्धांत. समाजवादी व्यवस्थेत आर्थिक गणित करता येते किंवा नाही असा हा गणिताचा वादविवाद मोठा गाजला.

मायझेसचा युक्तिवाद म्हणजे विनाकारणी शब्दच्छल आहे, प्रत्यक्षात समाजवादी व्यवस्थेत निर्णय करण्यात कोणतीही सैद्धांतिक अडचण येत नाही असे विरोधकांनी मांडले. समाजवादाच्या चढत्या काळात एका अर्थाने मायझेसच्या सिद्धांताचा पाडाव झाला आणि तो कालाच्या गर्तेत जमा झाला; निदान असे काही काळ वाटले.

१९५१ पासून भारतातही पंचवार्षिक नियोजन सुरू झाले. नेहरूंच्या कल्पनांना 'हो ला हो' देऊन त्याला सैद्धांतिक आणि संख्याशास्त्रीय आधार देणारा कोणी एक महालनोबीस भेटला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची तयारी चालू असताना जगभरचे ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ भारताला भेटी देण्यासाठी बोलविण्यात आले. या पाहुण्या तज्ज्ञांत प्रो. लांज आले तेव्हा अगदी 'साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' असा आनंदीआनंद जाहला ! लांजसाहेबांनी भारतीय नियोजन पद्धतीची वाखाणणी केली तेव्हा साऱ्या सरकारी समाजवाद्यांनी 'जितं मया, जितं मया' चा गोंगाट केला.

त्या काळी डॉ. ऑस्कर लांज यांची कीर्ती होतीही तशीच. त्या काळापावेतो अर्थशास्त्रासाठी नोबेल पारितोषिक दिले जात नव्हते; लांजसाहेबांना ते नंतर मिळाले. तरी त्यांच्या नावाचा मोठा दबदबा होता.

मायझेसच्या गणिती युक्तिवादाला लांजसाहेबांनी मोठे चपखल आणि सडेतोड उत्तर दिले असे सारे अर्थशास्त्री माना डोलावून त्यावेळी बोलत. (समाजवादाचे अर्थशास्त्र १९२७)

लांजचा युक्तिवाद काय होता? खुली बाजारपेठ नसली तरी समाजवादी नियोजकांना गुंतवणुकीचे निर्णय करण्यास अंधारात चाचपडावे लागेल हे खरे नाही. सर्वसाधारण कोणत्याही वस्तूच्या उत्पादनाला किती श्रमशक्ती लागते याच्या अनुमानाने नियोजन मंडळ यच्चयावत् सर्व गोष्टींच्या किमतींचा एक तक्ता बनवू शकेल. अर्थातच, या तक्त्यातील किमती साऱ्या बरोबर असणे शक्य नाही आणि तक्ता वारंवार परिस्थितीनुरूप बदलावा लागेल. तक्त्यातील किमतीप्रमाणे नियोजनाचे काम चालू झाले की काही वस्तूंचा पुरवठा कमी पडतो आणि काही वस्तू मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नाहीत हे व्यवहारात सहज लक्षात येईल. ज्या वस्तूंचा पुरवठा फालतू असेल त्यांच्या तक्त्यातील किमती कमी करणे आणि ज्या वस्तूंचा तुटवडा असेल त्यांच्या किमती वाढविणे यात कोणतीच अडचण येऊ नये. उत्पादन करणाऱ्या कोणत्याही कारखान्याने आपले उत्पन्न आणि खर्च यांची तोंडमिळवणी होते हे पाहावे आणि नियोजन मंडळाने प्रत्येक वस्तूची किंमत



तिच्या सीमांत उत्पादनखर्चाइतकी असेल असे पाहावे. झाले प्रश्न सुटला! खेळ खल्लास! समाजवादी नियोजनात अडचण कोणतीच राहिली नाही- ना सैद्धांतिक, ना व्यावहारिक!

प्रत्यक्ष सोविएत रशियातील नियोजनात सारा अनुमान धपकाच चालत होता. सारा अनुभव तुटवड्याचा आणि भूकमारीचा. नियोजनात चूक दिसून आली की किमतीचे तक्ते बदलण्याचे व नियोजकांचे शिरकाण करण्याचेच प्रकार जास्त. प्रा. लांज यांनी शास्त्रशुद्ध रीतीने नियोजन करणे अशक्य नाही हे कागदोपत्री दाखविण्याचा खटाटोप केला, एवढेच. खरे म्हटले तर ही सारी लांजसाहेबांची हातचलाखी होती. मागणीपुरवठ्याच्या आधाराने बाजारात किमतीचा फेरफार तातडीने होतो. मागणी किंवा पुरवठा यांचे गणित चुकले याची माहिती समाजवादी नियोजकांना मिळायलाच बराच काळ जावा लागतो. त्यानंतर ते अभ्यास करणार, सल्लामसलती करणार, किमतीचे तक्ते सुधारणार, मग ते साऱ्या देशातील उत्पादक संस्थांना कळविणार. तोपर्यंत पुन्हा एकदा मागणीपुरवठ्याची परिस्थिती सारीच पालटून जाणार नाही कशावरून ? आणखी एक महत्त्वाचा मुद्दा. बाजारपेठेतील प्रत्येकाला नेमके काय पाहिजे, हे स्पष्ट असते. स्वतःचा फायदा जास्तीत जास्त व्हावा असा प्रयत्न असतो. समाजवादी नियोजकांना देशाच्या भल्याचे काय याची निसर्गसिद्ध स्वयंस्फूर्त प्रेरणा कोणतीच नसते. नियोजनामध्ये त्यांना गणित मांडावे लागते त्या साऱ्या गणिताचा आधारच मोठा ठिसूळ. मग, नियोजकही वैयक्तिक स्वार्थाने- पैशाच्या लोभाने किंवा सत्तेच्या लालसेने आर्थिक प्रश्नांसंबंधी निर्णय घेणार नाहीत असे समजण्याला काय आधार आहे? खऱ्याखुऱ्या जिवंत बाजारपेठेऐवजी लांजसाहेबांनी लिखापढीची बाजारपेठ उभी केली, एवढेच; पण, तेवढ्यावरच वादविवादातील बाजी तर मारली!

शेवटी समाजवादी व्यवस्था सर्वत्रच कोसळल्या. समाजवादाच्या पराभवाचे कारण कोणता ऐतिहासिक अपराध नाही; कोणी भ्रष्टाचारी क्रूरकर्मा हुकूमशहा नाही; अर्थव्यवस्थेसंबंधी सामूहिक निर्णय अशक्यप्राय असल्याने समाजवाद कोसळला हे सर्वमान्य झाले. लुडविग फॉन मायझेस अखेरीस खरा ठरला. कित्येक वर्षांच्या वनवासानंतर मायझेसला अर्थशास्त्रात परमपद मिळाले.

■■

# 'हां, मंत्रीजी!'

एका पुस्तकाने विचारांची दिशाच बदलली, संदर्भ बदलले असे काही फक्त गंभीर प्रतिपादन करणाऱ्या प्रबंधांनीच होते असे नाही. समाजव्यवस्था, अर्थकारण, राजकारण यांच्यावर प्रभाव पाडणाऱ्या ललित पुस्तकांचीही अनेक उदाहरणे आहेत.

हरि नारायण आपट्यांच्या 'पण, लक्षांत कोण घेतो?' या एका कादंबरीने 'यमू'चे हृदयस्पर्शी चित्रण करून ब्राह्मणसमाजातील विधवांच्या जीवनाचे चित्र असे मांडले की त्यांच्याविषयीची उपेक्षेची, तिरस्काराची आणि हेटाळणीची भावना जाऊन समाजमनाला सहानुभूतीचा ओलावा स्पर्शून गेला. शरदबाबूंच्या बंगालीतील 'सव्यसाची' या कादंबरीतील 'डॉक्टर' या गूढ, धाडसी क्रांतिकारकाच्या चित्रणाने अनेकांना स्वातंत्र्यसंग्रामात उतरण्याची प्रेरणा दिली.

जॉर्ज ऑरवेलच्या 'ॲनिमल फार्म (Animal Farm)' या पुस्तकाने तर एका साध्या रूपककथेने साम्यवादाचा बुरखा टराटरा फाडून आतील नागडी महत्त्वाकांक्षा, क्रौर्य आणि पिसाटपणा उघड केला. एका शेतावरील वेगळी वेगळी जनावरे 'आपण कष्ट करतो, दूध देतो, अंडी देतो; त्यांचा उपभोग शेतमालक घेतो आणि शेवटी तो सगळ्या प्राण्यांची कत्तल करून त्यांचे मांसही खातो' या अन्यायाविरुद्ध बंड करून उठतात; मालकाला मळ्यावरून हाकलून लावतात आणि मळ्यात जनावरांचे राज्य उभे करतात. आदर्शवादाचा पहिला काही काळ सोडला तर प्राण्यांमधीलच डुकरे जमीनमालकाची जागा घेतात आणि इतर जनावरांचे शोषण पूर्वीपेक्षाही अधिक निष्ठूरपणे करतात. एवढी ही साधी गोष्ट. पण तिने, दुनियेतल्या यच्चयावत् भौतिक आणि सामाजिक शास्त्रांचा अधिकार सांगून, प्रकांडपांडित्याचा आव आणून साम्यवाद हीच इतिहासाची दिशा आहे, साम्यवादी व्यवस्था हेच सर्व सृष्टिक्रमाचे आणि नियतीचे अटळ उद्दिष्ट आहे असे मानणारे ग्रंथसहस्र, त्यांच्या मागील राजकीय सुलतानी आणि पाशी ताकद यांचा सारा इमला पार डळमळीत करून टाकला.

ही सारी उदाहरणे काही फक्त जुन्या काळातच घडली असे नाही. अगदी अलीकडच्या काळातही ॲन रँड या अमेरिकन लेखिकेच्या 'शेषाचा थरकाप (Atlas Shrug), या कादंबरीने शतकानुशतके रूढ झालेल्या नैतिकतेच्या तत्त्वज्ञानाला धक्का दिला. परोपकारातील दंभ आणि निरर्थकता उघड असताना स्वार्थी मंडळींनी त्याचे तत्त्वज्ञान कसे केले आणि प्रतिभाशाली कलाकार, संशोधक, उद्योजक यांनाच खलपुरूष कसे ठरविले याच्या प्रभावी चित्रणाने तिने साऱ्या विचारवंतांनाच एक हादरा दिला. अश्या तऱ्हेने जग हलवून सोडणारे ललित साहित्य गंभीर प्रकृतीचेच असले पाहिजे असे नाही. अगदी अलीकडे, जोनाथन आणि ॲंटनी जे या लेखकद्वयांनी दोन धमाल पुस्तके लिहिली आणि राजकीय पुढारी, शासन व खास करून नोकरशहा यांच्या संबंधीच्या साऱ्या कल्पना बदलून टाकल्या. पहिल्या खंडाचे नाव 'हां, मंत्रीजी (Yes Minister), आणि दुसऱ्या खंडाचे नाव 'हां, प्रधानमंत्रीजी (Yes Prime Minister)'.

पहिला खंड १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर किती आवृत्त्या किती भाषांत प्रकाशित झाल्या याचा हिशेब लावणे कठीण आहे. इंग्लंडमधील प्रसिद्ध दूरदर्शन बीबीसीने दोन्ही खंडांतील वेगवेगळ्या प्रहसनांची एक मालिका बनविली. या मालिकेने सर्वच कथानकातील पात्रे आणि प्रसंग घरोघर पोहोचविले. त्यातील राजकारणी नेता हॅकर आणि त्याचा मंत्रालयातील प्रमुख सचिव हंफ्रे ही जोडी प्रकाशली, न प्रकाशली तोच अजरामर झाली. त्यांचे शब्दप्रयोग, वाक्प्रचार दररोजच्या बोलण्याच्या शब्दसंग्रहात चपखल घुसून गेले. जेम्स् हॅकर हे एक काल्पनिक पात्र. मध्यमवर्गात जन्मलेला, फार बुद्धिमान नसल्याने ऑक्सफर्ड-केंब्रिजसारख्या प्रतिष्ठाप्राप्त विद्यापीठात प्रवेश मिळवू न शकलेला, त्यामुळे लंडन स्कूल ऑफ् इकॉनॉमिक्स्ची पदवी घेतलेला. (भारतातील मान्यताप्राप्त विद्वान नेते बहुधा लंडनच्या याच विद्यापीठात शिकलेले आहेत.) आपले शिक्षण काही फार उच्च कोटीचे नाही याबद्दल त्याच्या मनात काही न्यूनगंड आहे. काही काळ एका पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक राहून हॅकर राजकारणात पडतो, एक साप्ताहिक चालवतो, शासनव्यवस्थेत सुधारणा व्हावी यासाठी चळवळीही चालवतो. अखेरीस त्याच्या पक्षाचा खासदारही बनतो. दोन वेळा विरोधी पक्षात राहून समांतर मंत्रिमंडळात (Shadow cabinet) शेतीविषयाचा विशेषज्ञ होतो. आणि नंतरच्या निवडणुकीत त्याच्या पक्षाला बहुमत मिळते. पक्षाच्या नेतेपदाची निवडणूक होते तेव्हा त्याने पाठिंबा दिलेला उमेदवार हरतो. पण तरीही, मंत्रिमंडळात त्याची वर्णी लागते आणि 'सामान्य प्रशासन' या खात्याचा तो मंत्री बनतो.

बुद्धिमत्तेने सुमार असला तरी राजकारणी पुढाऱ्यांचे डावपेचांचे अशिक्षितपटुत्व त्याच्याकडे भरपूर आहे. भाबडेपणाने आपण असे काही करून दाखवावे की ज्यामुळे

आपले नाव इतिहासात चिरंतन होईल असा त्याचा ध्यास असतो. इतिहासापेक्षा, खरे म्हटले तर, दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत आपले नाव झळकावे, आपल्यासंबंधीच्या बातम्या ठळक मथळ्यांत याव्या, चांगला फोटो छापला जावा यासाठी त्याची सगळी धडपड; त्यात टेलिव्हिजनच्या छोट्या पडद्यावर झळकले म्हणजे तर गंगेत घोडेच न्हाले ! मंत्रिमंडळातील इतर काही सहकारी कनककांतांच्या भानगडीत बऱ्यापैकी निष्णात. पण हॅकर, भित्रटपणाने का होईना, धुतल्या तांदळासारखा शुद्ध चारित्र्याचा. प्रसिद्धी आणि मान्यता यांच्या हव्यासापोटी का होईना, आपल्या हातून काही भव्यदिव्य घडावे अशी त्याची इच्छा. पण, काहीही असले तरी दोन गोष्टींचे कडक पथ्य पाळायचे. कोणत्याही तऱ्हेने वर्तमानपत्रांत विरोधी वादळ उठता कामा नये आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधानांची खप्पामर्जी तर सोडाच, पण नाराजीदेखील होता कामा नये. पंतप्रधान नाखूश झाले तर एका सेकंदात मंत्रिपदाची शान संपून राजकीय कारकीर्द संपुष्टात येईल ही धास्ती टांगत्या तलवारीप्रमाणे सतत डोक्यावर.

अश्या मंत्रिमहाशयांची गाठ पडते ती सामान्य प्रशासन मंत्रालयाचे प्रमुख सचिव हंफ्रे याच्याशी. हंफ्रे सनदी नोकरशहांचा अस्सल नमुना. शाळेत, कॉलेजात आपल्या बुद्धितेजाने गाजलेला, शिक्षणक्रमात ग्रीक, लॅटिन, इंग्लिश साहित्य असे कलाविषय घेऊन प्रतिष्ठित विद्यापीठातील एका नामवंत महाविद्यालयातून वाजतगाजत उत्तीर्ण झालेला; नंतर सरकारी नोकरीत प्रवेश करून मुरत मुरत सचिवपदापर्यंत पोहोचलेला. 'राजकारणी नेते मंत्री बनून येतात, त्यांना फारशी काही बुद्धी आणि कर्तबगारी असत नाही; पण, मंत्री बनल्यानंतर नाव गाजविण्यासाठी ते काय वाटेल ते करून प्रसिद्धपुरुष होऊ पाहतात. आणि मंत्र्यांच्या असल्या खटाटोपीतून देश व शासनव्यवस्था सुरक्षित राखणे हे प्रशासनाचे काम आहे.' अशी त्याची पक्की धारणा. नोकरशाही कार्यपद्धतीत चोख. प्रत्येक गोष्टीची, घटनेची, चर्चेची बारकाईने नोंद करणार. अखेरचा निर्णय मंत्र्यांचा, आपण काय हुकुमाचे ताबेदार, मंत्र्यांना त्यांचे निर्णय कार्यक्षमपणे कार्यवाहीत आणण्यास मदत करणे एवढेच काय ते आपले काम असा वरकरणी आव आणणारा हंफ्रे पक्का आतल्या गाठीचा आणि पाताळयंत्री आहे.

हॅकरने नवनव्या कल्पना काढाव्यात आणि प्रत्येकवेळी कोणत्याही तऱ्हेने त्यांना उघड विरोध न करता नोकरशहा हंफ्रेने त्या हाणून पाडाव्यात अशा कित्येक प्रसंगांची मालिका पहिल्या खंडात मांडली आहे. कर्मधर्मसंयोगाने, पंतप्रधान निवृत्त होण्याचे ठरवतात आणि त्यांचा वारसदार कोण होणार याबद्दल विदेशमंत्री आणि



वित्तमंत्री यांच्यात रस्सीखेच चालू होते. याच वेळी हंफ्रेला बढती मिळून तो कॅबिनेट सेक्रेटरी होतो. हंफ्रे आणि हॅकरचे नाते बदलते. कॅबिनेट सेक्रेटरी म्हणजे पंतप्रधानांचा कान असलेली व्यक्ती. हॅकर आता त्याच्या पुढेच चापलुसी करू लागलेला असतो. नोकरशहांना वित्तमंत्री आणि विदेशमंत्री यांच्यापैकी कोणीही पंतप्रधान व्हावे हे मंजूर नसते. त्यांची तक्रार अशी की दोघेही फार बुद्धिमान आणि तडफदार आहेत; त्यांच्या हाती पंतप्रधानपद गेले तर ते सारी शासनव्यवस्था ढवळून काढतील, मोठमोठे बदल घडवून आणण्याचा आग्रह धरतील. हे नोकरशहांना कसे पसंत पडावे? दोन उमेदवारांपैकी एकाची नाजूक प्रकरणे आणि दुसऱ्याचे आर्थिक घपले यांचे कागदोपत्री पुरावे हंफ्रे हॅकरच्या हाती देतो. हॅकर त्यांचा कुशलतापूर्वक वापर करतो, दोघांनाही माघार घ्यायला लावतो आणि स्वत:च पंतप्रधान बनतो; एवढेच नव्हे तर, यथावकाश इंग्लंडचा मान्यवर मुत्सद्दी नेता बनतो. हंफ्रे आणि त्याची जोडी आता कॅबिनेट सचिव आणि पंतप्रधान म्हणून जमते आणि जुने द्वंद्व चालू राहाते. हॅकर मंत्री असतानाचे संघर्ष प्रशासकीय व्यवस्थेसंबंधी; पंतप्रधान बनल्यानंतरचे संघर्ष राष्ट्रीय पातळीवरच्या धोरणांसंबधीचे होते.

दोन खंडांची ही माला म्हटली तर विनोदी; पानापानाला पोट धरधरून हसायला लावणारी. पण, सारी मांडणी कागदोपत्रांच्या आधारे अशी केलेली की जणू काही आपण एका कालखंडाचे ऐतिहासिक दफ्तर वाचीत आहोत असे वाटावे. मुख्य सूत्र हॅकरची डायरी. पण, त्याच्या बरोबर हंफ्रेची डायरी, खासगी सचिव बर्नार्ड याची टिपणी, तत्कालीन नेत्यांची प्रसिद्ध झालेली चरित्रे आणि आत्मचरित्रे. तीस वर्षांनंतर सर्व सरकारी दफ्तरे खुली करण्याच्या निर्णयामुळे अशा प्रकरणांतील गोपनीय मजकूर यांची मांडणी इतकी बहारदार झाली आहे की, आपण एखाद्या खऱ्याखुऱ्या प्रधानमंत्र्याचे जीवनचरित्र वाचत आहोत असा भास व्हावा. हसवणूक करणाऱ्या या पुस्तकामागे प्रचंड अभ्यास आणि संशोधन आहे. अगदी अशक्यप्राय वाटणाऱ्या घटना इंग्लंडच्या इतिहासात प्रत्यक्षात घडल्या असल्याचे संदर्भ दिले आहेत. नेते आणि नोकरशहा यांच्या संघर्षातून खुसखुशीत विनोद केलाच आहे, पण त्या पलीकडे राजकारण, आर्थिक प्रश्न, समाजकारण, प्रशासन यासंबंधी इतक्या मूलभूत कल्पनांचा ऊहापोह आहे की तसा विषयांवरील गंभीर प्रबंधांतही दुर्मिळ आहे.

राजीव पंतप्रधान असताना त्यांच्या आसपास 'डून स्कूल' मधील 'बाबा लोग' आपण मोठे बुद्धिमंत आहोत, राजकारणाशी संबंधित सर्व विषयांचा आपला भला दांडगा व्यासंग आहे, त्याविषयी बोलताना आपण शैलीदार इंग्रजीत नर्म विनोदाचा

आल्हाददायक वापर करतो असा आव आणीत. या सगळ्यांचा सारा 'व्यासंग' मुख्यतः 'हां, मंत्रीजी' आणि 'हां, प्रधानमंत्रीजी' या दोन पुस्तकांपुरताच मर्यादित होता, अशी वदंता आहे. आणि राजीव गांधींनी ही पुस्तके वाचली होती किंवा नाही हे सांगणे कठीण आहे; पण, टेलिव्हिजनसमोर खिळून बसून ते बीबीसीवरील मालिकेच्या कॅसेटस् पुन्हापुन्हा लावून पाहात याला भरपूर पुरावा आहे. राजकारणातील नेते आणि नोकरशहा यांचे एका बाबतीत मोठे जमते. पुढाऱ्यांना मोठेपणाची, मिरवण्याची, प्रसिद्धीच्या झोतात येण्याची मोठी हाव असते. त्यातले सर्वसाधारण नेते वर्तमानपत्रांत आपले नाव, फोटो झळकेले किंवा रेडिओवर घेतले गेले आणि दूरदर्शनवर छबी झळकली म्हणजे खूश असतात. त्यांच्यातल्या थोरांची उडी अधिक मोठी असते. आपले नाव इतिहासात लिहिले जावे आणि अजरामर व्हावे असा ध्यास बाळगून असतात. नोकरदार वरिष्ठ असो का कनिष्ठ, सतत बढती मिळत मिळत वर चढावे, आपल्या हाताखाली कनिष्ठ नोकरदारांचे वाढते साम्राज्य असावे, आपल्या खात्याकडे अधिकाधिक सत्ता यावी अशी त्यांची लालसा असते.

पुढारी लोक त्यांचे हेतू साध्य करण्याकरिता शासनाकडे अधिकाधिक सत्ता असावी यासाठी प्रयत्न करीत राहतात. या बाबतीत साऱ्या पक्षांचे एकमत असते. सर्वच पक्ष राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी इत्यादी क्षेत्रांतील सर्व सूत्रे शासनाहाती एकवटण्यासाठी झटत असतात आणि दुसरा टप्पा म्हणून ही सत्ता आपल्या पक्षाच्या हाती यावी आणि पक्षातही आपल्या स्वतःच्या हाती यावी यासाठी धडपडत असतात. यासाठी ते लोकप्रियतेचा हव्यास धरतात, निवडणुकींचा खटाटोप करतात; निवडणूक जिंकली म्हणजे अधिकारासाठी, मंत्रिपदासाठी, मुख्यमंत्रीपदासाठी, अगदी पंतप्रधान होण्यासाठीही वाढत्या श्रेणीने अट्टाहास करतात. निवडणूक हरली म्हणजे त्यांचे सारे जग कोसळते आणि ते बाजूला पडतात. पुढाऱ्यांचा हव्यास हा झपाट्याने वर चढण्याचा असतो. वाटेल तो धोका पत्करून वेळ अनुकूल आहे तेवढ्यात चमकून जाण्याचा त्यांचा इरादा असतो.

नोकरदारांमध्ये ही धाडशी किंवा जुगारी वृत्ती नसते. सत्ता तर हवी असते, पण ती मिळविण्यासाठी आयुष्य फेकून देऊन धोका घेण्याची त्यांची प्रकृती नसते. सत्ता तर पाहिजे, पण ती एका फटक्यात हातातून निघून जाण्याचा धोकाही नको अशा हिशोबाने ते सरकारी नोकरीत येतात, हळूहळू वर चढत जातात, नोकरदारांचे साम्राज्य वाढवीत जातात. सर्वोच्च सत्ता धोका घेतल्याखेरीज मिळत नाही, तस्मात् ते दुय्यम दर्जाची सत्ता हाती ठेवण्यात समाधान मानतात. आपले नाव गाजावे अशी



गुप्त इच्छा त्यांच्याही मनांत असते. संधी मिळेल तेव्हा प्रसिद्धी माध्यमांशी संपर्क साधायचे ते सोडीत नाहीत. पण, एरवी आपल्या नावाचा गाजावाजा त्यांना करता येत नाही. त्यांची परिस्थिती काहीशी कर्तबगार गृहिणीसारखी असते. आपल्याला पाहिजे ते निर्णय नवऱ्याकडून करून घ्यावे, नाव नवऱ्याचेच असावे; उलट, कोणी काही श्रेय देऊ लागले तर "मी बाई माणूस, मला काय कळते?" असाच आविर्भाव ठेवायचा. नोकरदारही असेच करतात. "निर्णय मंत्र्यांनी घ्यायचे; त्यांना सर्व प्रकारची माहिती पुरविणे, सल्ला देणे, वेगळे वेगळे पर्याय दाखविणे, त्यांचे भलेबुरे परिणाम लक्षात आणून देणे आणि एकदा निर्णय झाला की त्याची यथायोग्य अंमलबजावणी कार्यक्षमतेने करणे एवढीच काय ती आपली विनम्र भूमिका आहे" असे ते जगासमोर तरी दाखवितात.

पण, प्रत्यक्षात घडते ते वेगळे. निवडणुकीनंतर एखादा पक्ष चांगल्या बहुमताने सत्तेवर आला तरी एकच मंत्री पुढच्या निवडणुकीपर्यंत मुदतभर एकाच खात्याचे काम पाहतो असे क्वचित घडते. मंत्रिमंडळात खातेपालट करीत राहणे हा पंतप्रधानांचा सत्ता हाती ठेवण्याचा आवडता खेळ असतो. सर्वसाधारणपणे, एक मंत्री एका मंत्रालयात सरासरीने दीडदोन वर्षेच राहतो; मंत्री येतात आणि जातात. त्यांचे सचिवालय कायमच राहते. त्यामुळे खात्याच्या दैनंदिन कामकाजाची जबाबदारी, नाही म्हटले तरी सचिवालयावरच पडते. औटघटकेच्या मुक्कामात मंत्र्यांनी खात्याच्या कामात फारशी ढवळाढवळ करू नये, खात्याची वकिली करून मंत्रिमहाशयांनी खात्यातील नोकरदारांची संख्या वाढवावी, कार्यक्रम, प्रकल्प इत्यादी मिळवावेत आणि एरवी सारे काम सचिवांकडे सोपवून समारंभ, उत्सव, उद्घाटने, परिषदा, परदेशप्रवास इत्यादी करीत वेळ काढावा अशी त्यांची माफक अपेक्षा असते.

पहिल्यांदा मंत्री म्हणून निवड झालेले पुढारी मंत्रालयात येतात ते उत्साहाने ओसंडत. आतापर्यंत या खात्यात नुसता सावळा गोंधळ, बजबजपुरी आणि लाल फितीचाच कारभार होता; आपण तातडीने मोठा चमत्कार घडवून आणू, खात्याचे प्रशासन सुधारू, कार्यक्षमता वाढवू, नवनव्या प्रतिभाशाली योजना आखू, अमलात आणू, मग वर्तमानपत्रांत आपले नाव झळकेल, कर्तबगार मंत्री म्हणून आपण ओळखले जाऊ, आपली सारी गुणसंपदा लवकरच पंतप्रधानांच्याही ध्यानात येईल आणि कोणी सांगावे, नशिबाने थोडा हात दिला तर (सत्यसाईबाबांची नित्याने आराधना केली आणि काही अरिष्टमोचन यज्ञ केले तर गुरू पालटतोच) एक दिवस आपण पंतप्रधानही होऊन जाऊ अशी 'शेख महमंदी' स्वप्ने रंगवीत ते आपल्या नवीन मंत्रालयात येतात.

सचिव लोकांनी हे नाटक दर दीडदोन वर्षांच्या अंतराने पाहिलेले असते. आपल्या नवऱ्याची खरी हुशारी काय आहे, वकूब काय आहे हे त्याच्या बायकोला पक्के ठाऊक असते. पण, बाहेरच्या जगातल्या आणि ऑफिसातल्या आपल्या कर्तबगारीच्या गप्पा तो मारू लागला की, चेहऱ्यावर सारे कौतुक आणि उत्साह आणून ''अय्या खरंच ! तुमची तरी किती कमाल ! मला, तुमचा कित्ती अभिमान वाटतो! एक दिवस तुम्ही नक्की कोणी तरी खूप खूप मोठ्ठे होणार !'' असा ती अभिनय करते. नवीन मंत्र्यांच्या बाबतीत सचिव लोक हेच नाटक करतात. ''आपल्या खात्यात कामकाजात खूपच दोष आहेत, कितीतरी काम करण्यासारखे आहे, पण आजपर्यंत आम्हाला योग्य असे नेतृत्वच मिळाले नव्हते; आता आपल्यासारखा धडाडीचा, कर्तबगार, अभ्यासू, राजकीय प्रभाव व लोकप्रियता असलेला आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, पंतप्रधानांच्या अगदी जवळच्या वर्तुळात असलेला मंत्री आम्हाला मिळाला. आता खात्याचाच काय, साऱ्या देशाचाच कायापालट होऊन जाईल.'' असे एखाद्या कसबी नटाच्या कुशलतेने तोंडावर योग्य ते आविर्भाव आणीत ते भलावणी करतात.

मंत्र्यांनी एखादी नवी योजना काढली की ती कितीही वावदूक आणि आचरटपणाची असली तरी सचिव त्याला खुले आम विरोध कधीच करीत नाही. उलट, ''या कल्पना तुम्हाला सुचतात तरी कश्या? आम्ही इतकी वर्षे या क्षेत्रात काम करतो आहोत, आम्हाला नाही हे सुचले ! फारच नावीन्यपूर्ण ! फारच प्रतिभाशाली ! फारच धडाडीची आहे आपली कल्पना !'' सचिवांनी अशी प्रतिक्रिया दिली की समजावे की त्यांचा योजनेला कडाडून विरोध आहे. खात्याची चक्रे वर्षानुवर्षे चालविणाऱ्या सचिव लोकांच्या शब्दकोशात 'प्रतिभाशाली', 'धाडसी', 'नावीन्यपूर्ण' या सगळ्या शिव्या आहेत. मग, असे तोंडदेखले स्वागत केले की आपली एक एक ठेवणीतील हत्यारे काढीत ते योजना थटविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू करतात. ''योजना उत्कृष्टच आहे, पण तिचा सर्व दृष्टिकोनांतून परिपूर्ण अभ्यास करणे आवश्यक आहे, नसता धोका नको; त्यासाठी खात्याला अभ्यास करावा लागेल, पाहणी करावी लागेल, पाहाणीनंतर अधिक अभ्यासाची आवश्यकता लक्षात येते, त्यासाठी समिती नेमावी लागते, यथावकाश समिती नेमल्यानंतर तिच्या शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी संबंधित मंत्रालयांची संयुक्त समिती बनवावी लागते, अंदाजपत्रकात तरतुदी कराव्या लागतात.'' इत्यादी इत्यादी युक्तिवादांच्या फळ्यांवर फळ्या रचून ते मंत्र्यांचा उत्साह नामोहरम करीत राहतात.

''मूळ कल्पना फारच उत्कृष्ट, पण मंत्रिमहाशय काळाच्या फार पुढे आहेत.



ही कल्पना यशस्वीपणे अंमलात आणण्यासाठी अजून काही काळ गेला पाहिजे. पूर्ण विचारांती, सर्व तयारी झाल्यानंतर, सुयोग्य वेळ आली, परिपक्व निर्णय झाला म्हणजे योजना यशस्वी होईल आणि मंत्रिमहाशयांचे नाव इतिहासात गाजल्याखेरीज राहणार नाही; निदान वर्तमानपत्रीतरी झळकल्याखेरीज राहणार नाही.'' असे मधाचे बोट ते लावीत राहतात. सर्व प्रशासनाचा हेतू नोकरदारांचे साम्राज्य वाढविणे, त्यांना भरपूर पगार, भत्ते, सुखसोयी उपलब्ध करून घेणे एवढाच असतो. राजकारण्यांच्या नवनव्या कल्पनांच्या निमित्ताने आपले साम्राज्य वाढवायला सबब मिळते एवढेच काय ते नोकरदारांना मंत्र्यांच्या कल्पनाभराऱ्यांत सारस्य असते.

नवीन मंत्री आल्यापासून त्यांचे सचिव त्यांना माणसाळविण्याच्या कामास लागतात. हळूहळू मंत्रिपदाची गोडी लागते, काही झाले तरी बुडाखालची खुर्ची जाऊ नये एवढी एकच तळमळ राहते. पंतप्रधानांच्या साध्या भुवई चढविण्यानेही मंत्र्यांचा थरकाप होतो. राजकीय सत्तेच्या शिखरावरील त्या लहानशा जगात पंतप्रधान हा सर्वशक्तिमान, 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' क्रूरकर्मा सुलतान असतो. त्याच्या एका शबासकीने मंत्री बहरून जातात आणि एका अवकृपाकटाक्षाने हवालदिल होतात. नवीन काही कर्तबगारी दाखवून नाव झळकण्याचे राहो, पण निदान वर्तमानपत्रांत, दूरदर्शनवर आपल्याविषयी काही वाईटसाईट येऊ नये आणि कोणत्याही परिस्थितीत पंतप्रधानांनी हकालपट्टीचा निर्णय घेऊ नये एवढे एकच प्रमुख उद्दिष्ट शिल्लक राहते. सचिवांना नाराज केले तर ते कोणत्या प्रकरणी आपल्याला कोठे अडकवतील याची धास्ती वाटत राहते. मंत्रिपदाच्या अधिकाराचा वापर करून नात्यागोत्यांतील लोकांवर किंवा पक्षाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या मेहेरबान्या कोठे जगजाहीर झाल्या तर भलतीच आफत व्हायची या भीतीपोटी मंत्री हळूहळू सचिवांच्या सल्ल्यानेच चालू लागतात; त्यांच्या 'हो' ला 'हो' म्हणू लागतात; सचिवांचीच भाषा, त्यांचीच वाक्ये आणि शब्दप्रयोग वापरू लागतात; ''आपल्या खात्याचा व्यवहार सगळा काही व्यवस्थित चालू आहे, पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली यात आणखी सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत'' अशी भाषा ते बोलू लागतात. ही व्यवस्था आली की मंत्री माणसाळला किंवा 'बडवला' गेला, आता काही धास्ती नाही असे सचिवालयातील सारी मंडळी समजून घेतात.

फारच हट्टाग्रही मंत्री असला तर त्यालाही वेसण घालण्याचे अनेक मार्ग सचिवांना सरावाने चांगले माहीत झालेले असतात. फार उत्साह दाखविणाऱ्या मंत्र्याला कानात एकच मंत्र सांगायचा, ''पंतप्रधानांच्या कार्यालयात बोलले जाते की हे नवे नेतृत्व पंतप्रधानांना भारी पडेल.'' की लगेच मंत्र्यांच्या उत्साहावर थंडगार

पाणी पडते. प्रसिद्धीची लालूच दाखविल्याने पुष्कळ मंत्री सरळसूत वागू लागतात आणि हुंबातल्या हुंब मंत्र्यालासुद्धा खाजगी प्रकरणात अडचणीत आणून कह्यात आणता येते. या साऱ्या युक्त्यांवर मात करणे मोठे कसबाचे काम आहे. मंत्र्यांना सचिवांनाही कोठे नाजूक खिंडीत पकडता आले आणि त्यांच्या बढतीबदलीवर टाच आणता आली अथवा त्यांच्या एखाद्या प्रकरणाची चौकशी सुरू करता आली तरच काय ते सचिवांवर कुरघोडी करता येते.

अन्यथा, नोकरशहा आणि मंत्री यांच्यात एक अलिखित करार असतो. मंत्र्याला अक्कल नाही याची वाच्यता नोकरदारांनी करायची नाही आणि नोकरदार सारे फारसे काम न करता मजेत दिवस काढीत असतात याबद्दल मंत्र्यांनी कोठे चकार शब्द काढायचे नाही.

'हां, मंत्रीजी' आणि 'हां, प्रधानमंत्रीजी' या दोन खंडांत मंत्री आणि सचिव यांच्या द्वंद्वात चांगल्या चांगल्या योजनांची काय 'गच्छन्ति' होते याचे मोठे खुसखुशीत, विनोदी आणि मार्मिक आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे डझनभर पीएच्.डी.च्या प्रबंधांकरिता पुरेल इतकी अभ्याससामग्री एकत्र करून चित्रण केले आहे. पुढारी लोक आधी सत्ता मिळविण्यासाठी जिवाचे रान करतात. सत्ता हा मुख्य कार्यक्रम; देशाची प्रगती, समाजाची उन्नती इत्यादी गप्पा निव्वळ मुखवटा. एकदा सत्ता आली की त्यांचा एककलमी कार्यक्रम: मिळालेली सत्ता कायम ठेवणे; थोडक्यात, पुढची निवडणूक जिंकणे. मंत्र्याच्या उपद्व्यापांबद्दल नोकरदारांना एकच चिंता असते: आपल्या डोक्यावर कामाचे ओझे पडू नये आणि तरीही, नोकरदारांची संख्या, वेतन आणि सत्ता वाढत राहावी.

'हां, मंत्रीजी' आणि 'हां, प्रधानमंत्रीजी' या पुस्तकांचा, नायक म्हणा का कानायक म्हणा, हॅकर हा मंत्री होतो आणि मंत्रालयाचा सचिव सर हंफ्रे. या दोघांच्या स्वार्थाची लढाई जुंपते. प्रशासनातील अवाच्यासव्वा उधळमाधळीबद्दल टीका होऊ लागते. हॅकर प्रश्न विचारू लागतो. नोकरदार किती आहेत? ते काय कामे करतात? सरकारी इमारती किती आणि कोठे आहेत? त्यांचा उपयोग काय होतो? आश्चर्य म्हणजे एका खात्याने मागील वर्षी १६० कोटी पौंडांची बचत दाखविलेली असते. हॅकरही आपल्या खात्यात काटकसर मोहीम सुरू करण्याचा विचार मांडतो. त्यामुळे सारे नोकरदार हादरून जातात. त्या खात्याने दाखविलेली बचत खरी बचतच नव्हे; केवळ कागदोपत्री आकड्यांचा खेळ आहे असे सिद्ध करण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. एक खाते इतकी बचत करू शकते असे सिद्ध झाले तर मग इतर खात्यांवर कुऱ्हाड पडायला किती वेळ लागणार? हॅकरच्या काटकसर मोहिमेला हंफ्रे काटशह



देतो ते युनियनच्या पुढाऱ्यांकडून. युनियन संपाची भाषा बोलू लागताच, 'आपली लोकप्रियता घटेल आणि पंतप्रधानांची खप्पामर्जी होईल' या धास्तीने मोहीम बंद पडते, एवढेच नव्हे तर त्यांच्या खात्यात नव्याने चारशे नोकरांची भरती करावी लागते.

सरकारी दवाखाने व इस्पितळे यांच्या खर्चातील आकड्यांत गोलमाल आहे असा आरोप विरोधी पक्षातील एक खासदार पुराव्यासकट करतात. त्यामुळे घाबरून जाऊन मंत्रिमहाशय व्यापक नि:पक्षपाती चौकशी समितीची घोषणा करतात. सचिव हंफ्रे विलक्षण नाराज होतात; 'चौकशीची मागणी मान्यच करायची तर खात्यांतर्गत चौकशीवर भागवता आले असते', असे त्याचे म्हणणे असते. स्वतंत्र चौकशी म्हणजे नोकरदारांचा मोठा धास्तीचा विषय. अर्थात, चौकशीसाठी नेमलेल्या न्यायाधीशांना कोणकोणत्या मार्गांनी कह्यात आणता येते याचा त्यांचा व्यासंग भला दांडगा असतो. एक प्रकरण असे निघते की काही वर्षांपासून एका प्रचंड हॉस्पिटलची इमारत बांधून सुसज्ज तयार आहे; वॉर्डस्, शस्त्रक्रियागृह, उपकरणे सारे तयार आहे; प्रशासनासाठी छोट्यामोठ्या चारशे लोकांची नेमणूक झाली आहे. पण, कोणी डॉक्टरच नेमला गेला नाही आणि त्यामुळे हॉस्पिटलात कोण्या रोग्याला प्रवेशच दिला गेला नाही. 'हॉस्पिटल बंद करा किंवा या चारशे नोकरदारांना दुसरीकडे टाका' असा आग्रह मंत्रिमहाशय धरतात. उलट 'रोगी नसले म्हणून काय झाले, आमच्या सगळ्या चारशे नोकरदारांना भरपूर काम आहे.' असा नोकरदारांचा पवित्रा. सचिव हंफ्रे त्या इस्पितळात एका विशेष जहाल युनियन पुढाऱ्याची बदली करतो. आणि या मुद्यावर साऱ्या आरोग्य खात्यातील नोकरदारांचा संप करण्याची धमकी देताच ही योजना बारगळते.

विरोधकांचे टेलिफोन ऐकले जातात असा आरोप संसदेत होतो आणि नामदार हॅकर 'सरकार टेलिफोन ऐकून लोकांच्या खासगी जीवनात हस्तक्षेप अजिबात करीत नसल्याचे' निक्षून जाहीर करतो. कार्यालयात सचिव हंफ्रे नाराज. ''आम्हाला न विचारताच तुम्ही अशी ग्वाही दिलीच कशी? प्रत्यक्षात फोनवरील संभाषणावर निगराणी होत असते, ठेवावीच लागते.'' उलट, मंत्रिमहाशय, ही पद्धत तातडीने बंद करावी या मताचे. तेवढ्यात, गुप्तहेर खात्याकडून संदेश येतो की एका अतिरेकी संघटनेच्या हीटलिस्टवर हॅकर साहेबांचे नाव आहे. स्वत:च्याच जीवावरच बेतल्यावर 'विशेष प्रसंगी टेलिफोनवरील संभाषणावर लक्ष ठेवण्यात काही फारसे चूक नाही.' असे ते स्वत:ला पटवून घेतात.

पर्यावरण स्वच्छ राहावे, एका संशयास्पद औषधाचे उत्पादन देशात होऊ

नये, महिलांना नोकरशाही व्यवस्थेत पुरेसा वाव मिळावा, दुसऱ्या देशांतील अतिरेक्यांना होणारा शस्त्रपुरवठा थांबवावा इत्यादी इत्यादी मंत्रिसाहेबांचे सारे प्रयत्न सर हंफ्रे नाकाम करून टाकतात. पुढे, सर हंफ्रे बढती घेऊन मंत्रिमंडळाचे सचिव बनतात आणि हॅकरसाहेबही पंतप्रधान. जुना संघर्ष या नात्यातही चालूच राहतो.

अमेरिकेकडून महागडी शस्त्रसामग्री घेण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला असतो. पण, शस्त्रास्त्रांनी देशाच्या संरक्षणव्यवस्थेत काहीच सुधारणा होणार नाही; हा फक्त लष्कर, नौदल आणि वायुदल यांच्यातील साम्राज्यस्पर्धेचा भाग आहे हे स्पष्ट होते; त्यामुळे हा करारच रद्द करावा असे प्रधानमंत्र्यांचे मत बनते. पण, प्रधानमंत्री अमेरिकेच्या दौऱ्यावर जायचे असतात आणि शस्त्रास्त्रांचा हा करार रद्द केला तर अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष पंतप्रधानांना भेटले तर नाममात्रच भेटतील; म्हणजे, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांबरोबर विशेष घसट असल्याचे प्रसिद्धीमाध्यमांत झळकणार नाही, म्हणजे पुढच्या निवडणुकीत मतांवर परिणाम होईल हे लक्षात येताच प्रधानमंत्री आपला विचार बदलतात.

मंत्रिमंडळाच्या एका बैठकीत सरकार आणि देश आर्थिक अरिष्टात असल्याने वित्तमंत्री प्रचंड काटकसरीची मोहीम आवश्यक असल्याचे जाहिर करतात. नोकरदारांची हिम्मत अशी की याच काळात साऱ्या नोकरदारांचे पगार ४० ते ५० टक्क्यांनी वाढविणे तातडीचे व महत्त्वाचे आहे असा प्रस्ताव ते मांडतात. उद्योगधंद्यातील वेतनश्रेणीच्या मानाने सरकारी नोकरांचे पगार फारच अपुरे आहेत, ही परिस्थिती अशीच चालू राहिली तर शासनाला चांगला नोकरवर्ग मिळणार नाही अशी भीती ते घालतात. सरकारी नोकरदारांना नोकरीची शाश्वती असते, सत्ता असते, मानसन्मान मिळतात व महागाईची भरपाई करणारे भत्ते व पेन्शनही मिळते इत्यादी सारे युक्तिवाद पंतप्रधान हॅकर करतात. सर हंफ्रे साहेबाची चाल काय? पगारवाढीचा प्रस्ताव ते थोडा आखडता घेतात-पाच दहा टक्क्यांनी आणि सोबतच, नोकरदारांचे पगार आणि खासदार मंत्र्यांचे पागर यांची जोड घालून देतात आणि मग, मंत्रिमंडळाचा साराच विरोध मावळून जातो.

हॅकरसाहेब सरकारी सेन्सॉरशिपच्या अगदी विरुद्ध असतात. उच्चार आणि विचार या स्वातंत्र्यावर काही बंधने नसावीत असे त्यांचे मत. पण होते काय की, त्यांच्या आधीचा पंतप्रधान आत्मचरित्र लिहू लागतो. आणि त्यातील काही प्रकरणांत हॅकर साहेबांविषयी अनेक अनुदार वाक्ये असल्याचे कळते. सारे तत्त्वज्ञान बाजूला ठेवून या पुस्तकावर बंदी आणावी असा आग्रह प्रधानमंत्री धरतात.

मध्यवर्ती सरकारात सगळ्या सत्ता एकवटल्या आहेत, त्याऐवजी नगरपालिका,



जिल्हा परिषदा, पंचायत समित्या यांच्याकडे सत्ता द्यावी किंवा त्याहीपेक्षा चांगले म्हणजे, हरेक मोहल्ल्याने आपल्या समित्या नेमून कामकाज पाहावे म्हणजे काम चोखही होईल व उधळमाधळ होणार नाही, अशी एक सूचना पुढे येते. पंचायत राज्याच्या या कल्पनेचे प्रधानमंत्री प्रचंड उत्साहाने स्वागत करतात. नोकरशाहीचा, अर्थात ठाम विरोध. अटीतटीचा सामना जुंपतो. अखेरीस, नवीन योजनेप्रमाणे मोहल्ला समित्यांचाच आदेश खासदारांना बंधनकारक राहील व सारी पक्षयंत्रणा कोसळून पडेल हा परिणाम लक्षात येताच पंतप्रधानांचा सारा उत्साह मावळतो.

राज्यकर्ते आणि नोकरशहा यांच्यातील, एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी चाललेल्या या आणि अशा प्रकारच्या असंख्य संघर्षांचे चित्रण या दोन्ही खंडांत लेखकद्वयांनी अत्यंत खुमासदारपणे केलेले आहे. अलीकडच्या काळातील लोकशाही व्यवस्थेसंबंधी इतर काहीही वाचले नाही तरी चालेल पण 'हां, मंत्रीजी' आणि 'हां, प्रधानमंत्रीजी' गेली वीस वर्षे अत्यावश्यक व अनिवार्य वाचन ठरले आहे. कहाणी आहे इंग्लंडमधील, पण भारतीय वाचकाला हे सारे येथेच घडत असावे असे वाटत राहते!

*(२, ९, १६ डिसेंबर १९९७)*

■■

# अनंतमुख लोक आणि द्विहस्त कमलाकर

इंग्लंड म्हणजे युरोप खंडाच्या वायव्येच्या कोपऱ्यांतील एक लहानसा बेटांचा जुडगा. पण, समुद्रावर स्वामित्व मिळविल्यामुळे या किरकोळ बेटांचे लष्करी सामर्थ्य त्यांच्या क्षेत्रफळाच्या आणि लोकसंख्येच्या मानाने भलतेच वाढले. युरोपमधील कोणीही देश इंग्लंडवर समर्थपणे हल्ला करू शकत नसे; उलट, इंग्लंडची गलबते आणि जहाजे मन:पूत संचार करीत लुटालूट करू शकत. साऱ्या युरोपवर आपला दबाव असावा आणि त्या खंडातील कोणत्याच देशाने इंग्लंडच्या जगभरच्या वसाहती आणि व्यापार यांच्यात ढवळाढवळ करण्याची हिम्मत करू नये असे त्यांचे धोरण. इंग्लंड युरोपखंडाचा भाग नसून सारा खंडप्राय युरोप इंग्लंडच्या शेजारी असलेला एक छोटासा प्रदेश आहे अशी इंग्रजांची जुनी मानसिकता. एकदा प्रचंड वादळांनी आणि धुक्याने युरोप आणि इंग्लंडमधील इंग्लिश खाडीवरील सर्व वाहतूक बंद पडली. युरोपमधील वर्तमानपत्रांनी लिहिले, 'इंग्लंडचा जगाशी संबंध तुटला.' इंग्रजांचे म्हणणे होते, 'युरोप खंड एकाकी पडला.'

पुऱ्या युरोप खंडातील सर्व देश एकत्र होते तर समुद्रावरील इंग्लंडची सत्ता संपविणे त्यांना काही फार दुष्कर झाले नसते. पण, युरोपातील धार्मिक सत्तेचा प्रभाव मोठा जबरदस्त होता. त्यात, निम्मे देश रोमच्या कॅथॉलिक पोपच्या वर्चस्वाखालील आणि बाकीचे प्रोटेस्टंट वा इतर सुधारणावादी. या उलट, इंग्लंडने दोन्ही धर्मसत्ता झुगारून देऊन इंग्लंडच्या राजालाच धर्मप्रमुख मानणाऱ्या पंथाला राष्ट्रीय धर्माची प्रतिष्ठा दिलेली. परिणाम असा की, जवळजवळ पाच शतके इंग्लंड युरोपातील राष्ट्रांना एकमेकांविरुद्ध झुंजवत राहिला. युरोपमध्ये कोठे युद्धाचा प्रसंग उपटला की छोट्या सत्तेची तळी उचलून धरायची आणि मोठ्या राष्ट्राला विरोध करायचा अशा 'सत्तेच्या समतोला'च्या धोरणांनी इंग्लंडने युरोपखंडातील आपले प्रथमस्थान कायम राखले ते थेट दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटापर्यंत.

साऱ्या समुद्रावरील सत्तेतील श्रेष्ठत्व लक्षात घेऊनही, सत्तेच्या समतोलाचे धोरण चालविण्यात एक मोठी अडचण होती. इंग्लंडची बेटे आकाराने लहान;



त्यात जास्तीत जास्त किती इंग्रज राहू शकतील? युरोपीय राष्ट्रांची लोकसंख्या आकाराने प्रचंड, एवढेच नव्हे तर, सतत वाढणारी. या उलट, इंग्लंडची लोकसंख्या प्रत्यक्षात घटते आहे असा एक समज प्रचलित होता. इंग्लंडची लोकसंख्या घटत राहिली तर युरोपीय लोकसंख्येच्या महापुरापुढे इंग्लंडचा टिकाव लागणार नाही या कल्पनेने इंग्रज धास्तावलेले होते.

इंग्लंडमधील पहिली जनगणना १८०१ मध्ये झाली. तोपर्यंत जनगणनेसाठी नागरिकांसंबंधी माहिती गोळा करणे म्हणजे 'नागरी स्वातंत्र्याचा अंत' अशा धारणेने जनगणनेच्या कल्पनेलाच प्रखर विरोध होत असे. चर्चमधील जन्ममृत्यूच्या नोंदी आणि घरांवरची कर आकारणी यांच्या दफ्तरांवरून नकाशे तयार करण्याचा व्यवसाय असलेल्या ग्रेगरी किंग नावाच्या माणसाने १६९६ मध्ये इंग्लंडची लोकसंख्या ५५ लाख असल्याचा अंदाज बांधला. या पलीकडे जाऊन, ही लोकसंख्या दुप्पट होण्यास २३०० साल उगवेल आणि पुन्हा एकदा लोकसंख्या दुप्पट होऊन २.२ कोटी होण्यास ३५०० किंवा ३६०० साल उजाडेल असा त्याचा ठोकताळा.

या उलट, डॉ.रिचर्ड प्राईस- व्यवसायाने पाद्री, किरकोळ औषधे, चहाकॉफी इत्यादींचा विक्रेता- याने अनुमान मांडले की, इंग्लंडची लोकसंख्या १०० वर्षांत निदान ३० टक्क्यांनी घटली आहे. प्राईसच्या या आकडेमोडेविषयी अनेकांच्या मनांत मोठ्या शंका होत्या. पण, खरेखोटे ठरविण्याचे काही साधन नाही आणि चुकून का होईना, प्राईसचा अंदाज वास्तवाला धरून असला तर? या कल्पनेनेच मोठी घबराट उडाली. 'लोकसंख्येतील घट या परते देशावर कोणतेच अधिक मोठे संकट असू शकत नाही. आणि सर्व साधनांनी सर्वतोपरी प्रयत्न करून लोकसंख्या वाढविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.' असे जाणते विद्वान म्हणून लागले. धाकटा पिट्ट त्यवेळी पंतप्रधान होता. लोकसंख्यावाढीला उत्तेजन मिळावे यासाठी गोरगरिबांना आणि विशेषत: लहान मुलाबाळांना भरपूर भत्ते देण्याची तरतूद असलेले एक बिल त्याने स्वत:च पार्लमेंटपुढे मांडले. 'जितकी अधिक मुले तितका देश संपन्न' असा विश्वास प्रचलित होता.

इंग्लंडमध्ये त्या काळी जमीनदारांनी कुळांना कादून लावण्याची जंगी मोहीम हाती घेतली होती. भारतात जसे इंग्रजांचे राज्य प्रस्थापित होईपर्यंत जमीन ही गावाची सामाईक मालमत्ता समजली जात असे तशीच परिस्थिती १८ व्या शतकात इंग्लंडमध्येही होती; जमिनीला कुंपणे नव्हती. लोकरीच्या धंद्यास तेजी चढली

आणि मोठमोठ्या जमीनदारांनी आपल्या अखत्यारीतील जमिनींना कुंपणे घातली, शेती करणाऱ्या कुळांच्या साऱ्या कुटुंबांना काढून लावले आणि मोठ्या प्रमाणावर मेंढ्या पाळण्याचा व्यवसाय चालू केला. जमिनींवरून हाकलून लावलेल्या या कुळांना जगण्यासाठी काही आधारच नव्हता. गावात जागा नाही, शहरात काम नाही. पार्लमेंटमध्ये वर्चस्व जमीनदारांचे, त्यामुळे कायदे करून परदेशातून आयात होणाऱ्या धान्यावर भरजड आयात कर लावले. शेती मोठी फायद्याची झाली. शेतकऱ्यांना ७० ते ८० टक्के नफा दरसाल मिळू लागला. या उलट, जमिनीवरून हाकून काढलेल्या लक्षावधी कुळांच्या कुटुंबीयांना पावाचा तुकडा मिळणे जड झाले. लूटमार, चोऱ्या, दरोडे घालणे किंवा भीक मागणे यापलीकडे त्यांना काही जगण्याचे साधनच राहिले नाही. पार्लमेंटने कडक कायदे केले. साध्या चोरीमारीच्या आणि खिसे कापण्याच्या प्रकरणीही फाशी किंवा सार्वजनिक जागी छळाछळाने वध करण्याच्या तरतुदी असलेले कायदे मोठ्या क्रौर्याने अमलात येऊ लागले.

विल्यम गॉडविन हा इंग्लंडच्या चर्चमधील एक सामान्य पाद्री, मधून मधून लोकोपयोगी विषयांवर चोपडी लिहून प्रसिद्ध करणारा. या साऱ्या परिस्थितीबद्दल करुणेने हेलावलेल्या विल्यम गॉडविन याने भूमिका मात्र उलट मांडली. लोकसंख्यावाढीचे तात्काळ परिणाम भयानक दिसत असले तरी दूरगामी परिणाम मात्र मोठे लाभदायक होतील असा विचार त्याने १७९३ मध्ये लिहिलेल्या 'राजकीय न्याय' या पुस्तकात मांडला. लोकसंख्यावाढीमुळे थोड्याच दिवसांत अशी परिस्थिती उगवेल की, कोणी श्रीमंत राहणार नाही, ना गरीब; युद्धे संपतील, गुन्हेगारी संपेल, न्यायदरबारांची गरज राहणार नाही आणि प्रचलित अर्थाने शासनही अनावश्यक होऊन जाईल. रोगराई, दुःख, वेदना आणि द्वेषविरहित अशा समाजाचे स्वप्न त्याने रेखाटले. हे सारे घडावे कसे? डोईजड लोकसंख्या झालेला समाज आपोआपच एक अराजक तयार करतो. त्यात करारमदार, व्यापार, देवघेव यांना काहीच स्थान उरणार नाही; अगदी विवाहाचे करारसुद्धा कालबाह्य होतील असा कम्युनिस्ट धारणीचा विचार गॉडविनने मांडला. विक्षिप्ततेच्या अतिरेकीपणामुळे त्याचे पुस्तक चांगले गाजले, जाणकारांमध्ये चर्चेचा विषय बनले.

डॅनियल माल्थस हा तत्कालीन विद्वान आणि समाजसुधारक यांच्याशी चांगली दोस्ती असलेला विचारवंत. त्याच्या घरी गॉडविनच्या या पुस्तकावर हमरीतुमरीची चर्चा चाले. या चर्चेत श्रोत्याचे काम त्याचा मुलगा रेव्हरंड थॉमस माल्थस याच्याकडे जाई.



पिताश्री माल्थस गॉडविनच्या मताचे; म्हणजे लोकसंख्या जितकी वाढेल तितके चांगले, देव खाणारे एक तोंड देतो त्याबरोबर कष्ट करण्यासाठी आणि जगण्याला आवश्यक वस्तू तयार करण्यासाठी दोन हातही देतो, वाढत्या लोकसंख्येने राष्ट्रांची ताकद वाढते, संपत्ती वाढते या मताचे.

तरूण माल्थसच्या मनाला हे पटेना. प्रजोत्पादनाचा प्रचंड ओघ आणि त्यामागील लैंगिक प्रेरणेचे सामर्थ्य या दोन्ही गोष्टी निसर्गसिद्ध आहेत आणि त्यातूनच स्वप्नमय समाजाचा उदय होईल अशी निसर्गाचीच रचना आणि बुद्धी असावी ही कल्पनाच त्याला पटेना. सभोवतालचे जग आणि गॉडविनचा स्वर्ग यांमध्ये एक दुर्लंघ्य दरी आहे अशी त्याची खात्री होती. वडिलांसमोर युक्तिवाद करण्यात तो अपुरा पडे म्हणून त्याने आपले सारे विचार लिहून काढले आणि ते बापासमोर ठेवले. बाप लिखाणावर इतका खूश की त्याने पोराचे लिखाण ताबडतोब प्रकाशित करण्याचा आग्रह धरला आणि १७९८ मध्ये पन्नास हजार शब्दांचा ग्रंथ 'लोकसंख्येचा सिद्धांत आणि त्याचे भविष्यकालीन सामाजिक प्रगतीवरील परिणाम या संबंधी प्रबंध' अशा तितक्याच बोजड नावाखाली प्रसिद्ध झाला.

माल्थसचे हे पुस्तक आणि त्याचा सिद्धांत सर्वदूर सर्वज्ञात आहे. त्याविषयी तपशिलाने लिहिण्याची गरज नाही. 'लोकसंख्या गुणाकाराच्या गतीने वाढते, एका पिढीतून दुसऱ्या पिढीत दोनाचे चार होतात आणि या नव्या तोंडाना पोसण्याचे काम त्यांच्याबरोबर जन्मलेले दोन हात करू शकत नाहीत, कारण पृथ्वीवरील जागा मर्यादित आहे, त्यात शेती करण्यासारख्या जमिनीचे क्षेत्रफळ वाढण्याची काहीच शक्यता नाही; लोकसंख्या वाढत राहिली तर त्यातून गॉडविनचा स्वर्ग तयार होणार नाही; उलट, लक्षावधी लोक कुपोषण, आजार, रोगराई आणि लढाया यांमुळे मरतील. हे भीषण चित्र टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लोकांनी संयम बाळगून मुलांना जन्म देण्याचे कमी करणे'. अश्या तऱ्हेची मांडणी करणाऱ्या माल्थसच्या पुस्तकावर वादळी प्रतिक्रिया उठल्या. प्रख्यात तत्त्वज्ञ कार्लाईल याने अर्थशास्त्रालाच भकास शास्त्राची पदवी दिली. 'एका पुस्तकाने हजारो प्रगतिवाद्यांना निराशी बनवून टाकले'' ही खुद्द गॉडविनची प्रतिक्रिया. माल्थसचा एक चरित्रकार म्हणतो, 'माल्थसइतका शिव्याशापांचा वर्षाव सोसलेला त्या काळीतरी दुसरा कोणी नव्हता.' नोपोलियन बोनापार्टसुद्धा मनुष्यजातीचा वैरी नसेल इतका हा दुष्ट माल्थस! देवी, प्लेग, कॉलरा आणि भ्रूणहत्या, दुष्काळ यामुळेच वाचली तर मनुष्यजात वाचेल; या उलट, गोरगरीबांना पोसण्यासाठी धर्मशाळा, लंगर आणि

दवाखाने चालविले तर त्यामुळे मनुष्यजातीचा पुरा विद्ध्वंस होईल असे उघड बोलणारा हा पाद्री शिव्यांचा वर्षाव झेलीत राहिला. दुर्दैवाने, याच काळात माल्थस प्रेमात पडला आणि त्याने लग्न केले. लोकांना संयमाचे धडे शिकविणाऱ्या पाद्र्याने स्वत:च लग्न केल्यावर मग टीकाकारांची धार अधिक तिखट व्हावी यात काय आश्चर्य?

माल्थस काही अरसिक नव्हता आणि मानवतेला पारखाही नव्हता. त्याने भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास केला आणि निखळ तर्काने जे भयाण भविष्य समोर दिसले ते परखडपणे सांगितले. पण, 'करुणा ही अंततोगत्वा भयानक क्रौर्य असते' इतके स्वच्छ तर्कशास्त्र लोकांना पटावे कसे? पण तरी, विल्यम पिट्टच्या आर्थिक धोरणांवर त्याचा परिणाम झालाच आणि गोरगरिबांना उदारहस्ते आश्रय आणि अन्न देण्याचे धोरण त्याने आखडते घेतले.

लोकसंख्येची गती आणि अन्नधान्याचे उत्पादन याबद्दल माल्थसने मांडलेले गणित प्रामुख्याने युरोपमधील देशांच्या परिस्थितीच्या अभ्यासाने मांडलेले होते. त्या देशांत तरी ते सिद्ध झाले नाही. नैतिक ब्रह्मचर्य आणि संयम कोणी मानला नाही. पण, कुटुंबनियोजनाच्या वाढत्या सोयींनी लोकसंख्येची वाढण्याची गती मंदावली. श्रीमंत लोक त्यापूर्वीही अशी साधने वापरून मुलांची संख्या मर्यादित ठेवीत असत. आता सर्वसाधारण लोकही त्यांचा वापर करू लागले. खेड्यांत जमिनीवर जगणाऱ्यांना मुलांचे ओझे वाटत नाही; काहीसा लाभच वाटतो. या उलट, शहरात मात्र मुले डोईजड होतात आणि कुटुंबनियोजनाकडे सहज पावले वळतात. वाढत्या शहरीकरणामुळे अर्थातच लोकसंख्या वाढीच्या गतीवर रोक बसला.

याहूनही एका महत्त्वाच्या घटकाने माल्थसचे भाकित खोटे ठरविले. तंत्रज्ञानाने अशी छलांग मारली की, शेतजमिनीचा आकार न वाढता किंवा त्यावर काम करणाऱ्या माणसांची संख्या न वाढता त्यातून निघणारे उत्पादन प्रचंड वाढत गेले. त्याशिवाय प्लेग, कॉलरा इत्यादी साथींचा बंदोबस्त झाला; त्याच्या काळी सर्वसाधारण आयुर्मान पंचवीसतीस वर्षांचे होते ते तिपटीने वाढले; पण माल्थसनंतर दोनशे वर्षे उलटून गेली तरी अन्नधान्याच्या तुटवड्याचा प्रश्न उद्भवला नाहीच, उलट अति सेवनाने होणारे आजार हा चिंतेचा विषय बनला.

लोकसंख्येविषयी माल्थसने दाखविलेली भीती खोटी ठरली. पण, माल्थसने मनुष्यजातीच्या साऱ्या विचारपद्धतीला एक कलाटणी दिली. निसर्ग काही दोन्ही हातांनी संपन्नता उधळणारा दाता नाही. 'माणसांच्या गरजा आणि भुका वाढत राहतात, त्यांना अंत नाही आणि निसर्गतर कवडीचुंबक आहे.' हा सर्व निसर्गातील स्वयंसिद्ध विरोध माल्थसने प्रकाशात आणला ही त्याची ऐतिहासिक कामगिरी.

(२९ डिसेंबर १९९७)



# भक्षकाय स्वाहा:

सर्व वर्णातील स्त्रिया, वैश्य आणि शूद्र यांना भगवद्‌गीतेत स्वयम् श्रीकृष्णाने 'पापयोनी' म्हटले आहे. आणि कबीराने 'ढोर गँवार शूद्र पशु नारी। ये सब ताडन के अधिकारी ॥' म्हटले आहे. वर्णाश्रम धर्मातील अधिकारी पुरुषांनी स्त्रिया, वैश्य, शूद्र आणि पशू यांना एका पंक्तीत कसे काय बसवले?

पाणिनीचे 'श्वानम् युवानम् मध्वानम्।' असे सूत्र आहे. म्हणजे कुत्रा, तरुण आणि इंद्र या अर्थाचे संस्कृत शब्द एकाच नियमाने चालतात असे व्याकरण आहे. अशा काही चमत्कृतिजन्य अपघाताने हे चार घटक एकत्र 'पापयोनी' ठरले काय?

'पापयोनी'ची मालिका अपघाती चमत्कृतिजन्य नाही. पशू, स्त्रिया, वैश्य आणि शूद्र यांच्यात एक समानता आहे. मनुष्याच्या कामी येणाऱ्या साधनांचा गुणाकार करणे हा ज्यांचा गुणधर्म त्यांना धार्मिकांनी 'ताडन के अधिकारी' केले आहे.

जनावरांचे कळप मनुष्यप्राण्याची प्राचीन काळची सर्वात मोठी संपत्ती; पोषणासाठी लागणाऱ्या दूधदुभत्याची रेलचेल करणारी. अनेक समाजात गाई, म्हशी किंवा इतर प्राणी चलन म्हणून वापरली जात. नवरदेवाला किंवा वधूला दक्षिणा म्हणून गाई दिल्याचे अनेक संदर्भ साहित्यात मिळतात. जनावरांचे कळप संख्येने वाढत जातात, ते स्वत:चाच गुणाकार करतात. ऐहिक साधनांचा गुणाकार हा पशूंचा गुणधर्म आहे.

अन्न गोळा करणे, शिकार करणे, शेती करणे, कारागिरी करणे, लढाया करणे अशा विविध कामांसाठी श्रमशक्तीची गरज लागते. श्रमशक्तीचा गुणाकार स्त्री करते. याच तिच्या गुणधर्माने ती 'पापयोनी' ठरली. जनावरांमधील नरमादी सरसकट धिक्काराचा विषय झाले, पण पुरुषांनी लिहिलेल्या शास्त्रात स्त्रीच तेवढी गुणाकारी म्हणून धिक्काराचा विषय झाली.

वैश्य आणि शूद्र हेही संपत्तीचा व्यापार किंवा उत्पादन करणारे. एका दाण्याचे

शंभर दाणे करणारा तो शेतकरी आणि जी वस्तू जेव्हा आणि जेथे उपलब्ध नसेल तेव्हा आणि तेथे उपलब्ध करून देणे ही वैश्यांची उत्पादक कामगिरी. पशू, वैश्य शूद्र आणि नारी हे सर्व संपत्तीचे गुणाकारी. खरे म्हटले तर, समाजाने त्यांचा आदर करावयास पाहिजे, त्यांना पूजास्थान मानले पाहिजे. हे चौघेही जन्मत:च 'स्वर्गाचे अधिकारी' असतात असे धर्मवचन असावयास पाहिजे होते. प्रत्यक्षात जनावरे तुच्छ झाली, स्त्रिया गुलाम झाल्या आणि वैश्य व शूद्र हीनजातीय ठरले. जे उत्पादन करीत नाहीत ते श्रेष्ठ; जे स्वत: उत्पादन करीत नाहीत पण, दंडेलीच्या, शस्त्रास्त्रांच्या बळावर दुसऱ्याकडून ते हिरावून घेतात आणि स्वत: मौजमजेत राजेशाही विलास भोगतात त्यांना परलोकी स्वर्गाचे आश्वासन आहे. पूर्वजन्मीच्या पुण्याईने 'शूचिनाम् श्रीमताम् गेहे' जन्म मिळतो असे भगवंतांचे आश्वासन आहे. फुकटे आणि लुटारू यांची पूजा आणि उत्पादकांचे मात्र ताडन हे वर्णाश्रम धर्माचे सूत्र आहे.

मार्क्सची समज काही वेगळी होती. पशू, नारी, वैश्य, शूद्र यांच्या कामातून संपत्तीचा गुणाकार होतो अशा तऱ्हेची मांडणी फ्रान्समधील क्निसे इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी केली होती. ती बाजूस ठेवून औद्योगिक कामगारांच्या शोषणातून वरकड मूल्याची आणि भांडवलाची निर्मिती होते अशी मार्क्सची समजूत झाली. रशियात क्रांती झाली आणि समाजवादी औद्योगिकीकरणाकरिता भांडवल उभे करण्यासाठी शेतकऱ्यांवर रणगाडे पाठवावे लागले त्याच वेळी मार्क्सचा हा सिद्धांत झाला. औद्योगिक कामगार हा विशिष्ट परिस्थितीमध्ये शोषित राहत नाही, उत्पादकही राहत नाही. उलट, आधुनिक अर्थव्यवस्थेतील त्याच्या स्थानामुळे तो शोषक बनतो हे सिद्ध झाले. तेव्हा, संपत्तीचा गुणाकार करणाऱ्यांच्या यादीत औद्योगिक कामगार बसत नाही. तो कदाचित्, वस्तूच्या मूल्यात वाढ करीत असेल पण, गुणाकार करीत नाही हे नक्की.

गीतेच्या कालानंतर संपत्तीचा गुणाकार करणारी कोणी 'पापयोनी' तयार झाली नाही काय? शेतकरी आणि व्यापारी यांच्यानंतर साधनांचा गुणाकार करणारी कोणती जमात निघालीच नाही काय? निघाली. या जमातीचे नाव शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ. 'यंत्र' याची व्याख्याच 'वापरलेल्या शक्तीचा गुणाकार' अशी आहे. शास्त्रज्ञ नवे नवे शोध लावतात, तंत्रज्ञ नवीन नवीन यंत्रसामग्री तयार करतात. पूर्वी जे अशक्य वाटत होते ते सहज शक्य होऊन जाते. विजेचे दिवे, आगगाड्या मोटारगाड्यांपासून ते आधुनिक गणकयंत्रांपर्यंत, कल्पनाही करता येणार नाही असा सुखसोयींच्या शक्यतांचा गुणाकार करणारे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ हे गुणाकारश्रेष्ठ.



पहिल्या चार 'पापयोनी' मनुष्याला माहीत असलेल्या साधनांचा गुणाकार मात्र करतात, शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ त्या गुणाकारांचे गुणाकार करून दाखवितात आणि ज्ञात नसलेली साधने पायाशी आणून ठेवतात.

स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत देश अधोगतीला लागला, सर्वच आघाड्यांवर पीछेहाट झाली हे खरे पण, त्याचबरोबर देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला, रोगराईचा बंदोबस्त झाल्याने आयुष्यमान वाढले यात काही शंका नाही. सार्वत्रिक अधोगतीच्या या पन्नास वर्षांत जीवन सुखकर झाले ते शास्त्राच्या आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे. अन्नधान्याची नवी वाणे आणि त्यांना पोसणारी व जोपासणारी खतेऔषधे इत्यादिंच्या मात्रा शास्त्रज्ञांनी तयार करून दिल्या नसत्या तर हिंदुस्थानची लोकसंख्या आज आहे त्याच्या निम्म्यानेही राहिली नसती. साठसत्तर कोटी लोक भुकेने तडफडून मेले असते ते वाचले याचे श्रेय शास्त्रज्ञांनी घडवून आणलेल्या उत्पादक घटकांच्या गुणाकाराकडे जाते.

पूर्वी माणसे अगदी तरुणपणी मरत. कॉलरा, प्लेग, देवी, क्षय इत्यादींच्या साथी वस्त्यावस्त्यांवर हल्ला करून लक्षावधींचा बळी घेत. रावसाहेब मंडलिकांसारखा सुखवस्तू बुद्धिमंतसुद्धा ऐन विशीत यमाच्या तावडीत सापडला. पहिले बाळंतपणसुद्धा स्त्रियांच्या कराल मृत्यूला सामोरे जाण्याचाच प्रसंग असे. बाळबाळंतीण दोन्ही सुखरूप राहणे हे मोठे भाग्याचेच लक्षण मानले जाई. ही सारीच परिस्थिती बदलली. साथीचे रोग पृथ्वीवरून हटले, बाळंतपणात फारसा धोका राहिला नाही, हीदेखील सारी शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची कर्तबगारी.

स्वातंत्र्यानंतर बायांच्या आयुष्यात काय मोठा बदल घडून आला? गावोगाव पिठाच्या चक्क्या झाल्यामुळे पहाटे उठून दळण दळण्याचे काम संपले; पाणी आणि सरपण जमा करणे काही भाग्यवंत स्त्रियांच्या बाबतीतरी अधिक सुखकर झाले; शिवणयंत्राने आणि त्या प्रकारच्या घरगुती साधनांनी बाईच्या आयुष्यात काहीतरी सुखकारकता आली.

थोडक्यात, सुधारणा म्हणून जी काही झाली ती शास्त्रज्ञांच्या कर्तबगारीने; सरकारी प्रयत्नाने नाही, नियोजनाने नाही, गरीबी हटाव योजनांनी नाही, कल्याणकारी व्यवस्थांनी नाही. या साऱ्या व्यवस्थांनी गुणाकार करणाऱ्या 'पापयोनीं'चा गुणाकार केव्हाच गिळंकृत करून टाकला आणि एवढेच नव्हे तर, शास्त्रज्ञांच्या करामतीचा फायदा समाजापर्यंत पोहोचू नये यासाठी आटोकाट प्रयत्न केला. माणसाच्या आयुष्यात साऱ्या रखरखीतपणात कुठे मंद वाऱ्याची झुळुक आली आणि हायसे

वाटले असेल तर ते विज्ञानामुळे. शासन इत्यादी संस्थांच्या भरकस प्रयत्नांना न जुमानता विज्ञान सामान्य माणसांपर्यंत पोहोचले म्हणून काय ते त्यांच्या आयुष्यात थोडे सुख दिसले. विज्ञानाचे फायदे लोकांपर्यंत पोहोचावेत यात स्वारस्य कोणालाच नाही, त्यातून नफा होणार असेल तरच शासन किंवा धंदेवाईक यांना त्यात स्वारस्य वाटणार ! शास्त्रज्ञांच्या एखाद्या करामतीने गुणाकारच गुणाकार होत राहिला तर समाजातील प्रस्थापितांना त्याचा काय फायदा? उलट, अपायच होण्याची शक्यता अधिक. याकरिता, शास्त्रज्ञतंत्रज्ञांना त्यांच्या प्रतिभेचा मोबदला मिळूच नये याकरिता डंकेलविरोधक थैमान घालतात. आणि शास्त्रज्ञांच्या शोधाचा लाभ आपल्या ओंजळीने आणि आपल्या ओंजळीतूनच फक्त लोकांपर्यंत पोहोचावा असा सर्व राजकीय, सामाजिक संस्थांचा आणि दुढ्ढाचार्यांचा खटाटोप असतो.

मनुष्यजातीच्या आनंदात, सुखोपभोगात भर घालणाऱ्या हितकर्त्यांनाच ठेचण्याची समाजाची ही काय उफराटी रीत आहे? फुकटे आणि लुटारू यांचा आदर करण्याची ही पद्धती आली कोठून? या प्रश्नांचे एक लोकविलक्षण उत्तर वेब्लेन या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने शंभर वर्षांपूर्वी देऊन ठेवले, विषय आजही कुतुहलाचा होऊ शकतो. वेब्लेन हा खासगी आयुष्यात मोठा चमत्कारिक माणूस होता. वैयक्तिक राहणी मोठी अस्वच्छ आणि गदळ, वेषभूषेची आणि प्रसाधनाची फिकीर न बाळगणारा आणि दिवसातील हरघडी काही जगावेगळेच बोलणारा किंवा कृती करणारा. त्याने शेवटपर्यंत टेलिफोन म्हणून घेतला नाही. त्याची सारी ग्रंथसंपत्ती पुस्तकांच्या दुकानांतून आलेल्या खोक्यांत, भिंतीशेजारी अस्ताव्यस्त रचून राही. खरकटी भांडी तो तशीच साठवून ठेवी आणि धुतलेली भांडी उरली नाहीत असे दिसले की पाण्याच्या नळीने फव्वारा उडवून ती धुवून टाकी. विद्यापीठातही त्याची वर्तणूक अशीच तऱ्हेवाईक. अशी सारी विक्षिप्त वर्तणूक असूनही स्त्रियांचा मात्र तो मोठा आकर्षणाचा विषय होता. ज्योतींवर तुटून पडणाऱ्या पतंगाचे वर्णन शेरोशायरीत अनेकदा येते; वेब्लेनच्या बाबतीत अनेक ज्योती या पतंगाच्या मागे पाठलाग करीत फिरत होत्या असे दिसते.

या साऱ्या तऱ्हेवाईक वागणुकीमुळे वेब्लेन सर्व सामाजिक संस्थांकडे धुत्काराने पाहू शकला. सर्व रूढी, चालीरीती, संस्था यांच्याविषयी यत्किंचितही आदर न बाळगता निर्घृणपणे त्या छिन्नविछिन्न करण्याची कला वेब्लेनने आत्मसात केली होती. मूर्ती फोडण्याची त्याची हातोडी मोठी घाटदार आणि सुबक होती. गद्य लिहिण्याची त्याची शैली आणि नव्या शब्दयोजना करण्याची त्याची कुशलता



साहित्यिकांना लाजविणारी होती. इंग्रजी भाषेत वेब्लेनचे अनेक शब्दसमुच्चय कायम स्थान मिळवून बसले आहेत. 'जगाला दिसावे यासाठी थाटमाट करण्याची प्रवृत्ती', 'उद्योगसम्राट' या अर्थी इंग्रजीतील शब्दप्रकार मूळ वेब्लेनचेच.

१८९९ मध्ये त्याने 'ऐषआरामी वर्गाचा सिद्धांत' हे पुस्तक प्रसिद्ध केले. तो काळ अमेरिकेतील मॉर्गन रॉकफेलरसारख्या भांडवलदारांचा होता. आर्थिक स्पर्धेत दयामाया यांना तर नाहीच पण, नीतिमत्तेलाही फारसे स्थान नव्हते. उघडउघड गुन्हेगारी कृत्ये करूनसुद्धा पैसा जमविण्यात यश आले तर त्याला यशस्वी म्हणून मान्यता मिळत असे. साऱ्या समाजात कष्टकऱ्यांची एक जमात असते; याउलट, दुसरीही एक जमात असते. कष्ट करण्यासाठी मुळात आपला जन्मच नाही, आपला जन्म रटाळ रोजमर्राच्या कामात बुडण्यासाठी नाही, जीवनाचा विविध अंगांनी उपभोग घेण्यासाठी आहे, उपभोगाची साधने जुटविण्यासाठी कष्टकऱ्यांकडून ती हिसकावून घेण्यात गैर काहीच नाही अशी त्यांची धारणा असते. आश्चर्य असे की या लुटारूंचेच साऱ्या समाजाला मोठे कौतुक असते आणि सारे इतिहास आणि शाहिरांची कवने या गुंडांच्या कृत्यांनाच शौर्य मानून गुणगान करीत असतात. या समाजाला 'भक्षक समाज' असे नाव वेब्लेनने दिले.

जवळजवळ १५ वर्षांनंतर वेब्लेनने 'भक्षक वर्ग विरुद्ध शास्त्रज्ञतंत्रज्ञांचा गुणाकारी समाज' या संबंधांवर तीन पुस्तके पाठोपाठ लिहिली. तंत्रज्ञानानेच समाजाचा विकास होतो पण, भक्षक वर्गाला विज्ञानाची फळे समाजापर्यंत पोहोचविण्यात काहीच रस नसतो. पण, त्यांना काही लाभ मिळत असेल तरच त्यांना विज्ञानात स्वारस्य ही त्याची मांडणी.

गीतेने अधिकारवाणीने गुणाकार करणाऱ्यांचा 'पापयोनी' म्हणून अधिक्षेप केला आणि कबीराने त्यांना मारपीट करण्याचाच सल्ला दिला. गीता आणि कबीर हे, वेब्लेनच्या शब्दांत भक्षक वर्गाचे तत्त्वज्ञान सांगत होते.

*(५ जानेवारी १९९८)*

■■

# उद्योगिनम् प्रतिभावन्तम्।

अर्थशास्त्रात संपूर्ण स्पर्धेच्या व्यवस्थेविषयी खूप लिहिले आणि बोलले जाते. उत्पादकांची संख्या प्रचंड असली आणि ते तयार करीत असलेला माल एकाच प्रकारचा असला की, संपूर्ण स्पर्धेची बाजारपेठ तयार होते. मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन होईल अशी किंमत बाजारपेठेत ठरते. त्यापेक्षा कोणी जास्त किंमत आकारू म्हटले तर ते जमणार नाही. कारण, त्याचा महागडा माल विकत घेण्यास कोणी गिऱ्हाईक येणारच नाही. बाजारपेठेपेक्षा थोडी कमी किंमत लावू आणि सगळे गिऱ्हाईक आपल्याकडेच ओढून घेऊ असा मनसुबा कोणी रचला तर त्याच्या कोठारातला सगळा माल तोट्यात उठवला जाईल आणि त्याचे दिवाळे वाजेल.

प्रत्यक्षात, विशुद्ध स्वरूपात संपूर्ण स्पर्धेची बाजारपेठ क्वचितच आढळते. आपल्याकडील शेतीमालाची बाजारपेठ पुष्कळशा प्रमाणात या कसोटीस उतरे, पण संपूर्णत: नाही. प्रत्यक्ष जगात उत्पादकांची संख्या मर्यादित ठेवली जाते. एखादी वस्तू उत्पादन करणारा एकमेव असला तर ती मक्तेदारी व्यवस्था म्हणायची. अगदी एकाच्याच हाती नाही तरी पाचदहा उत्पादकांच्या हाती मिळून बाजारपेठेवर पूर्ण ताबा असू शकतो. बेल कंपनीची टेलिफोनसेवेबाबत काही वर्षे मक्तेदारी होती. मग अनेक स्पर्धक निघाले. व्यक्तिगत गणकयंत्राच्या क्षेत्रात दहाबारा मोठमोठी नावे झळकतात. या उत्पादकांची सतत धडपड चालू असते. आपला माल स्पर्धकाच्या मालापेक्षा अधिक चांगला, निदान अधिक आकर्षक असला पाहिजे; गुणवत्ता आणि किंमत याबाबत काहीच वरचढपणा नसला तरी तसा भास तयार करण्यासाठी जाहिरातबाजी केली पाहिजे. तरच बाजारपेठेत उभे राहता येते किंवा टिकता येते.

जुन्या अर्थशास्त्र्यांनी संपूर्ण स्पर्धेच्या व्यवस्थेचा पुरस्कार केला. सरकारने हस्तक्षेप केला नाही तर सर्वच क्षेत्रांत स्पर्धेची व्यवस्था तयार होईल, त्यातून पायरीपायरीने उत्पादनाची वाढ होत जाईल आणि अर्थव्यवस्थेचाही विकास होईल अशी त्यांची साधीसोपी मांडणी होती. प्रत्यक्षात मात्र असे घडत नसे. दुकानात



माल आहे, पण तो खपत नाही; हातांना काम मिळावे म्हणून लोक धडपडतात, पण त्यांना रोजगार मिळत नाही; प्रचंड यंत्रांची धुडे स्वस्थ बसली आहेत आणि लोकांना पोटाला अन्न नाही व अंग झाकण्याला वस्त्रही नाही असे विचित्र अनुभव वारंवार येऊ लागले. अर्थव्यवस्थेत कालक्रमाने येणाऱ्या या मंदीतेजीच्या चक्राची कारणे काय? त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न, तेजीमंदीच्या या लाटांना आटोक्यात ठेवण्याचा काही मार्ग आहे काय? अर्थव्यवस्थेतील या साऱ्या दोषांचा ठपका मक्तेदारी व स्पर्धेचा अभाव यावर ठेवला जाई. मोठ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा बाजारपेठेवर ताबा राहतो. या परिस्थितीचा ते फायदा घेऊ पाहतात; त्यामुळे अर्थव्यवस्थेला खीळ बसते आणि मंदीच्या लाटा येतात असे अर्थशास्त्र्यांना वाटते आणि सामान्यजनांचीही अशीच भावना असते. उत्पादन करण्याचे सामर्थ्य आहे पण केलेल्या उत्पादनाला बाजारात मागणी नाही याची मीमांसा अनेक विद्वानांनी आपापल्या परींनी केली आहे.

सर्व मूल्य श्रमशक्तीतून तयार होते, परंतु कामगारांचे शोषण होते; हाती पडणारी मजुरीची रक्कम त्यांनी केलेल्या उत्पादनाच्या म्हणजेच बाजारात येणाऱ्या मालाच्या किमतीपेक्षा कमी राहते आणि त्यातून मंदीच्या लाटा येतात हे मार्क्सचे निदान. त्यावर त्याने सुचविलेला तोडगा म्हणजे रोगापेक्षा औषध जहाल. इतके महत्त्वाचे निर्णय खासगी व्यक्ती आणि संस्था यांच्या हाती असू नयेत, ते फक्त आपल्या फायद्याचाच विचार करतात. त्यामुळे मंदीचा तडाखा बसतो. सर्व मालमत्ता आणि साधनसंपत्ती यांचे राष्ट्रीयीकरण करावे आणि उत्पादन कधी, किती, कोठे, कसे आणि कशाचे व्हावे याचे निर्णय सारे, अर्थव्यवस्थेच्या हिताच्या दृष्टीने, शासकीय नियोजन मंडळाने घ्यावे. थोडक्यात, 'समाजवाद' हे मार्क्सने सुचविलेले मंदीच्या रोगावरील औषध. मार्क्सने केलेली अर्थशास्त्रीय मीमांसा आणि विश्लेषण इतके तोटके आणि अशास्त्रीय होते की त्याला जाणकारांची मान्यता, निम्मे जग समाजवादी अमलाखाली असतानाही, कधी मिळालीच नाही. प्रत्यक्ष व्यवहारात मार्क्सप्रणीत समाजवादी व्यवस्था मंदीपेक्षाही भयानक आर्थिक अरिष्ट तयार करते असा अनुभव आला आणि मार्क्सने सुचविलेला पर्याय इतिहासानेच निकालात काढला.

दुसरे महत्त्वाचे विश्लेषण केन्स याचे. माणसाची मिळकत जसजशी वाढत जाते तसतसे उपभोगाचे प्रमाण कमी होत जाते आणि बाकी शिल्लक बचत वाढत जाते. मागणी व पुरवठा यांच्या चक्रात त्यामुळे अडथळा निर्माण होतो. कमी पडणारी गुंतवणूक शासनसंस्थेने स्वत:च केली तर मंदी हटविता येते. याखेरीज, पतपुरवठा वाढविणे, व्याजाचा दर कमी करणे अशा धोरणांनीही खासगी गुंतवणुकीस प्रोत्साहन

दिले तर गुंतवणुकीचे खुंटलेले गाडे मोकळे होऊन पुन्हा चालू लागते. अशी केन्सची मांडणी. केन्सप्रणीत धोरणांमुळे अमेरिकेला १९२९ च्या मंदीच्या लाटेतून बाहेर पडण्यास मदत झाली. सरकारी गुंतवणुकीमुळे काही प्रश्नही निर्माण होतात. अशा कार्यक्रमांमुळे लोकांच्या हाती मजुरी गेली, पण त्याबरोबर बाजरपेठेत उतरणारे उत्पादनही वाढले तर त्या गुंतवणुकीचा बाजारपेठेतील मागणी वाढविण्याकरिता फारसा फायदा होणार नाही. लोकांच्या हाती पैसा तर जाईल, पण बाजारपेठेतील मालांचा पुरवठा शक्य तितका कमी वाढेल असे कार्यक्रम मंदीतून बाहेर पडण्यासाठी सगळ्यात उपयुक्त. म्हणजे, रोजगार हमी योजनेप्रमाणे मजुरांच्या एका गटास खड्डे खोदावयास लावणे आणि दुसऱ्या गटास तेच खड्डे भरायच्या कामाबद्दल मजुरी देणे हा आदर्श कार्यक्रम होईल! शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा यांचे उत्पादन यापेक्षादेखील जास्त उपयोगी, कारण उत्पादन मुळात नष्ट करण्याकरिताच केलेले असते.

दुसऱ्या महायुद्धानंतर साऱ्या विकसित देशांत शासनाकडे एक महत्त्वाची जबाबदारी आली. राष्ट्रीय उत्पादन वाढविणे, पूर्ण रोजगार ठेवणे आणि आयात-निर्यातीतील संतुलन राखणे ही तीन उद्दिष्टे साधण्याकरिता केन्सने पुरविलेल्या साधनांचा सर्वच सरकारे वापर करीत आली. पण, अनुभव मोठे विपरीत येऊ लागले. अर्थव्यवस्थेची चाके फिरू लागावीत म्हणून पैसा सोडावा, पण त्यातून उत्पादनवाढीपेक्षा महागाईच जास्त वाढावी आणि चलनवृद्धी रोखू पाहावे तर उत्पादनालाच खीळ बसावी आणि बेरोजगारी वाढावी अशी 'किं कर्म किं कर्मेति।' अवस्था देशोदेशींच्या वित्तमंत्र्यांच्या कपाळी आली.

दुसऱ्या महायुद्धानंतर पाश्चिमात्य राष्ट्रांची आगेकूच चालूच राहिली. जपान, जर्मनी दुसऱ्या महायुद्धात केवळ पराभूत नव्हे, पूर्णत: उद्ध्वस्त झालेले देश पुन्हा वैभवाच्या शिखरावर पोचले. तिसऱ्या जगातील, हिंदुस्थानसारख्या काही मागास देशांनी समाजवादी नियोजनाचा प्रयोग आर्थिक विकासासाठी करून पाहिला, त्यात ते अपयशी ठरले. या उलट, आशिया खंडात एक नवा चमत्कार दिसून आला. दक्षिण आशियातील सिंगापूर, मलेशिया, दक्षिण कोरिया, तैवान आणि हाँगकाँग या देशांनी समाजवादी लायसेन्स-परमिट व्यवस्था सोडून दिली व त्यांच्याकडील स्वस्त आणि कार्यक्षम श्रमशक्तीचा फायदा घेऊन पाश्चिमात्य देशांतील बाजारपेठसुद्धा भरून टाकायला सुरुवात केली.

अलीकडे, हे आशियातील 'आर्थिक वाघ' मंदीच्या तडाख्यात सापडून मोठे जर्जर झाले आहेत. या वाघांच्या 'मनी मांजऱ्या' कश्या झाल्या? या एका प्रश्नाने आजच्या अर्थशास्त्र्यांना गोंधळात टाकले आहे, एवढेच नव्हे तर चांगलेच हादरविले



आहे. दक्षिण कोरियास मदत म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने १० अब्ज डॉलर्सचे कर्ज देऊ केले आहे. मलेशियाचे राष्ट्रपती त्यांच्या चलनाच्या घसरणीचा सारा दोष विदेशी वित्तीय बाजारपेठेतील ठगांवर ठेवतात. पैशाची या देशातून त्या देशात हलवाहलव करून काही भामटे भरमसाट फायदा काही तासांत कमवू पाहतात, त्यामुळे छोट्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचे बळी जात आहेत अशी त्यांची तक्रार आहे.

हिंदुस्थानातील अर्थशास्त्री आधीच अर्थव्यवस्थेच्या खुलीकरणाबद्दल नाराज असलेले. दक्षिण आशियातील देशांच्या तुलनेने आपण मागास असल्याचा त्यांना खेद वाटत असे. त्या देशांत आर्थिक आपत्ती आल्याने त्यांचे बरे फावले आहे. 'आशियातील वाघ' दबले, पण आम्ही अजून भुईसपाट झालेलो नाही याचे कारण आम्ही खुली व्यवस्था सावधपणे स्वीकारीत आहोत अशी ते बढाई मारीत आहेत. मंदीतेजीच्या प्रश्नाने १९२९ साली जशी खळबळ माजविली तशीच पुन्हा एकदा ६८ वर्षांनी त्याच प्रश्नाने खळबळ माजविली आहे.

खरे पाहता या प्रश्नाचे उत्तर १९५१ सालीच शूम्पीटर या ऑस्ट्रियन अर्थशास्त्रज्ञाने 'आर्थिक विकासाचा सिद्धांत' या पुस्तकात देऊन ठेवले आहे. शूम्पीटर हा भांडवलशाही व्यवस्थेचा कठोर टीकाकार, पण त्याबरोबर बाजारपेठेच्या व्यवस्थेचा कट्टर समर्थक. खुल्या बाजारपेठेवर आधारलेल्या अर्थव्यवस्था भरभराटीस का येतात? याचे शूम्पीटरने दिलेले उत्तर मोठे धक्कादायक होते. संपूर्ण स्पर्धेवर आधारलेल्या व्यवस्था प्रगती करतात, पण रखडत, धीम्या गतीने. सर्वात जास्त प्रगती कोण करते? विस्तृत आकडेवारीच्या आधाराने शूम्पीटरने दाखवून दिले की, कंपन्या आणि देश संशोधनाकरिता आणि नवा माल तयार करण्याकरिता, नवी क्षितिजे धुंडाळण्याकरिता ज्या प्रमाणात खर्च करतात त्या प्रमाणात त्यांची विकासाची गती वाढते. प्रतिभाशाली संशोधक, तंत्रज्ञ यांना आर्थिक तेजीमंदीचे फारसे भय नसते. टेलिफोन, टेलिव्हिजन, कॉम्प्युटर अशा क्षेत्रांत ज्यांनी काही नवनवीन उन्मेष दाखविले ते चढत गेले. मोठ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्या स्पर्धेपोटी संशोधनाच्या कामी खूप पैसा ओततात; नवनवे शोध लावतात; नवनवा माल बाजारात आणतात. त्यामुळे भरभराट येते. भरभराट प्रतिभाशाली स्पर्धेतून येते आणि त्याचे सर्वात मोठे श्रेय, सर्वांच्या रोषाचा विषय असलेल्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत.

मग मंदीच्या लाटेत नाकातोंडात पाणी जाऊन गुदमरू लागतात ते कोण? शूम्पीटरचे उत्तर आहे - संशोधकांनी आणि तंत्रज्ञांनी केलेल्या शोधाचा उपयोग

करून त्यांचे उत्पादन करणारे दुय्यम दर्जाचे उद्योजक अनेक असतात. त्या उद्योजकांतही काही डावेउजवे करायला पाहिजे. मालाचे उत्पादन करताना व्यवस्थापनाच्या कौशल्याने, काटकसरीने जे उत्पादन करू शकतात ते काही काळतरी स्पर्धेला तोंड देत टिकून राहतात. तेजीमंदीचा तडाखा बसतो तो प्रतिभेचा उन्मेष न दाखविणाऱ्या अर्थव्यवस्थेतील या अंगास. संशोधन करणारे शिल्पकाराप्रमाणे असतात. त्यांना बाजारपेठेची धास्ती नसते. पण, गणपतीच्या शाडूच्या मूर्ती साच्यात घालून काढणाऱ्यांची संख्या वाढते, त्यांच्यात स्पर्धा वाढते, फायद्याचे प्रमाण घटते आणि आर्थिक अरिष्ट ओढवते. 'आशियाई वाघ' गेली दोनतीन दशके पुढे सरसावले कारण त्यांच्यात निदान कार्यक्षमता होती. भारतीय उद्योजकांत तिचाही अभाव. कार्यक्षमता असणाऱ्या उद्योजकांतील स्पर्धा वाढू लागली की काय होते? पुण्याच्या परिसरातील मोठ्या उद्योगधंद्यांच्या आधाराने त्यांना लागणाऱ्या सुट्या भागांचे उत्पादन करणाऱ्या छोट्या कारखानदारांची जी अवस्था होते तीच प्रतिभारहित उत्पादकांच्या वाट्याला येते. मंदीच्या लाटा ही फार भयंकर गोष्ट आहे हेच मुळी शूम्पीटर यांना मान्य नव्हते. थंडगार पाण्याचा शिडकावा व्हावा तशी मंदी येते आणि स्वच्छता करून जाते. भांडवलशाहीचा विकास झाला तो प्रतिभाशाली संशोधनांमुळे; भांडवलशाहीचा अंत होणार आहे तो प्रतिभावंतांना नाउमेद करण्याच्या समाजाच्या प्रवृत्तीने. हळूहळू धाडसी संशोधक संपून जातील आणि त्याबरोबरच भांडवलशाही व्यवस्था संपेल अशी शूम्पीटर यांची मांडणी. इंग्रज येण्यापूर्वी हिंदुस्थानात ज्ञानाची मक्तेदारी वर्णव्यवस्थेनुसार ज्यांच्याकडे होती तेच जगाच्या तुलनेने मागास झाले होते. सवर्णांनी पश्चिमी साहित्य, कला, संशोधन, उत्पादन- सगळ्यांची नक्कल करण्याचा धंदाच उभारला होता. खरेखुरे संशोधन आमच्याकडे जवळजवळ शून्य. संशोधकांना हीन मानण्यात आम्ही भूषण समजतो; पेटंट हक्कांना विरोध करतो; नक्कल करण्याचा आम्हाला हक्क पाहिजे असा आग्रह धरतो आणि प्रतिभेच्या आत्मविश्वासाने खुलेपणाकडे जाण्याऐवजी कोंदट बंदिस्त व्यवस्थेत पुन्हा जाऊ पाहतो.

शूम्पीटरच्या दरबारात अशा 'कापुरुषां'ना अधम स्थानच राहणार. 'उद्योगिनम् पुरुषसिंहम् उपेति लक्ष्मी।' असे संस्कृत वचन आहे. पुरुषसिंहम् म्हणण्याऐवजी 'उद्योगिनम् प्रतिभावन्तम्' असे म्हटले म्हणजे शूम्पीटरच्या तेजीमंदीसंबंधीच्या सिद्धांताचे सार आले.

*(१३ जानेवारी १९९८)*

■■



# प्रियाब्रोझेन्स्कीचे भूत

'शेतीमालाला उत्पादनखर्चाइतकाही भाव मिळत नाही', 'शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे धोरण', 'व्यापारी देवघेवीच्या अटी सतत शेतकऱ्याविरुद्ध जातात', 'एकेकाळी एक क्विंटल कापूस विकला तर एक तोळा सोने येई, अलीकडे कापसाचा भाव एकदम वाढला आणि सोन्याचा भाव उतरला तरी दोन क्विंटल कापूस विकावा तेव्हा एक तोळा सोने येते' ही आणि अशा तऱ्हेची वाक्ये शेतकरीप्रश्नांच्या संदर्भात सतत कानावर येत असतात. शेतात घाम गाळणाऱ्या किंवा बांधावरून का होईना, शेतीचा कारभार पाहणाऱ्या लोकांचा दैनंदिन अनुभव अशा विधानांतून व्यक्त होतो. पण हे असे का होते यासंबंधी काही अर्थशास्त्रीय विवेचन आहे का? याबद्दल काही सिद्धांत आहेत का? याची शेतकऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना सोडा, बहुतेक नेत्यांनाही माहिती नसते. या अज्ञानाचे एक महत्त्वाचे कारण असे की, या प्रश्नावर स्वच्छ आणि स्पष्टपणे मीमांसा करण्याचे अर्थशास्त्र्यांनी आणि राजकीय पुढाऱ्यांनीही कटाक्षाने टाळले आहे. आपल्या समाजात ज्ञानाची एक ब्राह्मणी परंपरा आहे. चिरफाड करून दारूण सत्य खुलेपणाने कागदोपत्री पांढऱ्यावर काळे करून मांडावे हे आमच्या ज्ञानपरंपरेत बसत नाही. अज्ञानी लोकांचा विनाकारण बुद्धिभेद करू नये आणि महाजन ज्या मार्गाने जातात तोच अनुसरावा ही प्रकृती. एकाकी एकला आपला आपण मुद्दा मांडत चालला तर 'तो सृष्टीशी भांडत चालला' असा त्याचा उपहास होतो. सत्य महाविदारक असते. ते सर्वांनाच पचनी पडेल असे नाही. तेव्हा श्रेष्ठांनी विदारक सत्याचे हलाहल पचवून घ्यावे आणि कनिष्ठांना त्यांच्या सोयीसोयीने पचेल अश्या मात्रेत सत्याची गुटी द्यावी अशा दुहेरी सत्याची आमच्याकडे मान्यता आहे - एक श्रेष्ठांकरिता, एक सामान्यांकरिता.

दुहेरी सत्य आम्ही अध्यात्मातही मांडतो. त्याबद्दल कनिष्ठांतील कोणाला शंका आली आणि तो प्रश्न विचारू लागला व त्यापलीकडे जाऊन बंड करू लागला तर त्याचे काय करायचे? एकलव्याच्या अंगठ्याची गुरुदक्षिणा मागून त्याची धनुर्विद्या निष्प्रभ करायची, शंबुकाचा तपोभंग होत नसेल तर त्याचे मुंडके

धडापासून वेगळे करायचे आणि बंडखोरी करणारा कोणी सवर्ण असला तर चार्वाकाप्रमाणे त्याला दगडांनी ठेचून मारायचे. दुहेरी सत्य लादायची अशी ही भयानक पद्धती अध्यात्मातही वापरली जायची. मग, जेथे प्रत्यक्षात दररोजच्या भाकरीचा, तूपरोटीचा संबंध आहे; संपत्तीचे उत्पादन आणि त्याचे वाटप याचा निर्णय व्हायचा आहे तेथे तर परखडपणे स्पष्ट सैद्धांतिक मांडणी कशी होईल? विषमता ही परमेश्वरानेच निर्माण केलेली आहे हे जातिव्यवस्थेने लोकांच्या गळी पक्के उतरविले आहे. त्यामुळे, बरोबरीच्या न्यायाने आपणासही कष्टाचे फळ मिळाले पाहिजे असा विचारही शोषितांच्या मनात निर्माण होत नाही. 'आपल्याला देवानेच असे निर्माण केले, सवर्णांसारखे आपणास कसे मिळेल?', 'शहरातल्या शुभ्र स्वच्छ कपडे घालणाऱ्या राजबिंड्या लोकांची आणि आपली काय तुलना आहे?', 'हे असेच चालायचे!' अशी मुळात शोषितांची धारणा. तेव्हा त्यांच्या शोषणाची कारणमीमांसा करणारे सैद्धांतिक विवेचन करण्याचा खटाटोप करावा कशाला?

शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर स्पष्ट विवेचन, चर्चा आणि हमरीतुमरीचे वादंग झडलेच नाहीत. त्यामुळे शेतीच्या दुरवस्थेचे रहस्य धर्मतत्त्वांप्रमाणे अंधाऱ्या गुहेत लपलेले राहिले. शेतकऱ्याचे शोषण होत आहे हेच मुळी कोणी अर्थशास्त्री आणि पुढारी मानायला तयार नाहीत. उलट, शेतकऱ्यांची मोठी मजा चालली आहे, ते स्वच्छ हवेत राहतात, झुळुझुळु वाहणाऱ्या ओढ्याचे थंडगार पाणी पितात, मळ्यातील ताजा माल घरी भरपूर येतो, शेतीकरिता सरकारी अनुदाने मिळतात आणि प्राप्तिकरही भरावा लागत नाही असे मोठे काव्यपूर्ण जीवन शेतकरी जगतो अशी हाकाटी अर्थशास्त्री, लेखक, कवी सर्वांनीच चालविली. शेतकऱ्यांचे प्रखर आंदोलन उभे राहीपर्यंत शेतीचे काही शोषण होत आहे हे मुळात कोणी मानायलाच तयार नव्हते.

ज्या देशात शेती आणि उद्योगधंदे करणारे लोक एकाच समाजातील असतात, ज्यांच्यात जाती किंवा वंशभेद नसतात तेथे शेतीमालाच्या शोषणाचे स्पष्ट, परखड आणि प्रसंगी, मोठे क्रूर विवेचन आढळून येते.

भांडवलशाही व्यवस्थेचे मार्क्सने विवेचन केले. 'साऱ्या उत्पादनाची किंमत म्हणजे त्या वस्तूच्या उत्पादनास लागलेल्या सामाजिक उपयोगाच्या श्रमशक्तीचे मूल्य' असा त्याने सिद्धांत मांडला. एक वस्तू तयार करायला एका माणसाला दोन तास लागत असतील तर त्या वस्तूची किंमत दोन तासांच्या रोजगाराइतकी होईल. प्रत्यक्षात, मजुराला लुटले जाते, त्याच्या उत्पादनाची पुरी किंमत मजुरी म्हणून



त्याच्या हाती पडत नाही. समजा, दोन तासांच्या श्रमशक्तीऐवजी त्याला एक तास श्रमशक्तीचाच मोबदला मिळतो. मग, बाजारपेठेत पुरवठा होणाऱ्या वस्तूची किंमत दोन तास श्रमशक्ती आणि ग्राहकाच्या हाती मात्र एक तास श्रमशक्ती असे अपरिहार्यपणे होणार. बाजारात मागणी नसली म्हणजे मंदी येणार आणि भांडवलशाही व्यवस्था मंदी, बेकारी यांमुळे अपरिहार्यपणे तुटून पडणार अशी मार्क्सची मांडणी होती.

या मांडणीतील दोष अनेक अर्थशास्त्रज्ञांनी स्पष्ट करून दाखविले होते. मार्क्सचे हे विश्लेषण त्याच्या शिष्यांचा मोठा अभिमानाचा विषय असल्यामुळे अतिरिक्त मूल्य आणि शोषण यांविषयी कोणी चकार शब्द काढला तरी त्याचे चाटूशिष्य हमरीतुमरीने तुटून पडतात. या विषयावर एका स्त्रीने लिहिण्याची हिम्मत केली. कम्युनिस्ट चळवळीमध्ये स्वत:ला झोकून दिलेली, त्याचबरोबर स्त्रीमुक्तीच्या प्रश्नाविषयी सखोल विचार मांडणारी, पोलंडमध्ये जन्मलेली ही स्त्री. तिचे नाव रोझा लुक्झेंबुर्ग.

रोझाचा हेतू मार्क्सवर टीका करण्याचा नव्हता. मार्क्सचे विवेचन काहीसे अपुरे पडते, त्याची भरपाई करण्याकरिता तिने अगदी गणिती पद्धतीने एक प्रमेय मांडले. भांडवलशाही बाजारपेठेत उठाव नसला तरी लगेच मंदी येणार नाही; असा वरकड माल भांडवलदार दुसऱ्या देशांत पाठवतील व तेथील बाजारपेठेत पुन्हा फायद्याच्या अटी लादतील; इतर अर्थव्यवस्थांशी 'असमान विनिमया'ची पद्धत भांडवलदारी व्यवस्था काही काळ तगवून नेईल; अशा तऱ्हेने सर्व देशांत बाजारपेठा गच्च झाल्या तरच भांडवलदारी व्यवस्थेवर प्राणघातक संकट येईल असे तिने स्पष्ट करून दाखविले. सारे मार्क्सवादी तिच्यावर तुटून पडले. मार्क्सला शहाणपणा शिकवते काय, ही एक प्रतिक्रिया आणि दुसरी, भांडवलशाहीचा अंत आणि समाजवादाची पहाट अजून शेकडो वर्षे दूर आहे, असे हिला म्हणायचे आहे काय? त्यातून रोझा लुक्झेंबुर्ग पडली स्त्री. तिला जवळजवळ वाळीत टाकण्यात आले. पोलंडमधील एका हिवाळ्याच्या रात्री पोलिसांच्या लाठीहल्ल्यात तिचा मृत्यू झाला.

रशियात क्रांती झाली, समाजवादी बांधणीची तयारी सुरू झाली आणि एक, मार्क्सवादी चोपड्यांत उल्लेख नसलेली, समस्या उभी राहिली. प्रगत भांडवलशाही देशांत क्रांती व्हायची होती. तसा स्पष्ट मार्क्सचाच निर्वाळा होता. जर्मनी, इंग्लंडसारख्या देशांत समाजवादी क्रांती घडली असती तर कारखानदारीकरिता

लागणाऱ्या भांडवलनिर्मितीचा प्रश्न उभाच राहिला नसता. कामगारांना पूर्ण श्रमशक्ती इतके वेतन मिळाले असते. त्यातून त्यांनी उपभोग आणि गुंतवणूक यांवर खर्च केला असता आणि सारे अर्थचक्र वाढत्या गतीने चालत राहिले असते ते थेट समाजवादाचा वर्गविरहित, शासनविरहित स्वर्ग अवतरेपर्यंत !

पण, क्रांती झाली ती रशियासारख्या मागास देशात. कारखानदारी शहरांपुरती मर्यादित. देश सारा शेतीप्रधान. मोठमोठे जमीनदार, काही मध्यमवर्गीय छोटे शेतकरी व कुळे यांच्या हाती सगळी शेती. समाजवादी रशियाचे दोन स्पष्ट विभाग पडले. शासनाच्या अधिपत्याखालील शहरी कारखानदारी क्षेत्र आणि ग्रामीण भागातील खासगी शेतीचे क्षेत्र. १९१८ सालीच शहरांत दुष्काळ पडला. धान्याच्या किमती भडकल्या. २० लाख मण धान्य सरकारने लेव्ही भावाने वसूल केले. शेतकऱ्यांची जवळजवळ तितकेच धान्य खासगीत दसपट किमतीत विकले. सारी अर्थव्यवस्था, एका बाजूला कारखानदारी मालाच्या किंमतीचे पाते आणि दुसऱ्या बाजूला शेतीमालाचे अशा कात्रीत सापडली. कारखानदारी म्हणजे समाजवादी क्षेत्र आणि शेती म्हणजे खासगी क्षेत्र. त्यामुळे साऱ्याच कम्युनिस्टांत शेतकऱ्यांविरुद्ध संतापाची भावना तयार झाली. ट्रॉटस्कीने सारी शेतीच सरकारी करून टाकायची भूमिका घेतली. लेनिनने, शेतीमधील उत्पादकता वाढविली पाहिजे आणि त्याबरोबरच शेतकऱ्यांतील नफेखोरीची प्रवृत्ती बदलून त्यांच्यात समाजवादी मानसिकता तयार करणे आवश्यक आहे असे मांडले. त्याबरोबरच, 'कष्टकरी शेतकरी' आणि 'नफेखोर शेतकरी' यांच्यात फरक करून कष्टकरी शेतकरी आणि औद्योगिक कामगार यांची संयुक्त आघाडी बनविण्याची गरज मांडली. शेतीमालाला रास्त भाव दिल्यानेच अशी आघाडी तयार होईल असेही त्याने म्हटले.

आता प्रश्न निघाला, रास्त भाव याची व्याख्या काय? यासंबंधी एक जबरदस्त मांडणी इव्हजेनी प्रियाब्रोझेन्स्की याने केली. प्रियाब्रोझेन्स्कीचा जन्म साध्या मध्यमवर्गीय कुटुंबातला. झारशाहीच्या जुलुमाचा प्रत्यक्ष अनुभव त्याच्या कुटुंबातील अनेकांनी घेतलेला. समाजवादी क्रांती झाल्यानंतर त्यांनी मोठ्या उत्साहाने समाजवादाच्या बांधणीच्या कामास पाठिंबा दिला. १९२४ ते १९२९ या काळात कारखानदारी आणि शेती यांतील संबंधांबद्दल मोठा गदारोळ, वादंग माजले. त्यात प्रियाब्रोझेन्स्कीचा सिंहाचा वाटा होता. २९ सालानंतर त्याचे नाव ऐकू येईनासे झाले आणि ३६ साली स्टॅलिनने त्याची हत्या करविली. तेव्हापासून आजपर्यंत प्रियाब्रोझेन्स्कीच्या नावाचा कोणी उल्लेखही करीत नाही.



शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर प्रियाब्रोझेन्स्कीने एक मोठा सैद्धांतिक आराखडा उभा केला; त्याचा पाया होता रोझा लुक्झेंबुर्गच्या विवेचनातील 'असमान विनिमयाची कल्पना.' गरीब देशातील समाजवादी कारखानदारीला भांडवलाच्या पुरवठ्यासाठी शेतीकडून बचत घेण्याखेरीज गत्यंतर नाही, परदेशातून मदत येण्याची शक्यता नाही आणि समाजवादी कारखानदारीतील उत्पादन अगदीच तोटके; तेव्हा शेतीमालाला कमीत कमी भाव द्यावा आणि शेतीला लागणारा औद्योगिक माल त्यांना महागात विकावा तरच समाजवादी कारखानदारीची उभारणी होऊ शकते.

रोझा लुक्झेंबुर्गच्या भांडवलदाराप्रमाणे, समाजवादी कारखानदारीने शेती हा दुसरा मागास देश समजून त्याच्यावर जाणीवपूर्वक असमान विनिमय लादला पाहिजे. सरकारच्या हाती कारखानदारी मालाचे भाव ठरविण्याची सत्ता आहेच. त्याबरोबर, शेतीमालाचे भाव ठरविण्याचीही सत्ता समाजवादी शासनाने हाती घेतली पाहिजे, तरच शेतीतील नफेखोरी आणि बंडाळी आटोक्यात येईल. शेती आणि कारखानदारी यांच्यातील विनिमयाच्या अटी सतत शेतीमालाच्या विरुद्ध जातील असे पाहणे व या मार्गाने मोठ्या शेतकऱ्यांवर सतत चढती करआकारणी करणे हे समाजवादी व्यवस्थेच्या हिताचे आहे.

थोडक्यात, 'असमान विनिमय' या घोर कृत्याने भांडवलदार आपल्या बाजारपेठा चालू ठेवतात अशी कठोर टीका रोझा लुक्झेंबुर्गने केली. प्रियाब्रोझेन्स्कीने हेच घोर कृत्य समाजवादी शासनाने शेतकऱ्यांविरुद्ध 'क्रांतीचा जय' म्हणत केले पाहिजे असा आग्रह धरला.

कारखानदारी मालाच्या किमती वाढविल्या आणि शेतीमालाच्या किमती उतरविल्या तर त्याचे दुष्परिणाम शहरातील कामगारवर्गावर होतील तसेच ग्रामीण भागातील सर्वसाधारण शेतकऱ्यांवरही होतील. पण, त्याचा सर्वात मोठा बोजा मोठ्या शेतकऱ्यांवर पडणार आहे; सामान्य शेतकऱ्यांना नुकसानीची काही भरपाई करून देता येईल; त्यासाठी त्यांना सवलतीच्या दराने कर्जे उपलब्ध करून द्यावीत आणि अनुदाने द्यावीत. कारखान्यांतील कामगारांना तोशिस लागू नये म्हणून त्यांचेही मजुरीचे दर वाढवून देता येतील.

प्रियाब्रोझेन्स्कीच्या New Economics (नवे अर्थशास्त्र) या पुस्तकातील हे प्रतिपादन वाचले म्हणजे क्रांतीच्या पहिल्या उत्साहात समाजवादी आणि मानवतेच्या ललकाऱ्या देणारे लोक सत्तेच्या धुंदीत किती पराकोटीचे नरपशू बनले होते हे स्पष्ट होते. असल्या राक्षसांनी मनुष्यजातीची शंभर वर्षे वाया घालविली याचेही मोठे

आश्चर्य वाटते.

प्रियाब्रोझेन्स्कीची मांडणी खुद्द स्टॅलिननेच खोडून काढली. सरकारी कारखानदारी आणि खासगी शेती हे दोन वेगवेगळे भाग आहेत या कल्पनेवरच त्याने कडाडून हल्ला चढविला. अशा विभाजनावर समाजवादी व्यवस्था उभी राहूच शकत नाही असे त्याने स्पष्ट सांगितले. या साऱ्या वादंगातील प्रियाब्रोझेन्स्कीचा प्रतिवादी होता बुखारीन; साऱ्या कम्युनिस्ट अर्थशास्त्रातील भले मोठे प्रस्थ. स्टॅलिन त्याची बाजू घेत आहे असे वाटते तोच बुखारीनलाही अटक करण्यात आली. १९२८ मध्ये पुन्हा एकदा धान्याचा तुटवडा जाणवू लागला तेव्हा स्टॅलिनने प्रियाब्रोझेन्स्कीचेच तत्त्व महाक्रूरतेने अमलात आणले. रणगाडे पाठवून जमीनदारांचा बीमोड केला. प्रियाब्रोझेन्स्कीचे अर्थशास्त्र जिंकले, पण तो तुरुंगातच सडत राहिला आणि १९३६ साली स्टॅलिनने त्याला तुरुंगातच ठार केले.

प्रियाब्रोझेन्स्कीचे भूत भारतीय नियोजकांच्या डोक्यावरही स्वार झाले. शहरी कारखानदारी आणि ग्रामीण शेती हे दोन स्वतंत्र विभाग आहेत आणि शेतीचे शोषण योजनापूर्वक केल्याखेरीज कारखानदारीला लागणारा भांडवलपुरवठा होऊच शकत नाही हा प्रियाब्रोझेन्स्कीचा सिद्धांत भारतातही अमलात आणण्यात आला. प्रियाब्रोझेन्स्कीने प्रामाणिकपणे आपला शेतकरी द्वेष मांडला; हिंदुस्थानातील अर्थशास्त्री आणि पुढारी ब्राह्मणी काव्याने त्याविषयी बोलले नाहीत.

*(२७ जानेवारी १९९८)*

■■



# मध्यान्हीचा सूर्य

अर्थशास्त्राचा उदय झाल्यापासून शेकडो अर्थशास्त्री झाले. अनेकांनी इतिहास घडविला. काहींनी आर्थिक भरभराटीची रहस्ये उलगडून दाखविली. थोडे नोबल पारितोषिकासारख्या सन्मानाचे मानकरी ठरले. क्वचित् कोणी राजकीय सत्ताही गाजवून गेले. पण, एका कादंबरीचा नायक होण्याचा सन्मान फक्त एकाच अर्थशास्त्रज्ञाला मिळाला आहे. तीदेखील अशीतशी कादंबरी नाही. रशियन समाजवादी क्रांतीनंतर समाजवादाच्या संकल्पनेने भारून जाऊन अनेक तरुण समाजवादी रशियात गेले. 'ॲनिमल फार्म'चा लेखक जॉर्ज ऑरवेल त्यांतलाच एक. दुसरे उदाहरण म्हणजे ऑर्थर कोस्लर. स्टॅलिनने शेतकऱ्यांशेतकऱ्यांत भेद पाडून रणगाडे पाठवून ग्रामीण शेतीतील नेतृत्व उद्ध्वस्त केले आणि लाखो जमीनदारांच्या कत्तली केल्या. केवळ भ्रमनिरास नव्हे तर प्रचंड उद्वेगाने उद्ध्वस्त झालेला कोस्लर रशियाबाहेर पडला. समाजवादाच्या आपल्या अनुभवावर आधारलेली त्याची दोन पुस्तके प्रसिद्ध आहेत. एक 'योगी आणि कमीसार' आणि दुसरे, 'मध्याह्नीचा काळोख'. 'मध्याह्नीचा काळोख'चा नायक रुबाशॉव याचे चित्रण कोस्लरने केले तेव्हा त्याच्या डोळ्यासमोर सोविएट युनियमधील एका अर्थशास्त्र्याचा जीवनपट होता; त्याचे नाव निकोलाय इव्हॅनोविच बुखारीन.

केवळ अठरा वर्षांचा असतानाच बुखारीन त्या वेळच्या समाजवादी पक्षात दाखल झाला. मॉस्कोच्या बोल्शेविकांचा तो प्रमुख बनला. झारशाहीने त्याला तो बावीस वर्षांचा असतानाच तुरुंगात टाकले. तुरुंगातून निसटून तो परदेशात गेला. रशियातील अनेक कम्युनिस्ट नेते त्यावेळी परदेशांत निर्वासिताचे जिणे जगत होते. त्यांपैकी एक पुढे जगभरच्या इतिहासात मोठा गाजणार होता. तो म्हणजे लेनिन. बुखारीनची आणि त्याची चांगली दोस्ती जमली.

बुखारीन मोठा जहाल क्रांतिवादी. समाजवादी व्यवस्थेतून शासनसंस्थेचा अंत होईल ही त्याची जबर निष्ठा. त्याहीपेक्षा, तो भांडवली अर्थव्यवस्थेचा गाढा जाणकार होता. भांडवलशाही व्यवस्थेत मक्तेदारी वाढेल; त्यातून साम्राज्यशाहीचा

उगम होईल हा सिद्धांत बुखारीनने प्रथम मांडला. पण, त्याला प्रसिद्धी मिळाली ती प्रथम लेनिनच्या पुस्तकामुळे. बुखारीनकडून अर्थशास्त्रीय समज घ्यावी आणि प्रचलित राजकीय परिस्थितीमध्ये त्यातून व्यवहार्य धोरण ठरवावे आणि त्या धोरणाचे समर्थन करण्यासाठी सैद्धांतिक तानाखेची करावी असे कौशल्य लेनिनने दोनतीन वेळातरी दाखविले. १९१७ च्या क्रांतीनंतर बुखारीनने लेनिनच्या आर्थिक कार्यक्रमांच्या सिद्धांताला पाठिंबा दाखविला. तो मध्यवर्ती समितीचा सदस्य बनला एवढेच नव्हे तर, कम्युनिस्ट पक्षाच्या 'प्रावदा' या मुखपत्राचा तो संपादक बनला. या पदावर त्याने १९२९ पर्यंत, म्हणजे तब्बल बारा वर्षे काम केले. क्रांतीनंतरच्या काळात समाजवादी नियोजन युद्धपातळीवर राबवावे आणि त्यासाठी सर्व अर्थव्यवस्थेवर शासनाचा कब्जा असावा, कामगारांवर लष्करी शिस्त लादावी आणि शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने धान्यवसुली व्हावी अशी मांडणी त्याने काही काळ केली. त्या काळी असे प्रतिपादन ट्रॉट्स्की आणि प्रियाब्रोझेन्स्की हे करीतच होते. तीन वर्षांत सारी अर्थव्यवस्थाच कोसळली; गोंधळ माजला तेव्हा लेनिनबरोबर बुखारीननेही उदारमतवादी आर्थिक धोरणास पाठिंबा दिला. यानंतरच्या काळात बुखारीन हळूहळू जास्त मवाळ धोरणांचा पुरस्कार करू लागला.

जलद गतीने औद्योगिकीकरण व्हायचे असेल तर शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने शेतीमाल घेतला पाहिजे. त्यांना शेतीमालाची किंमत कमीत कमी द्यावी आणि कारखानदारी माल त्यांना महागात विकावा अशा मांडणीस स्टॅलिनचाही पाठिंबा होता. पण, तो त्याने उघड व्यक्त केला नव्हता. बुखारीनने त्याचा शेतीमालविषयक सिद्धांत मांडला. समाजवादी कारखानदारी झपाट्याने उभी राहायला पाहिजे, त्यासाठी शेतीतून बचत मिळविली पाहिजे हे खरे, पण त्यासाठी जुलूमजबरदस्तीचे धोरण उपयोगी पडणार नाही; हे काम गोडीगोडीने करावे लागेल. लेनिनपासून सारे, शेतकरी समाजात वर्गवारीने भेद करीत. क्रांतीनंतरच्या पहिल्याच दुष्काळात छोटे शेतकरी आणि कामगार एकमेकांचे क्रांतिकारी दोस्त असल्याचे अधिकृतरीत्या जाहीर झाले होते. नंतरच्या काळात मध्यमवर्गीय शेतकऱ्यांनाही चुचकारून घेतले गेले. पण, मोठे जमीनदार (म्हणजे कुलक) हे नफेखोर राक्षस समाजवादी व्यवस्थेचे जन्मजात शत्रूच आहेत, त्यांच्यात आणि कामगारांत दोस्ताना कधी होऊच शकत नाही अशी मांडणी खुद्द लेनिननेही केली होती. बुखारीनने अधिक व्यावहारिक मार्ग सांगितला होता. दडपशाही केली तर ग्रामीण भागात अस्थिरता माजेल,



उत्पादन घटेल, माल बाजारात येणार नाही एवढेच काय, तो लुटताही येणार नाही अशी परिस्थिती होईल. तेव्हा, दडपशाहीचा विचार सोडून द्यावा. मग, धान्य मिळवावे कसे? बुखारीनने सांगितलेली पद्धत अशी : कारखानदारी आणि शेती यांच्या मालांच्या देवघेवीसाठी खुली बाजारपेठ असावी; शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा अशी व्यवस्था असावी. बाजारपेठेचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी पैसा कमवावा, उत्पादन वाढवावे आणि चांगले सुखवस्तू बनावे यासाठी त्यांना प्रोत्साहन द्यावे. एवढेच नव्हे तर, जे शेतकरी सहकारी किंवा सामुदायिक शेतीत सामील होतील त्यांना बी-बियाणे, औषधे, खते आणि वीज यांचा पुरवठा खास स्वस्त दराने करावा म्हणजे अशा मोठ्या प्रमाणात होणाऱ्या शेतीची उत्पादकताही वाढेल, खर्चही कमी होईल आणि फायदाही चांगला सुटेल. अशा मार्गानेच समाजवादी कारखानदारीकरिता लागणारे भांडवल उपलब्ध होऊ शकेल.

प्रियाब्रोझेन्स्की आणि ट्रॉट्स्की दोघेही 'सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापून काढावी' या पक्षाचे, तर बुखारीन 'बकरीस कत्तलीच्या दिवसापर्यंत चांगले खाऊपिऊ घालून लठ्ठ करावे म्हणजे अधिक मटन हाती पडेल' अशा विचाराचा.

शेतीमालाचा पुरवठा नाही आणि कारखानदारी मालाचा पुरवठा असून त्याला उठाव नाही अशा भयानक कैचीत समाजवादी रशियाची अर्थव्यवस्था सापडली. या प्रश्नावरील सारी चर्चा स्टॅलिन दोन्ही बाजूंनी ऐकून घेत होता. प्रथम त्याने हल्ला चढविला तो प्रियाब्रोझेन्स्कीवर. त्याला तुरुंगात टाकले. 'रशियात एक सरकारी कारखानदारी व्यवस्था आहे आणि दुसरी खासगी शेतकी व्यवस्था आहे आणि त्या दोघांचे साप-मुंगुसाचे वैर आहे असे म्हणणे समाजवादी क्रांतीला सुरुंग लावण्यासारखे आहे' अशी भूमिका घेऊन स्टॅलिनने मवाळांना चुचकारून घेतले. पण, प्रश्न काही सुटला नाही.

सामूहिक शेतीस सरकारी प्रोत्साहन मिळाले म्हणजे भरभरून उत्पादन सुरू होईल ही कल्पनाच खोटी ठरली. मध्यमवर्गीय जमीनमालकच काय, पण छोट्या शेतकऱ्यांनाही शहरांतील कारखानदारी कामगार वर्ग जवळचा वाटेना. त्यांपेक्षा 'क्रांतीचे शत्रू' कुलकच त्यांना अधिक जवळचे वाटले. समाजवादी शेतीचा प्रयोग सपशेल फसला. काही चाल करणे स्टॅलिनला अपरिहार्य झाले. त्याने बुखारीनला तुरुंगात टाकले आणि सरळ जमीनदारांविरुद्ध युद्ध पुकारले. लक्षावधी माणसे मारली गेली, मोठा असंतोष माजला. खुद्द कम्युनिस्ट पक्षातही स्टॅलिनविरुद्ध कटकारस्थाने शिजू लागली; निदान त्या आरोपाखाली काही पक्षश्रेष्ठींना पकडण्यात

येऊन त्यांना तातडीने देहांताच्या शिक्षा देण्यात आल्या. समाजवादी क्रांतिविरुद्ध हे कटवाले काही षड्यंत्र रचित होते याचा पुरावा मिळेना. बुखारीन या वेळी तुरुंगात अत्यंत उद्ध्वस्त मन:स्थितीत होता. मरण येण्याची वाट पाहण्यापलीकडे तो काहीच करू शकत नव्हता.

स्टॅलिनने त्याला सोडून देण्याची लालूच दाखविली; फक्त एका अटीवर: कटवाल्यांविरुद्ध स्टॅलिन सांगेल तशी साक्ष बुखारीनने दिली पाहिजे. बुखारीन लालचावला. साक्षीत त्याने कटवाल्यांविरुद्ध तर साक्ष दिलीच पण लाचारपणे 'शेतकरी प्रश्नांविषयीची सारी मांडणी ही आपण क्रांती मोडण्याच्या दुष्टबुद्धीनै केली' असाही कबुलीजबाब त्याने दिला. पन्नाशीच्या आत वयाचा, पण तुरुंगातील हालअपेष्टांनी खंगून गेलेला बुखारीन जिवाच्या आणि सुटकेच्या आशेने सर्व बीभत्सना स्वीकारण्यास तयार झाला. स्टॅलिनच्या दृष्टीने त्याचा आता काहीच उपयोग राहिला नव्हता. शेवटी, त्याचाही शिरच्छेद करण्याचा हुकूम स्टॅलिनने अगदी शांतपणे दिला. मृत्युदंड अमलात आणण्यासाठी बुखारीनला नेले तेव्हा तो जवळजवळ भ्रमिष्ट अवस्थेतच होता; आजही वाचकांचे मन हेलावून जावे अशा दारूण परिस्थितीत त्याचा अंत झाला.

*(२ फेब्रुवारी १९९८)*

■■



# क्रुसोचे अर्थशास्त्र

रशियन अर्थशास्त्रज्ञ बुखारीन आर्थर कोस्लरच्या 'मध्यह्नीचा सूर्य' या जगद्विख्यात कादंबरीचा नायक बनला. या उलट, दुसरे एक मोठे विलक्षण उदाहरण आहे. अर्थशास्त्राचा विद्यार्थी नाही, अर्थशास्त्र कोण्या विद्यापीठात शिकविले नाही, अर्थशास्त्रातील कोण्या विषयावर काही लिहिलेले नाही आणि तरीही अर्थशास्त्रावरील चर्चेत अढळ स्थान मिळविले असा एक कादंबरीकार होऊन गेला. त्याने लिहिलेल्या पुस्तकाशी आबालवृद्धांचा परिचय आहे. मुलांचे तर ते विशेष आवडते पुस्तक आहे. या पुस्तकाची संक्षिप्त आवृत्ती सर्व देशांतील सर्वभाषी विद्यार्थी मोठ्या आनंदाने वाचतात. पुस्तकाचे नाव 'रॉबिन्सन क्रुसो' आणि कादंबरीकाराचे नाव डॅनियल डेफो.

रॉबिन्सन क्रुसो ही काही तशी कादंबरी नाही; ते एक प्रवासवर्णन आहे. एक खलाशी सागरी सफरीच्या प्रेमाने पुन्हापुन्हा समुद्रपर्यटनास निघतो. पहिल्या दोन प्रवासांत वादळाचा मोठा अनुभव येतो. तरीही हट्टाग्रहाने तो तिसऱ्या सफरीस निघतो आणि यावेळी त्याचे जहाज प्रचंड वादळामुळे बुडते. बोटीवरील सारेचजण बुडून मरतात. क्रुसो मात्र नशिबाने एका लाकडी फळीचा आधार घेऊन जिद्दीने तरंगत राहतो. रात्रभर लाटांशी झुंजल्यानंतर, सुदैवाने, जवळच्या एक निर्मनुष्य बेटाच्या किनाऱ्याला लागतो. किनाऱ्यावर पोहोचल्यानंतर, प्रचंड थकव्यामुळे त्याला झोप लागते. उठल्यानंतर पहिल्यांदा तो अन्नाच्या शोधात निघतो; मग पाण्याच्या. अंधार पडल्यानंतर जगंली श्वापदांच्या हल्ल्यापासून बचाव व्हावा या करिता काही जुजबी व्यवस्था करून अस्वस्थपणे एक रात्र काढतो. दुसरे दिवशी, समुद्रकाठाने जाता जाता त्याच्या बुडालेल्या गलबतावरील एक होडी कर्मधर्मसंयोगाने किनाऱ्याला लागलेली त्याला आढळते. त्याच्या नशिबाने त्यातील एका पेटीत काही बंदुका, दारूगोळा, कुऱ्हाड आणि इतर काही हत्यारे मिळतात; पोषणसंरक्षणाची अधिकाधिक चांगली व्यवस्था करणे त्यामुळे सुलभ होते. केवळ कंदमुळे, फळे हा आहार न करता तो शिकार करू लागतो. मारलेल्या प्राण्यांच्या

कातड्यांपासून तो कपडे तयार करतो. झाडे तोडून चांगले भरभक्कम कुंपण असलेले, एका मोठ्या माच्यावरचे सुरक्षित घर बनवितो. एका झाडावर चाकूने कातरे काढून दिनदर्शिका तयार करतो. सावलीच्या आधाराने वेळ पाहण्याचे साधन तयार करतो. अश्या तऱ्हेने संपूर्ण निर्मनुष्य बेटावर एकाकी जीवन कंठण्याची वेळ आलेला क्रुसो आपले आयुष्य अधिकाधिक सुखावह करून घेतो.

पुढे त्या बेटावर एक रानटी टोळी येते. नाचगाणे करून नंतर विधिपूर्वक एका माणसाचा नरबळी द्यायचा त्यांचा इरादा असतो. बंदुकीच्या धाकाने क्रुसो त्या टोळीस पळवून लावतो. आता बेटावर एक दुसरा माणूस क्रुसोबरोबर राहू लागतो. त्यांचे संबंध उघडच 'मालक आणि स्वामीनिष्ठ गुलाम' असे होतात. पण, त्याच्या मदतीमुळे क्रुसोला जीवन अधिक सुखकर करणे शक्य होते. शेवटी, जवळून जाणाऱ्या एक गलबतावरील खलाशांचे लक्ष क्रुसो व त्याचे साथीदार वेधून घेतात आणि त्या गलबतावरून दोघेही मायदेशी परततात. अशी ही मोठी चित्तथरारक धाडसकथा आहे.

या कथानकातील पहिला भाग म्हणजे, क्रुसो एकाकी जीवन जगत असताना आणि सुई, कात्री, बूट, भांडी इत्यादी नित्योपयोगी वस्तूंचे पर्याय तयार करत असताना जे जे घडते त्याचे डॅनियल डेफोने फार तपशीलवार आणि बारकाईने वर्णन केले आहे. कथानकाचा हाच भाग अर्थशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

माणसांच्या कोणत्याही समाजात विविध गरजा पुरविण्यासाठी विविध माणसे विविध प्रकारचे उद्योग करतात. शिकारी मानव शेती करू लागतो. त्यातून उद्योगधंद्यांची वाढ होते. आपल्या गरजेच्या सगळ्या गोष्टी स्वत:च बनविणे कोणालाच शक्य नसते. त्याला विविध प्रकारचा कच्चा माल, हत्यारे आणि ज्ञान लागते. माणसे कामांची वाटणी करून घेतात. श्रमविभागणी करून मग तयार केलेल्या वस्तूंचा व्यापार करतात. किरकोळ कारागिरीपेक्षा मोठ्या प्रमाणावरील कारखानदारी अधिक कार्यक्षम असते हे लक्षात आल्यावर कामांची पुन्हा एकदा फेरवाटणी होते. अर्थशास्त्राचा सारा विषय सामाजिक चलनवलनाचा आहे. अशा समाजात राहणारा माणूस निर्णय कसे काय करतो? त्याच्या प्रेरणा कोणत्या? हे प्रश्न अर्थशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

समजा, एखादा माणूस समाजात न राहता एकाकीच राहत असता तर आपल्या विविध गरजा भागविण्याकरिता त्याने काय केले असते? त्या एकाकी माणसाचे अर्थशास्त्र काय राहिले असते? एकाकी राहणाऱ्या माणसाच्या अर्थव्यवस्थेच्या



अभ्यासाला 'क्रुसो अर्थशास्त्र' असे नामाभिधान आहे.

गरीब देश गरीब का राहतात? आणि काही देश संपन्न का होतात? गरीब देशांना संपन्न कसे होता होईल? या विषयाच्या अभ्यासाला 'विकासाचे अर्थशास्त्र' म्हणतात. या विकासाच्या अर्थशास्त्रातही क्रुसोच्या अनुभवांचे मोठे महत्त्व आहे.

एकाकी निर्जन बेटावर सापडलेला हरेक खलाशी क्रुसोप्रमाणे तगून राहील, हिंमत दाखवेल, आसपासच्या साधनांतून उपयोगी वस्तू तयार करण्याची प्रतिभा दाखवेल याची काही शाश्वती नाही. क्रुसोत धाडस होते, हिंमत होती, तो बुद्धिमान होता. खलाशी म्हणून सुतारकाम करणे, दोऱ्या वळणे, काही धातुकाम करणे इत्यादी हुन्नर त्याला अवगत होत्या. म्हणजे, क्रुसाचे गुण आणि त्याचे आधीचे प्रशिक्षण या दोन्ही गोष्टी क्रुसोच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाच्या होत्या. म्हणजे, माणसाची गुणवत्ता ही विकासाची पूर्वअट आहे. ज्या समाजात धाडस आणि कारागिरीचे कसब हे गुण बाळगणाऱ्या माणसांचा अभाव असेल तेथे ते यावेत असा प्रयत्न करावा लागेल. अन्यथा, 'विद्येविना मति गेली, मतिविना नीति गेली, नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले।... सर्वची बुडाले' अशी स्थिती होईल.

दुसरी गोष्ट, क्रुसोचे भाग्य असे की तो घनदाट जंगलाच्या बेटाला लागला. अशा बेटावर अर्थात्, जंगली श्वापदांचे भय असणारच. पण, क्रुसो जर अगदीच वाळवंटी बेटावर लागला असता आणि पिण्याच्या पाण्याचेही दुर्भिक्ष अश्या स्थितीत सापडला असता तर त्याला प्रगती करणे कितीतरी पटींनी दुष्कर झाले असते. निसर्गावर माणूस मात करू शकतो याची अनेक उदाहरणे मध्यपूर्वेतील देशांत आजही दिसतात. याउलट, भारतासारखा मुबलक निसर्ग साधनसंपत्ती असलेला देश मागासलेला राहतो. ही दोन्ही टोकांची उदाहरणे लक्षात घेऊनही एक निष्कर्ष काढावा लागतो की, निसर्ग प्रसन्न असेल तर प्रगती अधिक सुलभ होते.

क्रुसोच्या साऱ्या धाडसकथेत आणि दुर्दैवाच्या कहाणीत एक मोठी सुदैवाची गोष्ट घडली. अगदी सुरुवातीसच, त्याच्या गलबतावरून सुटून आलेल्या होडीत त्याला शस्त्रे, अवजारे आणि हत्यारे इत्यादी तयार मिळतात. कुऱ्हाड, करवत, चाकू अशा गोष्टी तयार मिळाल्या नसत्या तर काय झाले असते? धातूंचा शोध लावून, त्यांचे ओतकाम करून हत्यारे बनवेपर्यंत वर्षानुवर्षे निघून गेली असती आणि एवढ्या प्रदीर्घ काळात क्रूर प्राण्यांनी क्रुसोवर कदाचित् मात करून टाकली

असती. साधनसामग्री उपलब्ध असणे ही विकासाच्या प्रवाहात मोठी सोय आहे. ती होडी क्रुसोच्या बेटाला सुदैवाने लागली नसती किंवा त्या होडीत हत्यारे, शस्त्रे, अवजारे नसती तर क्रुसोच्या सगळ्याच धडपडीत मोठी बाधा तयार झाली असती.

प्रसन्न निसर्ग आणि धाडसी व प्रज्ञावान पुरुष एकत्र आले, काही साधने उपलब्ध झाली की विकासाची प्रक्रिया सुरू होते. नशिबाने हात दिला तर उत्तम. नाही तर, ही साधने तो माणूस तयार करेल आणि आपल्या गरजा भागविण्याचा प्रयत्न चालू ठेवेल.

वैज्ञानिक प्रयोगशाळेत विश्लेषण करण्यासाठी वस्तूचे भाग वेगवेगळे करतात आणि एकेका भागाचे गुणधर्म व कार्य यांचा अलग अलग अभ्यास करतात. वेगवेगळ्या गुणकार्यांची बेरीज म्हणजे सगळ्या वस्तूचे गुणकार्य असे समजतात. सामाजिक विषयात हे समीकरण पूर्णत: खरे नाही. समाज म्हणजे व्यक्तींची केवळ गोळाबेरीज नाही. माणसांच्या समाजातील त्याचे नियम आणि चलनवलन काही वेगळेच असतात. तरी, क्रुसोच्या धाडसकथेत अर्थशास्त्र्यांना एकाकी माणसाच्या आर्थिक धडपडीचे विश्लेषण करायला मिळाले. एक पुरुष हे समाजाचे एकक आहे असे गृहीत धरून या विषयावर चर्चा झाली. क्रुसोच्या बरोबर एखादी जोडीदारीण तुफानात वाचली असती किंवा रानटी टोळीच्या हातून सोडविलेला पुरुष नसता, स्त्री असती तर त्यांचे आणि त्यांच्या परिवाराचे अर्थशास्त्र कसे उलगडत गेले असते याचा अभ्यास 'अर्थशास्त्रा'च्या दृष्टीने, कदाचित् अधिक बोधप्रद ठरला असता. अजूनही कोणी नव्या दमाचा 'डॅनियल डेफो' हे काम करू शकतो.

*(११ फेब्रुवारी १९९८)*

■■



# अनंत इच्छा आणि फाटकी साधने

अर्थशास्त्र, अर्थशास्त्री, अर्थकारण, अर्थव्यवस्था हे शब्द अगदी सामान्य माणसांच्याही हरघडीच्या जीवनात वारंवार वापरले जातात. अर्थशास्त्र ही नेमकी काय भानगड आहे? कोणत्या विषयांचा अभ्यास अर्थशास्त्राच्या कक्षेत येत नाही? पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी शास्त्रे आणि अर्थशास्त्र यांच्यातील नेमकी सरहद्द कोणती?

मध्ययुगात अर्थशास्त्राचा विषय आजच्यापेक्षा अगदीच वेगळा होता. बहुतेक देशांवर राजेरजवाडे, सरंजामशहा यांचे राज्य चालत असे. राज्यावर शत्रूचे आक्रमण झाले तर प्रजेचा बचाव करण्याची जबाबदारी राजाची. आसपासच्या प्रदेशांवर हल्ला करून लूट मिळविण्याची संधी राजे सोडीत नसत. अशा साऱ्या युद्धांसाठी पैसा लागतो. दुसऱ्या देशांतून आणलेली लूट या कामासाठी नेहमीच पुरी पडत नसे. नागरिक आणि रयत यांच्याकडून जितकी काही रक्कम गोळा करणे जरूर असे त्यासाठी अनेक वेळा मोठ्या क्रूर पद्धती वापरल्या जात. युद्धाखेरीज दुसरा मोठा खर्च म्हणजे राजघराण्याचा थाटमाट, विलास आणि छानछोकी. त्याकरिताही खजिन्यात पैसे लागत. राजांची युद्धे आणि विलास यांकरिता खजिना भरता कसा ठेवावा यासंबंधीचा विचार म्हणजे 'अर्थशास्त्र' अशी व्याख्या सम्राट चंद्रगुप्ताचा गुरू कौटिल्य याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथापासून मान्यवर झाली.

अनेक शतके अर्थशास्त्र आणि राज्याचा कारभार यांचा संबंध इतका अतूट मानला जाई की इंग्रजीत या शास्त्राचे नावच 'राजकीय अर्थशास्त्र' असे पडले.

इंग्लंडमध्ये वाहतूकक्रांती झाली त्याबरोबर व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रांतही प्रचंड प्रगती झाली. खासगी क्षेत्रातील उलाढाली वाढल्या; तुलनेने राजांच्या खजिन्यातून होणारा खर्च कमी झाला. आंतरराष्ट्रीय व्यापार हे देशाचे वैभव वाढविण्याचे नवीन साधन उपलब्ध झाले. व्यापारउदीम भरभराटीत राहिले पाहिजेत, त्याशिवाय राजाचा खजिना भरणार नाही. कंगाली आणि भूकमार वाढत राहिली तर राज्याला धोका संभवतो. तेव्हा व्यापारउदिमाची भरभराट होऊ देणे हे

राजांच्या अर्थकारणाचेही महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले. साहजिकच, 'राजकीय' हे विशेषण गळून पडून निव्वळ 'अर्थशास्त्र' असा शब्दप्रयोग होऊ लागला.

अर्थशास्त्रात उत्पादन, वितरण, व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापार, पैसा, पतपुरवठा इत्यादी विषयांचा अंतर्भाव होतो हे सर्वमान्य होते. अर्थशास्त्राच्या विषयांची अशी जंत्री करायला बसले तर मारुतीच्या शेपटाप्रमाणे ती कधी संपायचीच नाही; पण, या लांबलचक यादीतील समान सूत्र कोणते? त्याच्यातील नेमकी 'आर्थिकता' कोणत्या गुणात आहे? या विषयात काही स्पष्टता नव्हती.

लोकांच्या 'ऐहिक कल्याणा'चा अभ्यास करणारे शास्त्र अशीही अर्थशास्त्राची जुजबी व्याख्या दिली गेली, पण या व्याख्येमुळे हलकल्लोळच उडाला. आपल्या साऱ्या अभ्यासाचा विषय ऐहिक सुखसंपदा आणि उपभोग आहे, मानवी जीवनातील उच्च मूल्यांचा आणि आपल्या अभ्यासाच्या विषयाचा काहीही संबंध नाही ही कल्पनाच बहुतेक अर्थशास्त्र्यांना असह्य वाटली. अर्थशास्त्राचा विषय केवळ ऐहिक असेल तर मग ते 'डुकरांचे शास्त्र' आहे अशी कडक प्रतिक्रिया आली. प्रत्यक्ष पाहता, अर्थशास्त्र फक्त ऐहिक बाबींचाच विचार करते असे दिसत नाही. चर्च, मंदिरे इत्यादी धर्मसंस्थाचा जमीनजुमला, व्यापार आणि निधीसंकलन असा आर्थिक कारभार भरपूर मोठा असतो. तो सारा ऐहिक उपभोगासाठी होतो असे म्हणणे योग्य होणार नाही. आध्यात्मिक उन्नती आणि मोक्षसाधना याकरिताही उघडउघड आर्थिक स्वरूपाचे व्यवहार करावे लागतात, तेव्हा ऐहिकतेचे कुंपण काही तर्कसंगत नाही.

तसेच, 'कल्याण' ही सरहद्दही बुद्धीला पटणारी नाही. युद्धात माणसे मारली जातात, मालमत्तेचा विद्ध्वंस होतो; म्हणजे, युद्धे मनुष्यप्राण्याच्या कल्याणाची गोष्ट नव्हेत. मग युद्धाकरिता खर्च होणारे उत्पादन, मनुष्यबळ इत्यादी अर्थशास्त्राच्या कक्षेबाहेर समजायचे काय?

अर्थशास्त्राची नेमकी व्याप्ती काय या विषयी दीर्घकाळ हमरीतुमरीची चर्चा चालली. पण, काही निष्कर्ष निघेना. एका अर्थशास्त्री विदुषीने संतापाने म्हटले, 'अर्थशास्त्री तरी कोण असते? जो दुसऱ्या कुणाला अर्थशास्त्र्याच्या पदी नेमणूक करू शकतो तो अर्थशास्त्री' अशी उपरोधिक व्याख्या तिने केली.

या साऱ्या चर्चेच्या रणधुमाळीतून अकस्मात एक नवी कल्पना मांडली गेली; एक नवी व्याख्या एका पुस्तकात दिली गेली. या पुस्तकातील विवेचनात वापरलेले तर्कशास्त्र इतके बिनतोड होते की, त्याबाबत उलटासुलटा प्रतिवाद करणेही शक्य



नव्हते. एक एक बारीकसारीक मुद्दा बारकाईने तपासून, त्यातील नेमका, नाकारण्यास अशक्य मथितार्थ घेऊन विश्लेषण करताना या पुस्तकात वापरलेले गद्य इतके प्रभावशाली होते की हे पुस्तक अर्थशास्त्रातच काय, इंग्रजी गद्यसाहित्यातही मुजरे घेऊन गेले. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स्‌च्या लायोनेल रॉबिन्स् यांच्या या पुस्तकाचे शीर्षक: 'अर्थशास्त्राची प्रकृती आणि महत्त्व'.

सुरुवातीला, पहिला प्रश्न. व्याख्या कशी असली पाहिजे? याचे विवेचन प्रो. रॉबिन्स् यांनी केले आणि निष्कर्ष काढला : 'शास्त्राची व्याख्या अशी असली पाहिजे की, त्या शास्त्रात अभ्यासले जाणारे सारे विषय व्याख्येच्या चौकटीत बसले पाहिजेत आणि त्यातील कोणताही विषय चौकटीबाहेर राहता कामा नये; एवढेच नव्हे तर, त्या शास्त्राशी संबंध नसलेला कोणताही विषय व्याख्येच्या चौकटीत बसता कामा नये.'

अशी व्याख्या, विषयांची एक लांबलचक यादी करूनही देता येईल. पण, प्राध्यापकांना ते मंजूर नाही. 'व्याख्या सूत्ररूपाची असली पाहिजे; म्हणजे, विश्लेषणावर आधारलेली असली पाहिजे; शास्त्राच्या कक्षेत येणाऱ्या सर्व विषयांतील समानतेचे सूत्र काय ते व्याख्येत स्पष्ट झाले पाहिजे' असा त्यांचा आग्रह होता.

अर्थशास्त्र हे जीवनाच्या काही अंगांचाच विचार करणारे नाही; सगळ्या जीवनाला व्यापून टाकणारे आहे. येथे प्रा. रॉबिन्स् दोन तत्त्वे मांडतात.

प्रथम- माणसाच्या इच्छा व उपभोगांना अंत नाही. उपभोग घेत राहिले तर त्यापासून मिळणारे समाधान घटत जाते, तृप्ती वाटते आणि अखेरीस उबगही तयार होऊ शकतो. पण, एक इच्छा शमते न शमते तो क्षितिजावर नवनव्या इच्छा, भुका आणि तृष्णा तयार होतात. थोडक्यात इच्छा अनंत असतात, त्या कधी संपत नसतात. पण एकेक इच्छा तात्पुरतीतरी भागविता येते हे त्रिकालाबाधित सत्य आध्यात्मिकांनीही मानले आहे.

दोन- माणसांच्या विविध इच्छांचे समाधान करण्यासाठी काही साधने लागतात, त्यांची संख्या मर्यादित असते. सर्वच इच्छा पुऱ्या करणे अशक्य असते. त्यांतील काही अजिबात सोडून द्याव्या लागतात; उरलेल्या कमीअधिक प्रमाणात पुऱ्या करता येतात. साधनांचे वाटप वेगवेगळ्या कामांकरिता करावे लागते आणि तेही अश्या तऱ्हेने की जास्तीत जास्त संतोष मिळावा. एका बाजूस अनंत इच्छा आणि दुसऱ्या बाजूस सीमित साधने यांचा मेळ घालण्याचा खेळ हा अर्थशास्त्राचा

विषय आहे.

कोणत्याही वस्तूचे आर्थिक मूल्य ठरते ते काही त्याच्या जड वस्तुरूपामुळे नाही. संगीताच्या मैफलींना लोक पैसे खर्च करून गर्दी करतात; आध्यत्मिक प्रवचनांनाही आश्रय देतात. मूल्य असण्यासाठी जडत्व आवश्यक आहे पण, पुरेसे नाही. वस्तू किती उपयोगाची आहे यावरही तिचे मूल्य ठरत नाही. माणसाला सर्वांत उपयोगी गोष्ट म्हणजे श्वासोच्छ्वासासाठी लागणारी हवा; पण, इतकी जीवनावश्यक गोष्ट सरसकट फुकट मिळते. पाण्याशिवायही मनुष्य फार काळ जगू शकत नाही; पण, तेही निसर्गात विनामूल्यच उपलब्ध असते.

आज - आता प्रचंड मूल्य असलेली गोष्ट एका क्षणात कवडीमोल ठरू शकते. उदाहरणार्थ, युद्धात अखेरच्या क्षणापर्यंत दारूगोळा, रणगाडे इत्यादी रणसाहित्याचे मोठ महत्त्व असते. पण, युद्धविराम झाला की एका क्षणात या गोष्टी निरुपयोगी होऊन जातात.

मग, वस्तूला किंमत मिळते ती कशामुळे? प्रा. रॉबिन्स् निष्कर्ष काढतात:

मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असला की, वस्तूला मूल्य येते आणि पुरवठा जितका कमी तितके मूल्य जास्त राहते व जितका जास्त तितके मूल्य कमी. मूल्याचा उगम असा आहे. तो जडत्वात नाही, ऐहिकतेत नाही; वस्तूच्या गुणधर्मात नाही, उत्पादनखर्चात नाही. वस्तूची किंमत ठरते ते अंगभूत जड गुणांमुळे नाही, ती तयार करायला लागणाऱ्या उत्पादनखर्चावर नाही; मागणी-पुरवठा संबंधाने किंमत ठरते.

अनंत इच्छा घेऊन जन्मलेला माणूस सीमित साधने घेऊन त्या इच्छा पुऱ्या करायचा प्रयत्न करतो. गरजांच्या निकडीप्रमाणे हाती असलेली साधने वापरून जास्तीत जास्त प्रमाणात तृप्त करण्याचा प्रयत्न करतो.

समजा, एक वसतिगृहात राहणारा विद्यार्थी आहे. त्याला बापाकडून मोजकीच रक्कम दरमहा मिळते. या रकमेचा उपयोग करून तो जेवू शकतो, सिनेमा पाहू शकतो किंवा कपडे घेऊ शकतो. त्याने जेवणावर किती खर्च करावा, सिनेमावर किती आणि कपड्यावर किती हा निर्णय त्याने स्वत:च्या आवडीनिवडीप्रमाणे करावयाचा आहे. एखादा विद्यार्थी 'जेवण मिळाले नाही तरी चालेल, सिनेमा पाहीन' अशा धारणेचा असेल. एखादा कपड्यांची आवड असलेला कपड्यांवर जास्त खर्च करील; सिनेमावर काहीच पैसे वाया घालविणार नाही आणि जेवणाच्या खर्चातही काटकसर करील. प्रत्येक विद्यार्थ्याचा निर्णय वेगवेगळा असेल. बापाने



दरमहा पाठवायची रक्कम कमी केली किंवा वाढविली तर हे सगळे निर्णय फिरून एकवार करावे लागतील. जेवण, सिनेमाचे तिकीट आणि कपडे यांच्या किमतीत फेरबदल झाला तरी पैशाच्या उपयोगाची सारी समीकरणे बदलून जातील. या अशा निर्णयांची प्रक्रिया हा अर्थशास्त्राचा विषय आहे. अर्थशास्त्र अनंत वैकल्पिक शमनक्षम इच्छा आणि तुलनेने अपुरी साधने यांमध्ये मेळजोळ बसविण्याचे शास्त्र आहे.

प्रा. रॉबिन्स् यांचे पुस्तक बाहेर पडले आणि या विषयावरील सगळेच वादंग बंद पडले. बहुतेक वादविवादांत शिमगा होऊन गेला तरी कवित्व उरते. अर्थशास्त्राच्या व्याख्येबद्दल बोलण्यासारखे काही उरलेच नाही इतका प्रा. रॉबिन्स् यांचा निष्कर्ष निर्णायक होता. आज, साठ वर्षे होऊन गेली तरी अर्थशास्त्राच्या व्याख्येबद्दल कोणी काही नवीन सुचवून प्रा. रॉबिन्सच्या पुढे दोन पावले टाकण्याचा प्रयत्नदेखील केला नाही.

कोणत्याही शास्त्रात वर्षानुवर्षे गाजलेल्या वादंगाचा इतका समाधानकारक आणि टिकाऊ शेवट एकाच माणसाच्या एकाच पुस्तकाने इतक्या निर्णायक पद्धतीने व्हावा असे क्वचित् घडते. प्रा. रॉबिन्स् यांचे 'अर्थशास्त्राची प्रकृती आणि महत्त्व' हे असे एक अपवादात्मक उदाहरण.

*(१२ फेब्रुवारी १९९८)*

■■

## असंतुष्ट मधमाश्यांची परीकथा

एक टेकड्याटेकड्यांचा प्रदेश होता. सर्वदूर तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पती, झाडेझुडुपे बहरत होती. त्यातील एका उंच झाडाच्या मजबूत फांदीवर एक भले मोठे मधमाश्यांचे पोळे वर्षानुवर्षे टांगलेले होते. कोणी मधमाश्यांना हाकून देण्याचा प्रयत्न करण्यासाठी तिकडे फिरकण्याचीही शक्यता नव्हती, त्यामुळे पोळे वाढतच राहिले. लक्षावधी मधमाश्या आसपासच्या प्रदेशातील फुलांवरून मध गोळा करून आणीत. त्या सर्वजणी चांगल्या धष्टपुष्ट झाल्या होत्या. मोठ्या हिरीरीने आणि मस्तीत वागायच्या. फुलांना काही तोटा नव्हता, तरी त्यातल्या त्यात रसाळ मधाची फुले शोधावी, त्यांतून मध गोळा करावा आणि तो मध पोळ्यात आणून आपापल्या कोषांत व्यवस्थित साठवून ठेवावा आणि पुन्हा एकदा नव्याने मध मिळविण्यासाठी फुलांकडे धावावे; मनसोक्त मध प्यावा, आनंदाने गात गात काम करावे ही त्यांची दिनचर्या. पोळ्यावर बसलेल्या मधमाश्यांचा सगळा गोंगाटच इतका होता की, आजूबाजूने फिरणाऱ्या कोणालाही तो मैलमैल अंतरावर ऐकू गेला असता. पण, तो सारा कल्लोळ ऐकायला जाणार कोण?

एके दिवशी चमत्कार झाला. एक हळुवार मनाची सुंदर परी फिरत फिरत त्या प्रदेशात गेली. मधमाश्यांच्या आवाजाने तिचे लक्ष वेधले गेले. पोळ्याजवळ जाऊन ती मोठ्या कुतुहलाने मधमाश्यांच्या हालचालींकडे पाहू लागली. मध गोळा करणे, साठविणे, खाणे, पिणे, त्यासाठी आवश्यक तर मैत्रिणींशी कडाडून झोंबी घेणे हे सगळ तिने पाहिले आणि तिला मोठी करुणा आली. ''काय हे या छोट्याशा प्राण्यांचे पापी जीवन! काय हे स्वार्थापोटी झगडणे! यांना आपापला स्वार्थ साधण्यापलीकडे कोणती बुद्धी नाही, नैतिकता नाही! असेच सारे जीवन गेले तर त्या अखेरीस रौरव नरकात पडतील, बाई!'' या कल्पनेनेच परीचे मन करुणेने भरून आले. आपली जादूची कांडी तिने पोळ्यावर फिरविली, ''या सर्व मधमाश्या क्षणात नि:स्वार्थी, परोपकारी, करुणामयी होऊन जावोत'' अशी इच्छा केली. परीचीच इच्छा! तसे ताबडतोब झाले.



मधमाश्यांचे सारे आयुष्यच बदलले; त्यांचे विचार बदलले, आचार बदलले. कुरणातील उत्तमोत्तम फुले शोधून मध गोळा करण्याऐवजी त्यांना आता दुसऱ्याच कल्पना सुचू लागल्या. ''हे सुंदर फूल फुलले आहे, याचे मी शोषण कसे करावे? काय हक्क आहे मला? माझ्या जगण्यापुरता मध घेणे स्वार्थापोटी समर्थनीय होईल, पण त्यापलीकडे मधाचा संचय करणे म्हणजे निव्वळ पापच!'' असा विचार त्या करू लागल्या. फुलांवर बसण्यासाठी अहमहमिकेने भांडणाऱ्या मस्तवाल माश्या आता 'लखनवी आदब' दाखवून फुलाफुलापाशी एकमेकींना 'पहिले आप' म्हणून जागा करून देऊ लागल्या. पोळ्यातील सगळ्या माश्या आता गुणवान, नीतिमान बनल्या. मध कोणी गोळा करेना. मधाचे पोळे हळूहळू वाळत चालले. शुष्क होऊन गेले. राणीनेही अंडी घालण्याचा नाद सोडून दिला आणि सर्वच पोळ्याचा विनाश झाला.

ही अशी कथा बर्नार्ड मांदेव्हिल या लेखकाने लिहिली. पहिल्या आवृत्तीत (सन १७०५) पुस्तकाचे नाव 'असंतुष्ट पोळे अर्थात् प्रामाणिक बनलेले भामटे' असे होते. दुसरी आवृत्ती नऊ वर्षांनी निघाली. तिचे नाव होते 'मधमाश्यांची परीकथा अर्थात् व्यक्तिगत दोष, सार्वजनिक लाभ'. दुसऱ्या आवृत्तीत मांदेव्हिलने जागोजागी टिपणे वाढवली आणि साऱ्या परीकथेचा निष्कर्ष काढला. एकमेकांत झगडणाऱ्या, लालसेने पछाडलेल्या असंतुष्ट मधमाश्यांचे पोळे वैभवात होते. सतत वाढत होते. त्याच मधमाश्यांनी नि:स्वार्थ नैतिकता स्वीकारल्यावर त्या पुण्यवान बनल्या. पण, त्यांच्या साऱ्या समाजाचा मात्र विनाश झाला. सार्वजनिक कल्याण आपापल्या संकुचित बुद्धीने वागणाऱ्या व्यक्तींच्या संघर्षातून साधले जाते; पारंपरिक नैतिकता पाळणाऱ्या व्यक्तींच्या समाजाचा अध:पात होतो.

लेखक १६७० साली, म्हणजे शिवछत्रपती राज्याभिषेकाच्या आसपास जन्मला आणि १७३३ साली मृत्यू पावला. १६९९ साली तो इंग्लंडमध्ये मानसोपचारतज्ज्ञ म्हणून स्थायिक झाला. भरपूर वाचनाचा छंद. त्याच्या लिखाणाचा परामर्श घेणाऱ्यांनी त्याला एक व्यंगकार - हसू आणणारे, मार्मिक, खुसखुशीत लेखन करणारा एक व्यंगकार मानले. पण, इतिहासाने मांदेव्हिल याच्यासाठी एका वेगळ्याच स्थानाची योजना केली होती.

'मला वाटते मी सिद्ध केले आहे की, माणसाचे मैत्री, प्रेमभावना इत्यादी निसर्गसिद्ध गुण किंवा विवेक आणि संयम यांसारखे संपादलेले गुण यांतून मोठ्या संस्कृती उगम पावत नाहीत; उलट, ज्याला आपण वाईट बुद्धी समजतो, अनैतिकता

मानतो त्यातूनच सर्व समाजप्रिय प्राण्यांत मजबूत नाती तयार होतात. त्यातूनच जीवन, व्यापरउदीम आणि वैभव उद्भवतात.'' मांदेव्हिलचे हे सूत्र खुल्या अर्थव्यवस्थेच्या सिद्धांताचा भीष्मपिता ॲडम स्मिथ याने उचलले. ॲडम स्मिथच्या वाचनात मांदेव्हिलची परीकथा आली होती; ती त्याने बारकाईने अभ्यासली होती याला पुरावा आहे. अधिकाधिक उत्पादन करण्यासाठी श्रमविभागणी कशी उपयोगी पडते यासंबंधीचा सिद्धांत ''राष्ट्रांची संपत्ती'' या त्याच्या पुस्तकातील पहिल्याच प्रकरणात मांडताना त्याने या परीकथेचा अनेक ठिकाणी साक्षेप केलेला दिसतो. ॲडॅम स्मिथचा निष्कर्ष: ''साऱ्या समाजाचा डोलाराच त्यातील घटक-नागरिकांनी एकमेकांना दिलेल्या सेवा हा आहे. आवश्यक त्या सेवा जरूर पडेल तेव्हा हमखास कश्या मिळतील त्याची व्यवस्था करणे हे साऱ्या जीवनाचे सूत्र आहे. कुणीही आपल्यासाठी निरपेक्ष नि:स्वार्थ बुद्धीने काही करावे ही अपेक्षाच मुळी अवास्तव आहे. माणसे एकत्र येतात ती मुख्यत: अश्या देवघेवींसाठीच.''

सार्वजनिक कल्याण आणि वैयक्तिक नीतिमत्ता यांच्यातील संघर्षावर अनेक अर्थशास्त्र्यांनी नंतरच्या काळात वारंवार प्रकाश टाकला आहे. आर्थिक मंदीचे विश्लेषण करणाऱ्या केन्सने ''काटकसर, मितव्यय, संयम या गुणांमुळे आर्थिक मंदी येते'' असा संबंध जोडला. ''वाढत्या उत्पन्नामुळे बचत वाढत जाते; ती उत्पादक कामात गुंतविली गेली नाही तर बाजारपेठेतील मागणी अपुरी पडते, मंदीची लाट येते, उद्योगधंदे बंद पडतात, बेकारी आणि उपासमार पसरते. काटकसर वैयक्तिक नीतिमत्ता म्हणून श्रेष्ठ असेल, पण साऱ्या समाजाला मात्र ती हानिकारक ठरते,'' अशी त्याने टिप्पणी केली आहे.

मांदेव्हिलच्या परीकथेचा अगदी अलीकडचा अवतार म्हणजे, सकारात्मक तत्त्वज्ञानाच्या उद्गात्या आयन रँड यांच्या 'शेषराजाची तडफड' या कादंबरीतील एक हकीकत.

अमेरिकेतील एक साधा, गरीबगुरीब घरात जन्मलेला कुशल मोटार मेकॅनिक मोठ्या जिद्दीने आपला व्यवसाय वाढवितो. छोटा कारखानदार होतो आणि मरणापूर्वी डेट्राईटमधील मोटार गाड्यांचे प्रचंड उत्पादन करणारा शहरातील यशस्वी कारखानदार होतो. कारखान्यातील सर्व कामगारांनी भरपूर काम करावे व तसेच वेतन मिळवावे; 'कष्ट करा आणि कमवा' हा त्याचा सिद्धांत. त्याच्या मृत्यूनंतर सारा कारभार त्याचा मुलगा व मुलगी यांच्या ताब्यात येतो. त्या दोघांना आपल्या



वडिलांची विचारसरणी अजिबात पसंत नसते. समाजवादी तत्त्वज्ञान- ''ज्याने त्याने समाजाला आपल्या कुवतीप्रमाणे द्यावे आणि समाजाकडून आपापल्या गरजेप्रमाणे घ्यावे'' हा त्यांचा आदर्श होता. साऱ्या कारखान्याच्या कारभाराची ते फेररचना करतात. कामगारांकडून कसून उत्पादन काढून घेण्यासाठी साऱ्या व्यवस्था - मुकादमी, कामाचे मोजमाप इत्यादि - ते रद्द करतात. ज्याने त्याने आपापल्या इच्छेप्रमाणे गरजा सांगाव्यात व त्याप्रमाणे पैसे घेऊन जावेत अशी व्यवस्था होते. आजारपण, मुलामुलींचे शिक्षण, मुलीच्या वाकड्या हातांकरिता करावयाची शस्त्रक्रिया अशा अनेक खऱ्या-खोट्या वास्तव-वाह्यात मागण्या आळशी आणि उनाडटप्पू कामगार प्रामुख्याने करू लागतात. उद्यमशील प्रामाणिक कामगार कष्टत राहतात आणि नेमके वेतनच घेत राहातात. काम करणारे आणि फुकट खाणारे असे दोन तट कामगारांत उघडउघड पडतात. त्यांच्यात झगडा लागतो. कारखान्यांत तयार होणाऱ्या मोटारगाड्यांची प्रत घसरत जाते. गिऱ्हाईक राहत नाही. अखेरीस कारखान्याचे दिवाळे वाजते. आयन् रँडच्या या कथेचा गाभा तीनशे वर्षांपूर्वी मांदेव्हिलने लिहिलेल्या मधमाश्यांच्या परीकथेतच आहे, हे उघडच आहे. सोळा शतके ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी समाजावर ईश्वरी म्हणून लादलेली नैतिकता जबरदस्त प्रभाव पाडून होती. शिवछत्रपतींसारखा प्रगल्भ बुद्धीचा इतिहासपुरुष ब्राह्मणांनी पहिल्या राज्याभिषेकाचा मुहूर्त चुकीचा ठरविल्यामुळे दुसरा राज्याभिषेक करून घेण्याच्या तयारीस लागला होता त्या वेळी रॉटरडॅमजवळील एक मानसिक रोगांचा चिकित्सक साऱ्या नैतिकतेलाच आव्हान देत होता.

*(२५ फेब्रुवारी १९९८)*

■■

# सौख्याचे अर्थशास्त्र

कोणाही माणसाला तहानभूक भागविण्यासाठी काही प्यायला मिळाले, खायला मिळाले म्हणजे आनंद वाटतो. थंडीवाऱ्यापासून संरक्षण व्हावे यासाठी कपडे, निवारा मिळाला म्हणजे संतोष होतो. संसार थाटला की गृहस्थीच्या जीवनात मुलाबाळांना आनंदाने खेळता बागडता यावे यासाठी खाणेपिणे, कपडे, निवारा, करमणूक यासाठी अनंत साधने हवीहवीशी वाटतात. माणसाच्या या सर्व जन्मजात प्रेरणा आहेत. खावे, प्यावे, उपभोगावे, आनंद लुटावा यासाठी माणूस जन्मभर खटाटोप करतो.

उपभोग वाढविण्याची प्रत्येक प्राणिमात्राची इच्छा असते हे खरे; पण, अश्या तऱ्हेने सर्व प्रयत्नांनी ऐहिक सुखसंपदांच्या मागे लागणाऱ्या व्यक्तींचा समाज सुखीसमाधानी, आनंदी राहील का? समाजाला मन नाही, राष्ट्रांना बुद्धी नाही तेव्हा त्यांच्याकरिता भल्याचे काय हे ते बोलत नाहीत. मग साऱ्या देशाकरिता उत्पादन, वितरण इत्यादी अर्थकारणासाठी भल्याची व्यवस्था कोणती? हे जाणण्यासाठी काही फूटपट्टी आहे काय? समाजाच्या सौख्याचे मोजमाप करता येईल काय? अमेरिकेतील लोकांचे सौख्य अमुक अमुक इतके एकक, हिंदुस्थानातील लोकांचे सौख्य इतके इतके एकक असे काही मोजता येईल काय? निदान, दोन देशांची तुलना करून त्यांतील एक सौख्यात वरचढ आहे, दुसरा काही कमी आहे असेतरी म्हणता येईल काय? हे सारे प्रश्न सोडविण्यासाठी केवळ अर्थशास्त्राचा आधार पुरेसा नाही. जीवशास्त्र, समाजशास्त्र, अगदी तत्त्वज्ञानाचादेखील आधार घ्यावा लागेल.

उदाहरणाने हा प्रश्न समजावयास थोडा सोपा होईल. समजा 'अ' आणि 'ब' ही दोन माणसे आहेत. दोघांनीही शेवटचे जेवण चोवीस तासांपूर्वी घेतले. त्यानंतर त्यांना काहीच खायला मिळाले नाही. चोवीस तासांनी दोघांनाही एकएक भाकरी मिळाली आणि त्यांनी ती भाकरी खायला सुरुवात केली. दोघांच्याही पोटांत कमालीची भूक आहे. दोघांनाही, कधी एकदा काही तरी पोटात जाते अशी



वखवख लागलेली. पण, ही भुकेची आर्तता मोजायची कशी? जर माणसाच्या जठरात भुकेमुळे उत्पन्न होणाऱ्या आम्लाचे मोजमाप, शरीरविच्छेदन न करता घेता येत असते तर भुकेच्या तीव्रतेचा काहीसा अंदाज बांधता आला असता? पण, तोदेखील फारसा शास्त्रीय ठरला नसता. भुकेने तयार होणाऱ्या एक औंस आम्लाचा परिणाम 'अ' आणि 'ब' दोघांवरही सारखाच होईल असे मानण्यास काहीच आधार नाही. 'अ'ला पूर्वायुष्यात उपासमार काढण्याची सवय असली किंवा तो वजन आणि आकारमान यात कमी असला तर त्याची भुकेच्या तीव्रतेची जाणीव 'ब'पेक्षा वेगळी असू शकेल. काही माणसे अति भूक लागली म्हणजे चिडचिड, रागराग करतात. दुसरी काही माणसे शक्तीचा व्यय टाळण्याकरिता निमूटपणे शांत झोपून घेतात. थोडक्यात, भुकेला काही मोजमाप नाही आणि दोन माणसांच्या भुकेची तुलनाही नाही.

दोघांचीही भूक चोवीस तासांची, पण तिची तीव्रता ज्याला त्याला जाणवणारी वेगळी; त्यांची तुलना अशक्य. तसेच, भुकेच्या समाधानाने होणाऱ्या आनंदाची तुलनाही अशक्य. 'अ' आणि 'ब' यांनी भाकरीचा पहिला घास खाल्ला तेव्हा परब्रह्म भेटल्याचा आनंद दोघांनाही होणार. पण, दोघांच्या परब्रह्म आनंदाची तुलना करण्याची शक्यता नाही. प्रत्येकाच्या अनुभवातले परब्रह्म हेही वेगळे वेगळेच असते.

भाकरी खाण्यापासून 'अ' आणि 'ब' यांना मिळणाऱ्या समाधानाबद्दल एक गोष्ट निश्चित सांगता येईल. पहिला घास खाताना उच्च कोटीचा आनंद झाला. पुष्कळदा भुकेल्या घशाला कोरड पडलेली असते; चवीची जाणीवसुद्धा होत नाही. दुसरा, तिसरा, चौथा घास अधिकाधिक गोड लागत जातो. काही काळानंतर का होईना, पाचपन्नास घासांनंतर भूक शमते आणि प्रत्येक नव्या घासाने मिळणारे समाधान आधीच्या घासाच्या तुलनेने कमी कमी होऊ लागते. पहिली भाकरी संपेपर्यंत समाधान वाढत राहील असे समजू. दुसरी भाकरी समोर आली की तिच्या दर्शनाने होणारा आनंद पहिल्या भाकरीच्या तुलनेने दोघांच्याही बाबतीत कमीच झालेला असणार; तिसऱ्या भाकरीच्या वेळी त्याहूनही कमी, चौथी भाकरी समोर आली तर 'आता नको, पोट भरले' अशी अवस्था होईल. तरीही आग्रह चालूच राहिला तर काही काळाने भाकरीमुळे सौख्य मिळण्याऐवजी त्रास वाटू लागेल, ती गिळवणार नाही, गिळलेल्या भाकरीचेही अपचन होईल. सारांश, भाकरीच्या घासागणिक तिच्या सेवनातून मिळणारा आनंद 'अ' आणि 'ब' या दोघांच्याही

बाबतीत अधिकाधिक घटत जाईल.

घसरत्या संतुष्टीच्या आधाराने सामाजिक अर्थशास्त्राचे काही आधार बनविण्याचा अगदी पहिल्याने झालेला प्रयत्न म्हणजे, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर पिगू नावाच्या अर्थशास्त्रज्ञाने १९४६ साली 'सामाजिक सौख्याचे अर्थशास्त्र (Economics of Welfare)' हे पुस्तक प्रसिद्ध करून केला. त्याच्या या पुस्तकाचा दहावीस वर्षे मोठा दबदबा राहिला. वेगवेगळ्या रंगछटांच्या समाजवाद्यांनी पिगूच्या अर्थशास्त्राचा वारंवार उपयोग केला. पिगूच्या साऱ्या विश्लेषणाचा अनेक अर्थशास्त्रज्ञांनी पार धुव्वा उडविला आहे. पण तरीही, सरकारी अर्थकारण, अंदाजपत्रकातील धोरणे, सरकारी कल्याणकारी योजना या सर्वांमागे अजूनही पिगूचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

मनुष्यप्राण्याच्या सौख्याची अनेक साधने आहेत: मानसिक, आध्यात्मिक, बौद्धिक, कलासंबंधी इत्यादी, इत्यादी. ज्या सौख्यांचे मोजमाप पैशाच्या आधाराने करता येते त्याला आर्थिक सौख्य म्हणावे ही पिगूची व्याख्या. आर्थिक सौख्य वाढले म्हणजेच समाजाचे सर्वार्थाने भले होते हे खरे नाही. आर्थिक सौख्याचा सर्वसाधारण समाजाच्या भल्यावर विपरीत परिणामही होऊ शकतो. एकूण देशातील राष्ट्रीय उत्पादन हे त्या देशातील आर्थिक सौख्याचे एक मोजमाप आहे. पण, उत्पादनाचे वाटप वेगवेगळ्या पद्धतीने होऊ शकते. वाटप कसेही झाले तरी सामाजिक सौख्याची बेरीज सारखीच राहील काय? उत्पादनातून जमीनदारांना भाडेपट्टी मिळेल, कामगारांना मजुरी मिळेल, भांडवल पुरविणाऱ्यांना व्याज मिळेल आणि उद्योजकांना फायदा मिळेल. अश्या तऱ्हेने राष्ट्रीय संपत्तीचे वाटप होईल. पण, अशा वाटपाने राष्ट्रीय संपत्तीतून मिळणारे आर्थिक सौख्य सर्वोच्च पातळीचे ठरेल याची काहीच खात्री नाही. उत्पादनाच्या वेगवेगळ्या घटकांना मिळालेला मोबदला त्यांचा उत्पादनातील सहभाग लक्षात घेता योग्यच आहे असे मानले तरी वेगवेगळ्या घटकांच्या हातात येणाऱ्या उत्पन्नातील तफावत फार मोठी असेल तर साऱ्या समाजाचे मिळून आर्थिक सौख्य कमी भरेल.

वर घेतलेल्या उदाहरणात 'अ'ला दहा भाकरी दिल्या आणि 'ब'ला दोनच दिल्या तर 'अ'ला अजीर्णाचा त्रास आणि 'ब'मात्र अर्धपोटी अशी अवस्था होऊन जाईल. त्यापेक्षा, दोघांनाही सहा सहा भाकऱ्या मिळाल्या असत्या तर एकूण बारा भाकऱ्यांपासून दोघांना मिळून होणारे सौख्य सर्वात अधिक झाले असते.



एकेका घासापासून मिळणाऱ्या आनंदाचे मोजमाप करता येईल. सर्व उपभोगातून मिळणारा आनंद कमी कमीच होत जातो आणि उपभोगाची सर्व मनुष्यप्राण्यांची क्षमता सारखीच असते ही पिगूची गृहीततत्त्वे. त्यांच्या आधाराने त्याने समाजधुरीणांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे मांडली.

-राष्ट्रीय संपत्ती वाढली म्हणजे आर्थिक सौख्यात वाढत होते हे खरे. फक्त या वाढीव उत्पादनासाठी लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध श्रम करण्याची सक्ती होता कामा नये.

-राष्ट्रीय उत्पादनातील गरिबांचा वाटा वेगवेगळ्या मार्गांनी वाढविता येतो आणि काही अपवाद सोडल्यास गरिबांचा वाटा वाढविल्याने सामाजिक सौख्यात वाढ होते. फक्त अशा कार्यक्रमांमुळे उद्योजकांचे प्रोत्साहन कमी होऊ नये आणि गुंतवणूक व उत्पादन यावर विपरीत परिणाम होऊ नयेत.

पिगूच्या सौख्याच्या अर्थशास्त्राचे, त्यातील गृहीततत्त्वांचे, तर्कशास्त्राचे आणि विश्लेषणाचे अर्थशास्त्र्यांनी वाभाडे काढले. पण दीनदुबळ्यांना करुणेपोटी दानधर्म करण्याची धार्मिकांची करुणेवर आधारित परंपरा आणि समाजवाद्यांची गरिबांसंबंधीची कळकळ या दोघांनाही पिगूच्या मांडणीने, थोडासा शास्त्रीय वाटणारा आधार मिळाला.

माणसे समान असतात; सारी देवाची लेकरे; त्यांत विषमता नाही या सर्वमान्य तत्त्वांचा मोठा विपरीत अर्थ पिगूच्या सौख्याच्या अर्थशास्त्रामध्ये आहे. सारी माणसे एकाच ठशाची, एकसारखीच आहेत; दोन माणसांना येणारे सुखदु:ख, गरम आणि थंड यांचे अनुभव एकसारखेच असतात; जांभळा रंग म्हटला की 'अ'च्या मन:पटलावर ज्या रंगछटेची अनुभूती होते तीच 'ब'च्याही मनात होते या कल्पनांना काही आधार नाही. प्रत्येक माणसाला वाढत्या उपभोगाबरोबर होणारा आनंद कमी होत जातो हे खरे. पण, माणसे काही तीच तीच वस्तू उपभोगत नाहीत; उपभोगाच्या वस्तूंची विविधता वाढवीत राहतात. भाकरीबरोबर कोरड्यास घेतात; चपात्या, पुऱ्या, मांडे, मिठाई असे नवनवे पदार्थ शोधून काढून ते उपभोगसौख्याची कमान वाढती राहील अशी व्यवस्था करतात. भाकरीच्या प्रत्येक घासापासून मिळणारे समाधान घसरत जाईल हे खरे; पण, आमदनीच्या प्रत्येक नव्या रुपयापासून होणारे समाधान घटत जाईल असे नाही. दोन वेगवेगळ्या माणसांच्या मनांतील उपभोगसौख्याची तुलना करणे तर अगदीच अशक्यप्राय आहे. उपाशी माणसाची भूक तीव्र, ती शमविण्यासाठी तो प्रचंड खटाटोप करेल; ज्याची भूक कमी तीव्र

त्याचा खटाटोप तुलनेने कमी तीव्र राहील असे म्हणावे तर इतिहास त्याला साक्षी राहत नाही. दुष्काळाच्या काळात माणसे उपासमारीने मरून पडतात, पण धान्याच्या गोदामांवर हल्ले करून धान्य लुटण्याचा प्रयत्न करीत नाहीत. उलट तुलनेने, चैनीच्या वस्तूंचा तुटवडा पडताच चैनी माणसे आकाशपाताळ एक करून टाकतात हा अनुभव नेहमी येतो.

मोरारजी देसाई अर्थमंत्री असताना त्यांनी जवळजवळ साऱ्याच परदेशी वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली; प्रसाधनाच्या वस्तूंवरही बंदी घातली. आयातीवरील नियंत्रणे साऱ्या देशाने मुकाटपणे सहन केली. पण, दिल्लीतील उच्चभ्रू समाजातील महिला तक्रारी घेऊन पंडित नेहरूंकडे गेल्या आणि त्यांना लागणाऱ्या प्रसाधनसाधनांचे उत्पादन देशातल्या देशात सुरू व्हावे याची तजवीज त्यांनी करून घेतली.

मनुष्यप्राणी समान आहेत, पण ती एका मुशीतून काढलेली बाहुली नाहीत. प्रत्येक प्राणी वेगळा आहे, अनन्यसाधारण आहे हे त्यांच्यातील समानतेचे सूत्र आहे. हे न समल्याने धर्मवादी फसले, समाजवादीही फसले. करुणा आणि विषमतानिर्मूलन यांना काही तार्किक पाया देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पिगूने अर्थशास्त्र्यांना त्याच मार्गावर नेण्याचा प्रयत्न केला. 'सौख्याचे अर्थशास्त्र' आपल्या पायावर कधी उभे राहिलेच नाही. पण, प्रत्यक्ष शासकीय धोरणावर त्याचा प्रभाव प्रचंड आहे. श्रीमंतांवर कर बसवून गरिबांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्या असे कार्यक्रम सर्वच पक्ष आग्रहाने मांडतच असतात. बिनबुडाचा हा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन दररोजच्या शासकीय अर्थकारणात महत्त्वाचा ठरला आहे. कारण उघड आहे. राजकीय शासनाच्या हाती अर्थकारणाची सूत्रे गेली. दरडोई एक मत हे तत्त्व अर्थकारणातही लागू झाले. पिगूची अशास्त्रीय गृहीततत्त्वे प्रत्यक्षात खरी मानली गेली. अशास्त्रीय पिगू प्रत्यक्षात मोठी मान्यता मिळवून व टिकून आहे.

*(३ मार्च १९९८)*

■■



# स्वातंत्र्य म्हणजेच प्रगती

डॉ. ज्युलियन सायमन ८ फेब्रुवारी १९९८ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी निधन पावले. गेल्या वर्षी ते हिंदुस्थानात आले होते. शेतकरी संघटनेच्या सहकार्याने देवळाली येथे भरलेल्या एका परिसंवादात त्यांनी भाग घेतला होता. त्याही वेळी त्यांचे नाव अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचे उमेदवार म्हणून घेतले जात होते.

डॉ. सामयन आशावादी अर्थशास्त्री म्हणून ओळखले जात. या पृथ्वीवरील सर्वात निर्णायक साधनसंपत्ती माणूस ही आहे. माणूस प्रगतीच्या मार्गात येणारे सारे अडथळे दूर करतो, जमिनीची सुपीकता तसेच धातू, तेल इत्यादी खनिजे देण्याची क्षमता मर्यादित असेल पण, त्यामुळे माणसाची प्रगती थांबणार नाही; 'जगाचा अंत मनुष्यप्राण्याच्या लालसेपोटी येत आहे, येत आहे' असे शतकानुशतके धर्मवादी, पर्यावरणवादी कंठशोष करीत असले तरी प्रत्यक्षात माणसाची प्रगती प्रचंड वेगाने आणि वाढत्या गतीने होतच आहे.

ख्रिस्तपूर्व ८००० वर्षांपासून ते इसवी सन १७५० सालापर्यंत माणसाचे जीवनमान २० वर्षांपासून फक्त २४ वर्षांपर्यंत वाढले आणि १७५० सालापासून जीवनमानाचा आलेख सरळच झेप घेतो आहे. या अडीचशे वर्षांत तर ७० वर्षांपर्यंत वाढले.

कच्च्या मालाचा निसर्गातील साठा संपत जाईल आणि त्यामुळे खनिजेही महागतील ही भीतीही खोटी ठरली आहे. बहुतेक सर्व धातूंच्या किमती सतत उतरत आहेत. १८०१ सालच्या किमतीच्या तुलनेने आज तांब्याची किंमत एक दशांशदेखील राहिलेली नाही. २०० वर्षांपूर्वी एक टन तांबे विकत घेण्यासाठी सामान्य माणसाला किती दिवस काम करावे लागे याची तुलना आजच्या परिस्थितीशी केली तर हे स्पष्ट होते.

अन्नधान्याच्या बाबतीतही भूकबळींची संख्या झपाट्याने कमी होत आहे. अन्नधान्याचा दरडोई उपभोग गेल्या ३० वर्षांत झपाट्याने वाढत आहे. 'जमीन मर्यादित आहे, लोकसंख्या वाढत आहे, तेव्हा रोगराई आणि भूकबळी अपरिहार्य आहेत' हा सिद्धांत मांडला गेला होता. काळाने तो सपशेल खोटा ठरविला आहे.

लोकसंख्यावाढीमुळे जीवनमान खाली तर येतच नाही, उलट, लोकसंख्येबरोबरच आर्थिक प्रगतीचाही वेग वाढतो.

१७५० सालापर्यंत मनुष्यप्राण्याने जेवढी प्रगती केली तेवढी प्रगती त्याने त्यानंतरच्या शंभर वर्षांतच केली. तितकीच प्रगती करायला त्यानंतर त्याला पन्नास वर्षे पुरली. त्यानंतर, तेवढीच प्रगती करण्यास वीस वर्षे, दहा वर्षे, पाच वर्षे असा कमी कमी कालावधी लागतो आहे. आजकाल तर तेवढी प्रगती मनुष्यप्राणी वर्षभरातच करतो आहे.

हाँगकाँग आणि हिंदुस्थान हे डॉ. सायमन यांच्या विशेष कौतुकाचे विषय होते. १९५५ मध्ये सायमन हाँगकाँगला गेले तेव्हा ते एक पसरलेले खेडे होते; हजारो लोक फुटपाथवर व छोट्या बोटीत रात्र काढीत. ही परिस्थिती पाहून सायमनना मोठे वाईट वाटले होते. लोकसंख्या कमी झाल्याखेरीज या लोकांना सुखाने जगता येणार नाही अशी त्यांची खात्री पटली होती. १९८३ मध्ये ते हाँगकाँगला परत गेले त्यावेळी एक चमत्कारच घडलेला होता. लोकसंख्या कमी तर झालेली नव्हतीच, कित्येक पटींनी वाढली होती आणि तरीही व्यापार, उद्योगधंदे यांच्या वैभवाने वसाहत दिमाखात उभी होती.

हिंदुस्थानाबद्दलही डॉ. सायमन कौतुकाने बोलतात. १९५४-५५ मध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांनी एक निष्कर्ष काढला. 'हिंदुस्थानातील धान्याचा तुटवडा आणि तेथील प्रचंड लोकसंख्या लक्षात घेता तेथील भूकबळी थांबविणे अशक्य आहे. हिंदुस्थानवर वृथा श्रम आणि साधने घालविण्यापेक्षा त्याचा नादच सोडून द्यावा व तेवढ्याच प्रयासांनी बाकीचे सारे देश व्यवस्थित खाऊपिऊ शकतील त्या कामाकडे वळावे.' एका काळी हाताबाहेर गेलेली हिंदुस्थानची ही 'केस' आता अगदीच वेगळी दिसते. हिंदुस्थान अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला आहे.

१९८१ मध्ये डॉ. सायमन यांनी 'निर्णायक साधनसंपत्ती (The Ultimate Resources)' हे पुस्तक प्रसिद्ध केले आणि १९८६ मध्ये 'मानवजातीची सद्य:स्थिती' (The State of Humanity) हा अहवाल प्रसिद्ध केला. त्याने मोठे वादळ उठले.

लोकसंख्या गुणाकाराने वाढते, अन्नधान्याचा पुरवठा पावलापावलाने वाढतो, भूकबळी, रोगराई ही मानवाची नियतीच आहे अशा अर्थाची माल्थसची भाकिते खोटी ठरली. त्याच्या काळी जमीन हीच सर्वात मोठी साधनसंपत्ती होती. आता जमिनीपेक्षा भांडवल, भांडवलापेक्षा तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानापेक्षा माणूस हे जास्त महत्त्वाचे उत्पादनाचे घटक ठरले; त्यामुळे माल्थसचे अरिष्ट टळले हा विचार अनेक शास्त्रज्ञांनी पूर्वी मांडला आहे. पण, डॉ. सायमन यांना हे स्पष्टीकरण मान्य



नव्हते. भांडवल आणि तंत्रज्ञान यांच्या वाढत्या वापरामुळे हे घडले असते तर प्रदूषण वाढत गेले असते. ते वाढते आहे अशीच बहुतेकांची समजूत आहे. १९६० ते १९९० या काळातील आकडेवारीने डॉ. सायमन यांनी असे दाखवून दिले आहे की, औद्योगिक प्रदूषणाची पातळी अमेरिकेत प्रत्यक्षात कमी कमी होते आहे. १९८० मध्ये प्रख्यात जीवशास्त्री पॉल एअर्लिक आणि सायमन यांची गाठ पडली. एअर्लिकसाहेब लोकसंख्येच्या वाढीस आळा घालण्याचे मोठे पुरस्कर्ते. 'लोकसंख्या कमी झाली नाही तर साधनसंपत्ती अपुरी पडेल. त्यांच्या किमती वाढतील' हे मत ते आग्रहाने प्रतिपादित. दोघांची पैज लागली, हजार डॉलर्सची. १९९० सालापर्यंत क्रोमियम, तांबे, निकेल, टिन, टंग्स्टन या पाच धातूंच्या किमती पडताना दिसल्या तर एअर्लिक हरले म्हणायचे आणि किमती चढताना दिसल्यातर एअर्लिक जिंकले म्हणायचे. प्रत्यक्षात या दहा वर्षांत लोकसंख्या वाढली, तांब्याची मागणी वाढली; पण, तांब्याचे उत्पादन अधिक कार्यक्षम झाले, अधिक स्वस्त पर्याय सापडले. एअर्लिक यांनी पैजेपोटी ५७६ डॉलर्स ७ सेंट दिले - चलनवृद्धी लक्षात घेऊन! पण, त्या साहेबांचा अजूनही विश्वास आहे, की दीर्घ काळाचा अनुभव घेतला तर त्यांचेच म्हणणे खरे ठरेल.

माणसाची सतत प्रगतीच होते, याला सायमन फक्त एक अपवाद करतात. 'सर्वांत निर्णायक साधनसंपत्ती माणूस ही आहे. तो आपले मन, विचारशक्ती, प्रज्ञा, प्रतिभा वापरून परिस्थितीवर सतत मात करीत असतो. त्याला खरी गरज फक्त एकाच गोष्टीची असते ती म्हणजे स्वातंत्र्याची. राष्ट्रांची प्रगती त्यातील नागरिकांच्या स्वातंत्र्याशी सरळ जोडलेली आहे.' साऱ्या पृथ्वीतलावर प्रगती झाली. फक्त राष्ट्र, धर्म, समाजवाद असल्या झेंड्याखाली जेथे जेथे हुकूमशाही लादली गेली, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली तेथे मात्र प्रगतीचे चक्र मंदावले, थांबले आणि उलटही फिरू लागले. ख्रिस्तानंतरच्या १७५० वर्षांत प्रगती झाली नाही याचे कारणही हेच. धर्मगुरू आणि सुलतानांनी सामान्यजनांना निव्वळ गुलाम बनवून टाकले होते त्यामुळे प्रगती थांबली. धर्माचा आणि राजसत्तेचा पगडा जसजसा कमी होत गेला तसतशी माणसाची प्रगती झाली, जीवनमान सुधारले. स्वातंत्र्य आणि प्रगती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

यंदाचे नोबेल पारितोषिक डॉ. सायमन यांना मिळो किंवा न मिळो, खुलीकरणाच्या नवीन युगाच्या पहाटेच अनेक वर्षे स्थिरावलेल्या अनेक बाष्कळ समजुती त्यांच्या दोनच पुस्तकांनी कचरापेटीत टाकल्या यात काही शंका नाही.

*(१७ मार्च १९९८)*

# निसर्ग चूप राहत नाही

आपले जगणे होता होईल तितके कमी क्लेशदायक व्हावे, शक्य तितका आनंद मिळवावा, त्यासाठी निसर्गाशी झुंज देत साधनसामग्री जमवावी, आर्थिक समृद्धीची उपासना करावी अशी सर्वच माणसांची धडपड असते. समृद्धीकरिता जो जो नवीन पाऊल टाकावे तो तो समृद्धीसाठी आपण निसर्गावर आक्रमण करीत आहोत याची जाणीवही त्याला सतत राहिली आहे. लोकसंख्या अगदीच बेताची होती तेव्हा झाडे तोडणे किंवा वणवे लावणे यापासून होणाऱ्या प्रदूषणाची फारशी चिंता करण्याचे कारण नव्हते; पण, औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीपासून मनुष्याच्या लौकिक धडपडीचा निसर्गावर विपरीत परिणाम होत आहे अशी चिंता अनेक विचारवंतांनी व्यक्त केलेली दिसते.

उद्योगधंदे तयार करणे, वाढविणे या खटाटोपात समाजातील उगवता वर्ग उत्साहाने गुंतलेला असतो. त्यांच्या धडपडीमुळे समाजाची आर्थिक प्रगती होत असते, समाजातील या वर्गाचेही स्थान उंचावत राहते, राजकीय सत्ताही त्यांच्या हातात जाणे अटळ असते. पण, त्याबरोबर पूर्वीच्या कालखंडात औद्योगिक, सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा मिळविलेला वर्ग चिंताग्रस्त होतो. आपल्या कालखंडातील उद्योगधंदे हे योग्य होते, नवीन उद्योगधंदे तेवढे धोकादायक आहेत, ते वाढता नये, वर येणारा नवीन समाज आपल्यावर कुरघोडी करता नये अश्या इच्छेपोटी वेगवेगळे युक्तिवाद त्यांच्याकडून वापरले जातात. निसर्गाचे संरक्षण करण्याची आवश्यकता ही मुख्यत: पीछेहाट होणाऱ्या या समाजाकडून व्यक्त केली जाते.

पर्यावरणवाद काही अलीकडचा नाही. खाणीतून कोळसा, लोखंड काढण्याकरिता पृथ्वीच्या पोटात माणसे जाऊ लागली. गिरण्यांची धुरांडी धूर ओकू लागली. आगगाड्या पृथ्वीला विवरे पाडून धडाधडा धावू लागल्या. मोटारगाड्या पळू लागल्या. रसायनांचा उपयोग वाढू लागला. जीवमात्रांच्या गुणसूत्रांशी खेळ करून विश्वामित्राप्रमाणे प्रतिसृष्टी तयार करण्याच्या गोष्टी शास्त्रज्ञ



बोलू लागले. या प्रत्येक पायरीला बुजुर्ग समाजातील लोकांनी कडाडून विरोध केला. 'आता पृथ्वी बुडते, बुडते' असा त्यांचा आक्रोश शतकानुशतके चालू आहे. पर्यावरणवादाला आज मोठी प्रतिष्ठा आहे. प्रगत देशांत पर्यावरणवादी राजकीय पक्षाही स्थापन झाले आहेत आणि ते आपली ताकद वाढवीत आहेत.

अलीकडच्या काळात निसर्गावर कारखानदारीमुळे होणाऱ्या विपरीत परिणामांकडे लक्ष वेधून घेण्याचे काम एका स्त्रीने केले; तिचे नाव राशेल कार्सन. १९६२ मध्ये तिने 'मूक वसंत (Silent Spring)' हे पुस्तक प्रसिद्ध केले. राशेल बाईंनी त्यात प्रामुख्याने, रासायनिक कीटकनाशके, बुरशीनाशके यांचा निसर्गावर होणारा परिणाम तपशीलवार मांडला आहे. ती सागरी जीवशास्त्रातील तज्ज्ञ. तिने पुस्तकाची सुरुवात परीकथेच्या थाटात केली. अमेरिकेतील एक छोटे गाव; आजूबाजूला दूरवर शेती, मळे, वनराई; त्यांत लक्षावधी हसणारी फुले, गाणारे पक्षी, खळखळणारे झरे. या साऱ्या स्वर्गरम्य चित्रात एकाएकी पालट होऊ लागतो. जणू कोण्या चेटकिणीचा शाप लागावा तसे कोंबड्या पटापटा मरून पडू लागतात. मग शेळ्या, जनावरे, माणसे यांच्यामध्येही नवे नवे आजार लागतात. पक्षी सगळे, प्रदेश सोडून निघून जातात. मृत्यूची भयाण शांतता साऱ्या प्रदेशावर पसरते. ही सारी संकटे अद्याप कोण्या एका गावावर येऊन कोसळलेली नाहीत; पण, यातील प्रत्येक संकट कित्येक गावांवर, वस्त्यांवर वेगवेगळे येऊन गेलेले आहे. हा कोणा चेटकिणीचा शाप?

दुसऱ्या महायुद्धात रासायनिक शस्त्रास्त्रांबद्दल पुष्कळ संशोधन झाले. रसायनांच्या फवाऱ्यांमुळे माणसे, प्राणी, झुडुपे, जंगले या सर्वांवर भयानक परिणाम करणारी रसायने शोधून तयार होती. युद्ध संपल्यानंतर सारी शस्त्रे कोठारांत गेली; त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय करारांनी बंदी घालण्यात आली. त्यातील काही रसायने प्रभावी कीटकनाशके होती. त्यांचा शेती आणि बागकामासाठी प्रसार करण्याचे काम काही कारखानदार, औषधी कंपन्या यांनी केले; शेतकी शाळा, विद्यापीठे, सरकारी शेती-खाती यांनीही त्यांना उत्तेजन दिले. उत्पादनवाढीसाठी अनेक तऱ्हेच्या रसायनांचा उपयोग होऊ लागला. डी.डी.टी. तर सर्वत्र लोकप्रिय झाले.

रसायनांच्या वापरांमुळे उत्पादन वाढले; मलेरिया, प्लेग, कॉलरा यांसारखे भयानक साथींचे रोगही आटोक्यात आले. पण, या रसायनांची एक मोठी दुष्ट सवय आहे. रोगराई हटविण्यासाठी, कीटक मारण्यासाठी फवारल्यानंतर नेमलेले काम झाले तरी ही रसायने आपला अवतार संपवत नाहीत; जमिनीतून झिरपत

पाण्याबरोबर नदीनाल्यांना मिळतात. जमिनीला सुपीक करणारे अनेक जीवप्राणी त्यामुळे मरून जातात. पाण्यात जगणारे मासे, खेकडे यांना जगणे अशक्य होते. एवढेच नव्हे तर, ही रसायने सूक्ष्म रूपाने झाडांत, रोपांत भिनतात; फुलांत, फळांत प्रवेश करतात; पशुपक्ष्यांच्याही शरीरांत घुसतात. हे विष शेवटी माणसाच्या जेवणाच्या ताटातही प्रवेश करते. विषारी रसायनाने मेलेले किडे खाऊन चिमण्या मरतात, चिमण्यांना खाऊन मांजरे मरतात असे हे मृत्यूचे तांडवनृत्य अखेरपर्यंत चालूच राहते.

एवढ्याने भागत नाही. कीटकनाशकांमुळे प्रत्येक कीटकजातीतील बहुसंख्य मरून जातात. पण, त्यातले त्यात तगडे सशक्त पाचदहा टक्के त्या कीटकनाशकांना दाद न देता जिवंत राहतात. फार अल्प काळात ही सशक्त प्रजा रसायनांना अधिक सहजतेने पचविण्याची क्षमता असलेली प्रजा निर्माण करते. थोडक्यात, रसायनांच्या वापरामुळे निसर्ग नासतो एवढेच नव्हे तर, मूळ समस्या पहिल्यापेक्षा अधिक बिकट बनते. या नव्या सशक्त पिढीच्या कीटकांवर मात करण्यासाठी रसायनांच्या वापराचे प्रमाण वाढवावे लागते; अथवा, पूर्वीपेक्षा अधिकाधिक जहाल रसायने वापरात आणावी लागतात. सारी मनुष्यजात रसायनांच्या वापराच्या चक्रात गुरफटली आहे; त्यातून सुटका करून घेणे कठीण आहे. मनुष्य जातीचा आणि पृथ्वीचा अंत झपाट्याने जवळ येत आहे.

राशेलबाईंच्या पुस्तकातील या मांडणीने केवळ विद्वान विचरवंतांतच नव्हे, सर्वसाधारण जनांतही खळबळ माजली. १९६४ साली, म्हणजे पुस्तकाच्या प्रकाशनानंतर दोन वर्षांनी अमेरिकन शासनाच्या आरोग्यखात्याने जाहीर केले की, मिसिसिपी नदी आणि मेक्सिकोच्या आखातातील कोट्यवधी मासे मरून गेले; त्यांच्या शरीरात एन्ड्रिनचे सूक्ष्म अंश सापडले. हे एन्ड्रिन शेतांतून, नदीनाल्यांतून येऊन पोहोचले हे उघड आहे. पुस्तक हातोहात खपू लागले. सतत एकतीस आठवडे ते सर्वात जास्त खपाचे पुस्तक राहिले. पाच लाखांवर प्रती खपल्या. मग, स्वस्त आवृत्ती निघाली; त्याच्या किती प्रती खपल्या त्याची गणती नाही. अमेरिकन सरकारने रासायनिक शेतीबाबत विशेष अभ्यास चालू केला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेती संस्थेने १९६५ साली रोम येथे या विषयावर चर्चा करण्यासाठी मोठी परिषद बोलविली. इंग्लंडमधील शेतीखात्याने डी.डी.टी. आणि त्यासारख्या कीटकनाशकांवर बंदी घातली. रसायनांचे कारखानदार चवताळून उठले. कार्सनचे सारे लिहिणे वाऱ्यावरचे आहे, त्यामागे काही शास्त्रीय संशोधन नाही; रसायनांच्या



वापरामुळेच सारे विघातक परिणाम घडून येत आहेत याचा काही सज्जड पुरावा दिलेला नाही असा त्यांनी हल्ला चढविला.

या औषधांचा वापर झाला नसता तर साथीचे रोग आटोक्यात आले नसते, त्यामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडले असते; कीटकनाशकांमुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढले, अन्यथा लक्षावधी माणसे भुकेने तडफडून मेली असती; रसायनांच्या वापराचे दुष्परिणाम आहेत हे खरे, पण रसायने वापरलीच नसती तर निसर्ग मोठा स्वच्छ सुंदर राहिला असता हेही खरे नाही; मनुष्यप्राणी हाच मुळी पृथ्वीला लागलेली कीड आहे, त्याची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे तोपर्यंत काही ना काही नवनवीन प्रयोग करून पाहावेच लागतील असे युक्तिवादही टीकाकारांनी केले.

औद्योगिकीकरण, रसायनांचा वापर यांचा निसर्गावर जो दुष्परिणाम होतो त्यासंबंधीची चर्चा अजून चालूच आहे. गुणसूत्रांमध्ये ढवळाढवळ करून वनस्पतीच कीटकांना तोंड देण्याइतक्या समर्थ बनवाव्या किंवा कीटकांना खाऊन टाकणाऱ्या कीटकांची जोपासना करावी; तसेच, कीटकांचे प्रजोत्पादनच होणार नाही अश्या तऱ्हेच्या युक्त्या शास्त्रज्ञ शोधून काढीत आहेत. या नवीन पद्धतींचे काही दुष्परिणाम असणारच नाहीत असे थोडेच आहे? बुद्धी बाळगणारा मनुष्यप्राणी निसर्गावर मात करण्याच्या खटाटोपात जोपर्यंत राहील तोपर्यंत पर्यावरणाच्या नवनव्या समस्या उभ्या करीत जाईल आणि हळूहळू त्यांचे निराकरणही करीत जाईल.

कारखान्यातील कामगारांकडून चोपून काम करून घ्यायचे म्हटले तरी त्यासाठी कामगारांना काही सोयी, सुखसुविधा द्याव्या लागतात; नुसतेच क्रूर शोषण केले तर कारखानदारीसुद्धा फार काळ चालणार नाही. त्याचप्रमाणे, निसर्ग काही तक्रार करीतच नाही; वसंत ऋतु मूकपणे फुलतच राहतो; निसर्गाला कितीही तुडवा, तो तक्रार करत नाही किंवा प्रतिकार करीत नाही या रूढ कल्पनेला राशेलबाईने एकाच पुस्तकाने जबरदस्त हादरा देऊन देशोदेशींच्या लोकांमध्ये एक नवी जाणीव तयार केली.

*(२३ मार्च १९९८)*

■■

## मार्क्सवादाचा पाडाव आणि स्त्रीप्रश्न

गेल्या वीस वर्षांपासून स्त्रियांचा प्रश्न मोठा गाजत आहे. सुधारलेल्या समाजात काय किंवा मागासलेल्या समाजात काय, स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेने कमीच मानले जाते; दुय्यम दर्जाचे नागरिक समजले जाते. इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशांत स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळून फार वर्षे झाली नाहीत. स्वित्झर्लंडसारख्या देशातही स्त्रियांना मतदानाचा हक्क गेल्या दोन वर्षांपूर्वीच मिळाला. हिंदुस्थानात त्यांना कायदेमंडळांतही एक तृतीयांश जागा राखीव ठेवल्या जाव्यात असा प्रस्ताव विचाराधीन आहे.

स्त्रिया शेतात काम करतात, कारखान्यात करतात; शिवाय, घरकाम सांभाळतात. पण त्यांच्या नावाने आर्थिक उत्पन्न दहा टक्केसुद्धा नाही; आणि स्थावर मालमत्ता म्हटली तर दोन टक्क्यांवरही नाही.

जगातील सारेच समाज पुरुषप्रधान आहेत. कोणत्याही क्षेत्रात काही कर्तबगारी गाजविणे हे पुरुषांचे काम. पराक्रमी, विद्वान, कलावान अश्या स्त्रियांनी आपली नावे अजरामर करून ठेवली आहेत आणि तरीही, मुलगी जन्माला आली म्हणजे तिच्या भविष्याचा पाठ सटवीने निश्चित आखूनच ठेवलेला! आईबापांच्या घरी पाठच्या भावांच्या तुलनेनेही खाणे, खेळणे, शिक्षण, स्वातंत्र्य इत्यादी सर्वच बाबतीत कमी लेखले जावे; हर बाबतीत कमीपणा घ्यावा; सारे काही सोसून घ्यावे; आईला जमेल तितकी मदत करावी; 'मुलीची जात आहे, सासरी जायचे आहे, कामाची सवय पाहिजे आणि सोसायचीही तयारी पाहिजे' अशी भावना बहुतेक घरी प्रेमळातील प्रेमळ आईबापांचीदेखील आढळते.

स्त्रीजातीला हा दुय्यमपणा मिळाला कसा? जन्मभर दुसऱ्याची ताबेदारी पत्करून जीवन कंठण्याची वेळ त्यांच्यावर का आली? समाजात 'चूल आणि मूल' हे स्त्रियांचे क्षेत्र ठरले आणि एक प्रकारची गुलामी त्यांच्या नशिबी आली याचे कारण काय?

निसर्गाने स्त्रीपुरुषांमध्ये तसा काही फारसा फरक केलेला नाही. उंची, वजन आणि भावना यांत काही फरक आढळतो; पण, त्यातला जन्मजात जीवशास्त्रीय



किती आणि जन्मानंतर आसपासच्या परिस्थितीने आणि संस्कृतीने लादलेला किती हे निश्चित सांगणे कठीण आहे. मग, स्त्रियांच्या नशिबी हे दुय्यमत्व का आले?

साम्यवादाचा उद्‌गाता कार्ल मार्क्स याचा 'सर्व माणसे समान असतात' या तत्त्वावर दृढ विश्वास होता. इतिहासाच्या प्रवाहात वेगवेगळ्या कालखंडांत उत्पादनव्यवस्था बदलत जाते, उत्पादनासाठी लागणाऱ्या साधनांचे स्वरूप आणि स्वामीत्व बदलत जाते. त्यातून वेगवेगळे वर्ग उभे राहतात, त्यांच्यात संघर्ष उभे राहतात आणि वर्ग संघर्षातून इतिहासाची दिशा बदलत जाते. शेवटी, समाजवादी व्यवस्था प्रस्थापित झाली की खासगी मालमत्ता राहणार नाही, कोणताही वर्ग उरणार नाही - ना 'नाही रे', ना 'आहे रे'. अशी मार्क्सची मांडणी होती.

मार्क्सच्या या साऱ्या विश्लेषणात मनुष्यजात ती सारी मात्र पुरुष असल्याचे भासत होते. माणसामाणसांतील लिंगभेदाचा उल्लेखही करणे मार्क्सच्या मांडणीत आवश्यक नव्हते, जणू. काही कागदोपत्री आणि पत्रव्यवहारांत स्त्रियांच्या दुय्यमत्वाच्या प्रश्नाचा काही उहापोह मार्क्सने अगदी संक्षेपाने केला. एरवी स्त्री आणि पुरुष यांच्यातील श्रमविभागणीत त्याला काही फारसे स्वारस्य नव्हते.

मार्क्सचा सहकारी म्हणा, शिष्य म्हणा - फ्रेडरिक एंगल्स याने स्त्रियांच्या प्रश्नाला हात घातला. या प्रश्नावरचे त्याचे विश्लेषण शंभरावर वर्षे जगन्मान्य समजले जात होते. एंगल्सचा जन्म १८२० मध्ये झाला. मार्क्स सतत आर्थिक विवंचनेत असलेला, युरोपातील भयानक थंडीत अंगाशी वर्तमानपत्रे लपेटून घेऊन थंडीपासून बचाव करणारा, हाती कधीमधी पैसे आले तर उधळून टाकणारा आणि प्रेमविवाह केलेल्या पत्नीशीही प्रतारणा करून घरच्या मोलकरणीच्या अपत्याचा बाप बनलेला असा मोठा कलंदर मनस्वी प्राणी. फ्रेडरीक एंगल्स याच्या नेमका उलटा. सिद्धांती, दार्शनिक, तसाच व्यवहारी, अत्यंत कष्टाळू; बऱ्यापैकी मोठ्या कारखान्याचा मालक, त्यामुळे धनाढ्य. मार्क्स आणि त्याचे सारे कुटुंब यांचा चरितार्थ अखेरपर्यंत एंगल्सनेच चालविला. मार्क्सच्या बरोबरीने त्याने 'कम्युनिस्ट जाहीरनामा', 'पवित्र परिवार' या गाजलेल्या पुस्तकांचे लेखन तर केलेच; पण, मार्क्सच्या मृत्यूनंतर 'कॅपिटल सारग्रंथा'च्या प्रकाशनाचेही काम पार पाडले.

'कुटुंब, खासगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उद्‌गम (Origin of the Family, the Private Property and the State)' हे पुस्तक लिहून स्त्रीप्रश्नावर एक अगदी अनोखा दृष्टिकोन एंगल्सने मांडला आणि मोठी खळबळ उडवून दिली.

स्त्रियांनी 'चूलमूल' पाहावे आणि पुरुषांनी इतर सारी क्षेत्रे गाजवावीत ही

अशी श्रमविभागणी उद्‌भवली कोठून? मनुष्यजातीच्या सुरुवातीच्या काळात तो टोळ्या करून राहत असे. स्त्रीपुरुषांच्या जोडप्याच्या कुटुंबाचा उगम त्या वेळी झालेला नव्हता. पुरुषांनी केलेल्या शिकारीवर आणि गोळा केलेल्या कंदमुळांवर साऱ्या टोळीची गुजराण होई. गर्भधारणा, बाळंतपण आणि बालसंगोपन या चक्रात स्त्रिया बहुतेक वेळ अडकलेल्या राहत. त्यामुळे, टोळीच्या तळावर त्या राहत, मुलांवर देखरेख ठेवीत आणि पुरुषांनी मिळवून आणलेल्या अन्नाचे वाटप करण्याचे कामही करीत. टोळीची व्यवस्था फुटली ती काही अंशी जीवशास्त्रीय कारणाने. एकाच टोळीतील स्त्रीपुरुष पिढ्यान्‌पिढ्या एकत्र येत राहिले तर त्यांची संतती अधू, अपंग किंवा सत्त्वहीन होत जाते हा अनुभव आल्यानंतर दुसऱ्या टोळीतील स्त्रिया संपादन करण्याची गरज भासू लागली. टोळ्या फुटू लागल्या. स्त्रीपुरुषांची परस्परअनुरूपता महत्त्वाची ठरू लागली. चौकोनी कुटुंबाची ही पूर्वपीठिका झाली, पण टोळी सोडून कुटुंबव्यवस्था सुरू होण्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण वेगळेच. टोळ्यांची प्रगती होऊ लागली. त्यांची साधनसंपत्ती वाढू लागली त्याबरोबर सारी साधनसंपत्ती टोळीच्या मालकीची ही कल्पना जाऊन खासगी वैयक्तिक मालमत्तेची प्रथा पसरली. आपल्या मालकीची संपत्ती आपल्या खऱ्याखुऱ्या जीवशास्त्रीय वारसास जावी अशी सर्वच जन्मदात्या पित्यांची इच्छा असल्याने स्त्रियांवर, त्यांच्या हालचालींवर, स्वातंत्र्यावर बंधने आली.

'चूल आणि मूल' ही टोळीच्या काळात अधिकारचिन्हे होती; खासगी मालमत्तेचा उगम झाला त्याबरोबर ती गुलामीची लक्षणे ठरली. स्त्रियांच्या दास्याची ही व्युत्पत्ती एंगल्सने मांडली, पण या दास्याचा अंत होण्याची काही शक्यता? समाजवादी व्यवस्था प्रस्थापित झाली, खासगी मालमत्ता संपली की विवाह नावाची छुपी वेश्यावृत्ती संपुष्टात येईल, स्वयंपाक आणि मुलांना वाढविणे ही कामे आधुनिक सुसज्ज गृहांमध्ये होऊ लागतील आणि 'चूलमूल' यांना पुन्हा एकदा प्रतिष्ठा प्राप्त होईल अशी या प्रश्नावरची एंगल्सची मांडणी.

अनेक वर्षे हा सारा सिद्धांत वेदवाक्याप्रमाणे मानला जाई. या विषयावर आता नव्याने काही लिहिण्यासारखे राहिलले नाही असा सर्वदूर समज होता. गंमत म्हणजे, समाजवादाच्या पाडावाला सुरुवात झाली ती या स्त्रीप्रश्नावरून. सामाजिक श्रमविभागणीत स्त्रियांच्या कपाळी जीवशास्त्रीय कारणांनी 'चूलमूल' येणे



अपरिहार्यच आहे हे एंगल्सचे गृहीततत्त्वच प्राग्मानववंशशास्त्रज्ञांनी खोटे ठरविले. इतिहासात स्त्रीसत्ताक समाजही होते. तलवार गाजविण्यचे काम स्त्रियांकडे आणि गृहकृत्ये पुरुषांकडे अशी श्रमविभागणी असलेले समाजही अनेक झाले. तेव्हा, स्त्रियांकडे 'चूलमूल' ही कामे कायमच राहातील आणि इतिहासातील वेगवेगळ्या कालखंडात या कामांची प्रतिष्ठा कधी वाढेल, कधी कमी होईल त्यानुसारच स्त्रियांची प्रतिष्ठा वरखाली होत जाईल ही कल्पना हास्यास्पद ठरली. 'चूलमूल' ही कामे स्त्रियांकडे आली हा काही श्रमविभागणीचा प्रकार नाही. स्त्रियांच्या व्यापक आणि विस्तारित कामक्रीडांत ही कामे एक महत्त्वाचे अंग आहेत. मुले वाढविण्यासाठी पाळणाघरांत टाकायची आणि भोजनासाठी सर्वांनी सार्वजनिक भोजनगृहांत जायचे ही 'आदर्श' समाजाची कल्पनाच अचरट ठरली.

मार्क्सवादाचा पाडाव झाला. खासगी मालमत्ता हा मनुष्यजातीवरील शाप नसून उद्धारक वर आहे; स्त्री आणि पुरुष यांच्यातील श्रमविभागणी इतिहासात काही विशिष्ट परिस्थितीत घडली; ती श्रमविभागणी युगायुगांत बदलतही जाईल आणि अखेरीस, स्त्री किंवा पुरुष यांच्यातील श्रमविभागणी लिंगभेदावर आधारित न राहता प्रत्येक व्यक्तीची आवडनिवड आणि गुणवत्ता लक्षात घेऊन होऊ शकेल या कल्पना जसजशा स्पष्ट होत गेल्या तसतसे स्त्रीमुक्ती विषयावरील एंगल्सचे महत्त्व संपले.

वर्गविग्रहाची मांडणी करताना मार्क्सने स्त्रियांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. नियतीने त्याचा असा सूड घेतला की स्त्रीप्रश्नाच्या नव्या सिद्धांतांनी वर्गविग्रह आणि वर्गसंघर्ष या त्याच्या संकल्पनांचा पायाच उखडून टाकला.

*(३१ मार्च १९९८)*

■■

# एक दुर्दैवी द्रष्टी

सारा आर्थिक दृष्टिकोन बदलून टाकणारे अर्थशास्त्री अनेक झाले. काहीजणांचे भाग्य असे की त्यांचे पुस्तक प्रकाशित होताच साऱ्या जगभर मोठी खळबळ उडाली; मोठ्या उलथापालथी घडून आल्या. काहींना मान्यता मिळाली, पण बऱ्याच कालावधीनंतर मिळाली. जगातील सर्वांत सुंदर हिरेमोती सम्राटांच्या मुकुटांत नसतात; अथांग महासागराच्या पोटातील कपारीत कोठे पडून राहिलले असतात; सगळी सुंदर फुले काही प्रदर्शनात पारितोषिके मिळवितात असे नाही; कितीतरी निर्जन माळरानात फुलतात, हसतात आणि कोमेजून जातात.

अर्थशास्त्रातही असे एक मोठे विलक्षण उदाहरण आहे. रोझा लुक्झेंबर्ग, पोलंडमध्ये जन्मलेली, सन १८७२ मध्ये. तरुणपणीच कामगार चळवळीत तिने उडी घेतली. वयाच्या बाविसाव्या वर्षी ती कामगार चळवळीच्या मुखपत्राची संपादक बनली. १८९८ मध्ये जर्मनीत भरलेल्या कम्युनिस्टांच्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेस ती हजर राहिली आणि मार्क्सचा शब्द न् शब्द वेद मानून जपाच्या माळा ओढणाऱ्या कम्युनिस्टांना तिने हादरवून टाकले. साम्राज्यवादाचे इतिहासात काय स्थान आहे यावर अनेकांनी लिहिले, पण 'साम्राज्यवाद' हा शब्द पहिल्यांदा वापरला रोझाने. भांडवलनिर्मितीच्या जटिल समस्येचा तिने उहापोह केला, मार्क्सपेक्षा अगदी वेगळे मत मांडले. एंगल्सच्या स्त्रीप्रश्नाच्या मांडणीला बाजूस सारून 'स्त्रियांचा प्रश्न' तिने अगदी वेगळ्या दृष्टिकोनातून तपासला. साऱ्या सनातनी साम्यवाद्यांना एका स्त्रीची ही बंडखोरी मोठी उद्धटपणाची वाटली. रोझा स्त्री नसती तर ती काय म्हणत आहे याचा थोडातरी गंभीरपणे विचार झाला असता. स्त्री असल्यामुळे तिची उपेक्षा, एवढेच नव्हे तर अवहेलना झाली. पण, पक्षबांधणीच्या कामात तिची बरोबरी कोणताच पुरुष कॉम्रेड करू शकत नव्हता. पोलंडमधील पक्षाची तर उभारणी तिने केलीच, पण त्याबरोबर नव्याने स्थापन झालेल्या जर्मन साम्यवादी पक्षाची ती प्रमुख बनली.

१५ जानेवारी १९१९ रोजी शासनाने तिच्यावर घातलेले मारेकरी तिच्या घरात



घुसले; त्यांनी तिला फरफटत बाहेर काढले, लाठ्यांनी मारले आणि शेवटी सरळ डोक्यावर बंदुकीची गोळी झाडून तिचे प्रेत जवळच्या कालव्यात फेकून दिले. प्रेत सापडले ते पाच महिन्यांनी; अशा अवस्थेत की त्याची ओळख पटणे शक्य नव्हते.

अनेक विषयांवर रोझाने प्रबंध लिहिले. तिच्या मांडणीकडे लालभाईंनीच दुर्लक्ष केले. पश्चिमी विचारवंतांना तिच्या म्हणण्याकडे लक्ष देण्याचे काही फारसे कारण नव्हते. तिच्या मांडणीतील प्रगल्भता अर्थशास्त्र्यांच्या नजरेत अलीकडे भरू लागली आहे. रोझाचे सारेच जीवन इतक्या उलथापालथीने भरलेले आहे, इतक्या विविध क्षेत्रांत तिने विचार मांडले आणि काम केले आहे की त्या सगळ्याचा धावता आढावा घ्यायचा म्हटले तरी त्यासाठी एक प्रबंधच लिहावा लागेल.

समाजवाद कोसळला; रशियातील क्रांती फसली; आर्थिक जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. शेतकऱ्यांच्या चळवळी देशादेशांत उभ्या राहत आहेत. या परिस्थितीत दुर्दैवी रोझाच्या अर्थसिद्धांतांची यथार्थता पटू लागली आहे. तिच्या साऱ्या विचारभांडारातील सर्वांत प्रमुख अशा एका सिद्धांताचीच चर्चा पुरेशी आहे. या एका मुद्यावरच तिने मार्क्सवाद्यांशी वाद घातले आणि वैर पत्करले.

मार्क्सच्या पूर्वीच्या अर्थशास्त्रात समाजात तयार झालेल्या संपत्तीची वेगवेगळ्या उत्पादक घटकांत वाटणी कशी होते हा मुद्दा कधी महत्त्वाचा मानला गेला नव्हता. 'जो तो जसे उत्पादन करील तसा त्याला वाटा मिळेल; कमी किंवा जास्त मिळण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कमी वाटा मिळाला तर पुरवठा कमी होईल आणि जास्त वाटा मिळू लागला तर त्या घटकाचा पुरवठा वाढेल. थोडक्यात, प्रत्येकाचे उत्पन्न, प्रत्येकाला काय मिळते हे तो समाजाला काय देतो यावर अवलंबून असते,' अशी ही मांडणी.

मार्क्सने या साऱ्याच मांडणीला आव्हान दिले आणि "समाजातील उत्पादनावर हक्क सांगण्याकरिता 'आहे रे' आणि 'नाही रे' या वर्गात संघर्ष होतात आणि या संघर्षातूनच मानवजातीचा इतिहास होतो" असे प्रतिपादन केले." खरे उत्पादन सारे श्रमशक्तीतूनच तयार होते; खरे म्हटले तर सारे उत्पन्न श्रमिकांकडेच जायला हवे; पण, भांडवलदार उत्पादनांच्या साधनांवर मालकीहक्क प्रस्थापित करतात आणि त्या सत्तेच्या जोरावर श्रमिकांना त्यांच्या हक्कांचे पुरे वेतन मिळू देत नाहीत; श्रमिकांच्या हक्काचे वेतन आणि त्यांना प्रत्यक्षात मिळणारे वेतन यातील फरक म्हणजे वरकड मूल्य; मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेत वरकड मूल्याचा उपयोग

भांडवली गुंतवणुकीकरिता होतो. पण तेथे एक समस्या तयार होते; भांडवल वाढते, कारखानदारी वाढते पण तेथे तयार झालेला माल विकत कोण घेणार? कारण, बाजारात येणाऱ्या मालाच्या मूल्यापेक्षा ग्राहकांच्या हातातील क्रयशक्ती कमीच असणार; यामुळे बाजारात मंदीच्या लाटा येत राहतील; आणि भांडवली व्यवस्था बुडेल'' हा मार्क्सवादाचा गाभा आहे.

या साऱ्या मांडणीत रोझा लुक्झेंबुर्गला एक मोठा दोष दिसून आला. त्या काळी जर्मनी आणि इंग्लंड ही दोन राष्ट्रे कारखानदारीत सर्वात पुढारलेली. मार्क्सचा सिद्धांत खरा असता तर तेथील बहुसंख्य कामगारांनी स्वयंस्फूर्तीने बंद आणि उठाव करून कामगारांचे राज्य आणण्यासाठी झटायला पाहिजे होते. पण, प्रत्यक्षात असे घडत नव्हते. झुंजारपणे, चिवटपणे पक्षबांधणीसाठी धडपडणाऱ्या रोझा लुक्झेंबुर्गच्या ध्यानात आले की, साम्यवाद आणण्याची तशी काही तळमळ, धडपड खुद्द कामगारवर्गातही नाही. कारण, मुळात जर्मन अर्थव्यवस्था मंदीच्या सावटाखाली नाही; उलट, अधिकाधिक भरभराटत आहे आणि कामगारही अधिकाधिक दरिद्री होत नाहीत तर दिवसेन्‌दिवस संपन्न होत आहेत.

हे काय गूढ आहे? भांडवलदारांनी उभ्या केलेल्या कारखान्याच्या मालाला नवनव्या बाजारपेठा मिळतात तरी कश्या? जर्मनी आणि इंग्लंडच्या अनुभवावरून रोझाने अचूक उत्तर दिले, ''भांडवलशाही देशांतील कारखानदार देशातील बाजारपेठेत न खपणारा माल दुसऱ्या अप्रगत देशांच्या बाजारपेठांत ओततात; त्यांच्याकडून कच्चा माल स्वस्त घेतात आणि पक्का माल महागात विकतात. अशा विषम व्यापारांमुळे त्यांची भांडवलदारी चालू राहते.''

''एखाद्या देशात भांडवलशाही पराकोटीची प्रगत झाली म्हणजे तेथे आपोआप कामगारांची क्रांती घडेल ही कल्पना खोटी. साऱ्या जगातील साऱ्या बाजारपेठा जेव्हा तुंबून जातील, जगभर मंदीचे सावट येईल त्याच वेळी खऱ्या अर्थाने साम्यवादी क्रांती उभी राहील.''

अशी मांडणी करण्यात रोझाने भलतेच धाडस केले. 'शोषण काय ते फक्त भांडवलदारांकडून कामगारांचे होते' या मार्क्सच्या सिद्धांताला जोड देऊन 'शोषण हे विषम व्यापारात होऊ शकते आणि कारखानदारी व मागालेले देश यांच्यातील व्यापारी देवघेव सदा विषमच राहणार! देशातील बाजारपेठेतही कारखानदार ग्रामीण बाजारपेठांशी अशीच विषम देवघेव करून आपला गाडा चालू ठेवतात' याकडे



तिने लक्ष वेधले.

रोझा लुक्झेंबुर्गचे सारे म्हणणे साम्यवाद्यांनी दुर्लक्षिले, पण तिच्या पिशाच्चाने त्यांचा पाठपुरावा सोडला नाही. कारखांनदारी वाढविण्याकरिता भांडवलदार जे करतात म्हणून रोझाने निर्भर्त्सना केली तेच समाजवादी कारखानदारीच्या विकासाकरिता करणे योग्य आणि आवश्यक आहे असे त्यांना म्हणावे लागले. रशियातील क्रांती ही काही औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांत झालेली समाजवादी क्रांती नव्हतीच.

भांडवलदार जागतिकीकरणाच्या ऐन भरात असतानाच ही क्रांती झाली. साम्यवादी क्रांती व्हायची असेल तर ती जागतिक मंदी आल्यानेच होईल, अन्यथा नाही. बोल्शेविक क्रांतीचा एक परिणाम झाला. साम्राज्यवादाचे एक विक्राळ राक्षसी रूप जाऊन त्याला व्यापारी जागतिकीकरणाचे स्वरूप आले. साऱ्या जगभरच्या अर्थव्यवस्थेत जर कायमचा तुंबारा आला तर त्या काळी कदाचित् बदलाची आवश्यकता निर्माण होईल. हा रोझा लुक्झेंबुर्गचा विजय आहे.

भारतासारख्या मागासलेल्या देशांत रोझा लुक्झेंबुर्गच्या सिद्धांताचा आणखी एक वेगळा आविष्कार पाहावयास मिळतो. कारखानदार आणि कामगार यांच्यातील शोषण संपुष्टात येते, एवढेच नव्हे तर कामगार भांडवलदारांचे साथी बनतात आणि ते दोघे मिळून आपल्याच देशातील मागास अर्थव्यवस्थेचे म्हणजे शेतीचे शोषण करतात.

शेतकरी संघटनेने भारतीय शेतीच्या पराधीनतेचे विश्लेषण करताना 'इंडिया' विरुद्ध 'भारत' असा संघर्षाचा सिद्धांत मांडला. त्या मांडणीचा मूळ प्रेरणास्रोत रोझा लुक्झेंबुर्गच आहे.

■■


## शरद जोशी यांची साहित्य संपदा

१. अन्वयार्थ भाग एक ३००/-
२. अन्वयार्थ भाग दोन २००/-
३. माझ्या शेतकरी भावांनो मायबहिणीनो २००/-
४. अर्थ तो सांगतो पुन्हा १५०/-
५. चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न १५०/-
६. पोशिंद्यांची लोकशाही ३००/-
७. 'भारता'साठी ३००/-
८. बळीचे राज्य येणार आहे ३००/-
**(महाराष्ट्र राज्य शासन उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार २०१०)**
९. जग बदलणारी पुस्तके १००/-
१०. शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख १५०/-
११. प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश १५०/-
१२. खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने १९०/-
१३. स्वातंत्र्य का नासले? ५०/-
१४. शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती १५०/-
१५. अंगारमळा १५०/-
**(महाराष्ट्र राज्य शासन उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार २००९)**

### अगामी

१. राष्ट्रीय कृषिनीती
(जनतादल सरकारच्या काळात व राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात शासनाला सादर झालेल्या अहवालांचे सुबोध मराठीत भाषांतर

२. राखेखालचे निखारे
(दै. लोकसत्ता इ.स.२०१३ मधील सदर)



'सारांश [illegible] शेतकरी संघ[illegible] 'आपा[illegible] घेणाऱ्या व्यक्तीं[illegible] फारसे चुकत [illegible] नियोजन [illegible] आणि साम[illegible] स्थापून, अहवालांचे आणि आकडेवारीचे गठ्ठे गोळा करून गणकयंत्रांच्या साहाय्याने निर्णय करणारी शासने मात्र पश्चात्ताप पावतात' या एका महत्त्वाच्या रहस्याचे विश्लेषण शेतकरी संघटनेच्या अर्थशास्त्रात आहे. त्याला परिपोषक म्हणून मी हे लेख लिहिले.'

-शरद जोशी